शनिवार । १९ सप्टेंबर १९८१ । एक रुपया

# माणूस

## ?

ही तिन्ही आंदोलने
आणि त्यांची यशस्वी अखेर
यांचा अर्थ,
या भागातील
कांदा पिकविणारा शेतकरी
एकदम सुखी झाला,
त्याच्या साऱ्या विवंचना
मिटल्या, बाजारात माल
येताक्षणीच त्याला योग्य भाव
लगेच मिळू लागला,
असा कुणी घेऊ नये.
तसे झाले असते तर फार
चांगले झाले असते; पण खरा
प्रकार घटनेने समान हक्क
मिळालेल्या अस्पृश्य समाजाच्या
स्थितीसारखा झाला आहे.

**कांद्याची कथा**
**चाकण ते निफाड**

पृष्ठ....११

## संध्याकाळच्या पुण्यामध्ये दि. बां. नी लिहिले आहे....

पुणे तिथे काय उणं, असं कधी गौरवानं, अभिमानानं तर काही वेळा कुचेष्टेनंही म्हटलं जातं. हे हार–प्रहार झेलत पुणेकरांची वाटचाल मन मानेल तशी चालूच असते.

गणपतिउत्सव हा पुणेकरांचा अगदी हक्काचा उत्सव! कारण लोकमान्य टिळकांनी याच शहरात त्याची सुरुवात केली. त्यामुळं टिळकांवर किंवा त्यांच्या 'केसरी'वर पुणेकर जेवढा हक्क सांगतील तितकाच, कदाचित दोन औंस जास्तच, ते या गणपतिउत्सवावर सांगतात !

गणपतिउत्सव आल्याची जाणीव दोन घटनांमुळं होते. पहिली म्हणजे, शहरात मोक्याच्या ठिकाणी खड्डे खणून खांब रोवले जाऊ लागतात. वर मंडप आकार घेतात. वाहातुकीला चांगलाच अडथळा निर्माण होतो आणि मुंगीच्या गतीने पुढे सरकणारी वाहने मंडपाची, पर्यायानं आगामी उत्सवाची नोंद घेतात. उत्सवाची पूर्वसूचना देणारी घटना म्हणजे, स्थानिक वृत्तपत्रांमधून येणारे लेख व 'वाचकांचा पत्रव्यवहार.' 'यंदांचा गणेशोत्सव आगळ्या पद्धतीने कसा साजरा करता येईल' या विषयावर या लेखांमधून आणि पत्रांमधून दरवर्षी तेच तेच मुद्दे मांडलेले असतात. याच मजकुराचा दुसरा भाग म्हणजे सध्या गणेशोत्सव ज्या तऱ्हेने साजरा होतो त्याबद्दल उगीचच कण्हून टिपं गाळणं. साहजिकच इथे विचाराला सहसा थारा नसतो. फक्त 'आज लोकमान्य असते तर...' किंवा 'लोकमान्यांच्या आत्म्याला आज...' असा काही तरी वाचकांच्या भावनेला आवाहन करण्याचा या ठिकाणी प्रयत्न असतो. समाजातल्या चिंतातूर जंतूंचं असं वृत्तपत्रांमधून कुढणं सुरू झालं की गणपती जवळ आल्याची नोंद प्रत्येक पुणेकर करतो आणि पुन्हा शांतपणे आपल्या उद्योगाला लागतो.

सालाबादप्रमाणे यंदाही पुण्यात या दोन घटना घडल्या आणि दोन सप्टेंबरला श्रींची मोठ्या थाटामाटानं प्रतिष्ठापना झाली.

पुणेकरांना रात्र जागवायला या गणपतींनीच शिकवलं, असं कोणी म्हटलं तर ते फारसं वावगं ठरणार नाही. गणपतीचे दहा दिवस शहरातले रस्ते आणि गल्ल्या–बोळही ज्या तऱ्हेनं ओसंडून वाहात असतात, ते पाहून पुणेकर स्वतःवरच खूष होतात आणि बाहेरून येणारे 'पावणे' थक्क होऊन जातात !

हल्ली पुण्यातल्या गणपतींबद्दल अशी तक्रार वारंवार केली जाते (आणि बऱ्याच अंशी ती खरीही आहे) की, वैशिष्ट्यपूर्ण देखाव्यांची भव्यता इथल्या सार्वजनिक गणेशोत्सवांमधून हळूहळू वेगाने लोप पावू लागली आहे. त्याची जागा डोळे दिपवून टाकणाऱ्या विद्युतरोषणाईने घेतली आहे. एकीकडे ही तक्रार खरी जरी असली तरी दुसरीकडे माझ्यासारख्याच्या मनात असाही प्रश्न उभा राहतो की, यात तक्रार करण्यासारखं काय आहे ? देखाव्यांचं क्षेत्र इथल्या गणेशमंडळांनी गेल्या पन्नास–साठ वर्षांत अक्षरशः पिंजून काढलं. रामायण-महाभारत, इतिहास आणि पुराणं, साहित्य आणि शास्त्र, कल्पनारम्यता व अद्भुतता या सर्व पातळ्यांवरचे इतके देखावे पुण्यातल्या गणेशोत्सवमंडळांनी आजवर मांडले होते की, त्यामध्ये आणखी काही लक्षणीय भर घालणं शिल्लकच राह्यलं नव्हतं. हे सारं जवळजवळ saturation point पर्यंत जाऊन पोचलं होतं आणि त्यामुळंच दरवर्षी

→

तेच तेच देखावे मांडले जात आहेत, अशी तक्रार व्हायला लागली होती. त्यावर उपाय म्हणून कोणा तरी कल्पक पुणेकरानं विद्युत–रोषणाईची टूम काढली आणि गेल्या पाच–दहा वर्षांत ती भलतीच पाप्युलर झाली. 'गणेशोत्सव–समीक्षक' जरी या बदलामुळे अस्वस्थ झाले असले तरी सर्वसामान्य पुणेकरानी त्याचंही मनापासून स्वागतच केलं आहे, हे गेल्या दहा दिवसांत शहरातले रस्ते ज्या तन्हेने फुलून गेले होते त्यावरून सहज सिद्ध होत होतं. (आणि इथे कुणा लेकाला देखावे आहेत की विद्युत रोषणाई आहे याची चिंता पडली आहे? त्या निमित्ताने दहा रात्री रस्त्यावर मौज करत काढता येतात हे जास्त महत्त्वाचं! ही चिंता फक्त गणपती पाहण्याच्या निमित्तानं का होईना, रात्री कधीही बाहेर न पडलेल्या घरकोंबड्यानाच भंडावत असते!)

तर सांगायचा मुद्दा असा की, सालाबादप्रमाणे यंदाही शहरातल्या अनेक गणेशोत्सव-मंडळांनी झक्क विद्युतरोषणाई केली होती. अर्थात ती कशी होती. हा काही वर्णन करत बसण्याचा भाग नाही. काही गोष्टी प्रत्यक्ष पाहूनच अनुभवायच्या असतात. आता तुम्ही विचाराल, गेल्या शनिवारी रात्री गणपती पाहात बाजीरावरोडवर भटकत असताना भेटलेली...! आता या काय विचारायच्या गोष्टी आहेत? जसं आपण गणपती पाहतो, देखावे पाहतो, विद्युतरोषणाई पाहतो तसंच...! नंतर वर्णन करत बसण्यात अर्थ नाही.

या विद्युतरोषणाईच्या जोडीला पुणेकरांना रात्रभर जागवत ठेवण्याचं एक महत्त्वाचं साधन म्हणजे सिनेमातल्या गाण्यांच्या तबकड्या. यंदा 'लावारिस' आणि 'एक दूजेके लिये!' या चित्रपटांची गाणी गणरायाला सर्वांत जास्त आवडली होती. त्याच्या जोडीला 'तुमसे बढकर कौन?' असं कोडंही त्याच्या भक्तगणांनी टाकलं होतं.

गणपती विसर्जनाच्या मिरवणुकीमध्ये गणेशभक्त ज्या तन्हेने नृत्ये करतात त्याबद्दलही अनेकांची तक्रार असते; पण तो एक विरेचनाचा उत्तम मार्ग असतो. किंबहुना, अशा प्रकारच्या नृत्याना बंदी घातल्यास समाजातील विकृती व गुंडगिरी वाढेल, असा इशाराही मानसशास्त्रज्ञ देतात!

यंदा पुण्यातल्या गणपतीउत्सवावर धर्मांतराच्या घटनेचं सावट जाणवत होते. अनेक गणेशोत्सवमंडळांनी या विषयावर व्याख्यानं व परिसंवादही आयोजित केले होते. त्यांपैकी लोकमान्यांच्या गायकवाडवाड्यात दोन दिवस झालेला परिसंवाद सर्वांत उत्कृष्ट झाला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, नानासाहेब गोरे, विलास वाघ, सय्यदभाई इत्यादी मातब्बर समाजचिंतकानी या परिसंवादात भाग घेतला. धर्मांतर राष्ट्रविरोधी आहे, यावर बहुतेक सर्वांचंच एकमत होतं व त्याबद्दल वक्त्यांनी चिंताही व्यक्त केली; पण या धर्मांतरामागील कारणं शोधून त्यावर उपाययोजना करण्याच्या गरजेवर तर्कतीर्थ, नानासाहेब, सय्यदभाई इत्यादीनी अतिशय कळकळीनं भर दिला.

सुमारे दहा वर्षांपूर्वी पुण्यातल्या गणेशोत्सवात गायन-वादन, ऑर्केस्ट्रा, चित्रपट, जादूचे प्रयोग इत्यादी कार्यक्रमांची रेलचेल असे. आता त्यांचं प्रमाण पुष्कळच घटलं आहे. गणेशोत्सवमंडळाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह व कल्पनाशक्तीचा अभाव, हे त्यामागचे मुख्य कारण दिसतं. गुणी कलाकार शोधून त्याचे कार्यक्रम आयोजित करण्यापेक्षा विद्युतरोषणाईवाल्याला घाऊक कंत्राट देऊन मोकळ होणं जास्त सोईचं आणि सोपं झालं आहे. गणपतीतल्या देखाव्यांची जागा मात्र रंगीबेरंगी फुलाच्या व थर्मोकोलच्या सजावटीनं घेतली आहे आणि ती निश्चितच स्वागतार्ह आहे.

पुण्यातला गणपति–विसर्जन–सोहळा हा एक केवळ देखण्यालायक प्रकार असतो. लाखो पुणेकरांच्या अदम्य प्रतिसादामुळं हा सोहळा रंगतो. वाटेल ती गैरसोय सोसून अठरा-अठरा वीस-वीस तास मिरवणुकीच्या मार्गावर बैठक मारून बसणारे पुणेकर सर्वांच्याच कौतुकाचा आणि आश्चर्याचा विषय असतो. यंदाचाही विसर्जनसोहळा याला अपवाद नव्हता. रविवारी दुपारी साडेबाराला सुरू झालेली विसर्जनाची मिरवणूक सोमवारी सकाळचे नऊ वाजून गेले तरी चालूच होती. कसबा गणपती, तांबडी जोगेश्वरी, गुरुजी तालीम, तुळशीबाग आणि केसरीवाडा या पाच संस्थाचे मानाचे गणपती मिरवणुकीच्या सुरुवातीला असतात, तर श्रीमंत दगडूशेठ हलवाई व अखिल मंडईमंडळाच्या गणपतीचा मान सर्वांत शेवटी विसर्जित होण्याचा असतो. अर्थात हल्ली मिरवणूक दुसरा दिवस उजाडला तरी चालत असल्याने हे दोन गणपती मध्येच मिरवणुकीत सामील होतात. कारण लाखो पुणेकर रात्रभर त्याच्याच प्रतीक्षेत असतात. एकदा या गणपतींचं दर्शन झालं की रस्त्यावरची बरीचशी गर्दी हटू लागते. त्यामुळं त्यानंतर येणाऱ्या गणपतीची रोषणाई कित्येकदा उत्कृष्ट असूनही तिला दाद मिळू शकत नाही.


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकविसावे

अंक : सोळावा

१९ सप्टेंबर १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

अखेर सर्व गणपती विसर्जित होतात. मंडळाचे कार्यकर्ते विसावतात. पोलीसखात्याचा जीव भांड्यात पडतो. यानंतरचं वातावरण निराशेचं नसतं; पण सुनं सुनं असतं. कै. दि. बा. मोकाशी यांनी त्यांच्या 'संध्याकाळचे पुणे' मध्ये अशीच एक हृद्य आठवण गणपतिउत्सवावर लिहिताना सांगितली आहे. दि. बा. म्हणतात—

'तळ्यात गणपती बुडाल्यावर आम्ही उदास मनाने परतत असू. कुणी बोलत नसे. उत्सवाचा उत्साह ओसरलेला असे. सगळं हताश वाटे. आमच्यापेक्षा आमच्या चुलत्याचे तोंड उतरे. येताना परत ओढ्यापाशी येईपर्यंत तो कसाबसा धीर धरी. मग हातातले तांब्याचे तबक आमच्या हातात देऊन ओढ्यावर बसून तो डोळ्यातले पाणी पुसे!'

गणपती घरातला असो, वा सार्वजनिक मंडळाचा असो, कोणत्याही गणेशभक्ताची भावना याहून निराळी नसावी!

—प्रतिनिधी

---

मुंबई वार्ता

# बांधील रंगमंच

अनंत काणेकरांनी म्हटलं आहे की, जो माणूस आपल्या वयाच्या विशीत कम्युनिस्ट नसतो, त्याला हृदय नाही आणि पुढे वयाच्या चाळीशीतही जो त्या प्रभावाबाहेर आलेला नसतो, त्याला डोकं नाही! तसं म्हणा हे सर्वच राजकीय विचारप्रणालीबद्दल खरं आहे; पण कम्युनिस्टाबद्दल हे अधिकच जाणवतं की, कम्युनिझम हा त्या माणसाचा समग्र जीवनाकडे बघण्याचा चष्मा असतो. कम्युनिस्ट माणसाची समाजजीवन आणि अर्थव्यवस्थेकडे बघण्याची खास पठडीतील दृष्टी तर सर्वज्ञातच आहे; पण त्याच बरोबर शिक्षण, व्यासंग, विद्याकला, वाङ्मय याही साऱ्या जीवनव्यवहारांचं ते आपल्या खास वैचारिक संदर्भात विश्लेषण करत असतात. त्यात कोणतं परिवर्तन त्यांना अभिप्रेत आहे, तेही सांगत असतात.

आपल्या मार्क्सिस्ट वृत्तीची खासगीत कबुली देणारे किंवा सार्वजनिकरीत्या आपली कमिटमेन्ट मानणारे, आपल्या वाङ्मयाला, कलेला मार्क्सिस्ट तत्त्वज्ञानाची बैठक किंवा डूब देणारे लेखक, कवी, कलाकार आपल्याला परिचित आहेत. या लोकांचं जग काही निराळंच असतं. मार्क्सिस्ट तत्त्वज्ञानाशी पोथीनिष्ठ बांधिलकी मानणारा हिंदी नाट्यक्षेत्रातला एक ग्रुप मुंबईत आहे. 'अवामी रंगमंच' हे त्याचं नाव. त्यांच्याच शब्दात सांगायचं तर हा कमिटेड नाटक करणारा कमिटेड ग्रुप आहे. सध्या गॉर्कीच्या 'मदर'चं हिंदी नाट्यरूपांतर आणि त्याच्या तालमी या गडबडीत अवामी रंगमंचवाले आहेत; पण त्याचबरोबर आपल्या वैचारिक भूमिकेचा पाठपुरावा करण्यासाठी त्यांच्या चर्चा, स्टडी सर्कल्स किंवा तसल्याच काही बैठकी नेहमीच होत असतात. अवामी रंगमंचाच्या परवाच्या अशाच एका बैठकीत मी भाग घेतला. या कमिटेड लोकांचे विचार आणि त्या विचारांचा त्यांच्या नाट्य-जीवनाशी असलेला संदर्भ हे सारं जवळून पाहिलं.

बॉंबे-आंध्र महासभाच्या स्टेजवर भरलेली छोटीशी बैठक. वातावरण गंभीर. सगळे अपराइट बसलेले. 'इंडिविज्युअल डिसिप्लिन अ‍ॅण्ड टॅलंट' या विषयावर एका मार्क्सिस्ट लेखिकेच्या निबंधाचं वाचन चालू होतं.

डिसिप्लिन आणि टॅलंट या विषयावरचे साधारण मुद्दे प्रथम निघाले की, नट, कवी वगैरे मंडळी आपल्यातल्या टॅलंटला दारूबाजी वगैरे करवून तिचे फाजील लाड करतात. उदाहरणादाखल म्हणून दुभाषी, सैगल इत्यादी. मद्यप्राशनाच्या वैयक्तिक सवयीमुळे प्रेक्षकाशी जो प्रामाणिकपणा असायला हवा, समाजाशी जी बांधिलकी असायला हवी किंवा समाजजीवनात जे परिवर्तन घडवून आणायला पाहिजे, त्या तात्त्विक भूमिकेपासून कलाकार दूर जातो, त्याचं नैतिक अधःपतन होतं. मग चर्चा आणखी खोलात शिरली. लेखकांनी स्वतःला शिस्त लावायला हवी. जे स्वतःला पाहिजे ते न खरडता समाजाच्या इच्छेप्रमाणे आणि गरजेप्रमाणे लिहायला हवं. गटेनं कसं 'डॉक्टर फॉस्टस' सतत साठ वर्षं पुन्हा पुन्हा लिहिलं. ते समाजाच्या समाधानाकरता नव्हे, स्वत:च्या समाधानाकरता. लेखकाचं समाधान महत्त्वाचं की त्याची बांधिलकी महत्त्वाची? कलाकृतीची कलात्मक मूल्य आणि त्याची सामाजिक आशयाशी बांधिलकी म्हणजे एकच का? सोविएट रशियात पुस्तकांच्या प्रसिद्धीवर कडक निर्बंध आहेत आणि 'समाजा'ला पाहिजे असंच वाङ्मय प्रसिद्ध होतं; पण सेन्सॉरबोर्डची, तीच 'समाजाची' इच्छा कशावरून? लेखकाची गळचेपी होत नाही याचा पुरावा काय? असे आडवे तिडवे प्रश्न चक्क कमिटेड माणसाच्या कमिटेड बैठकीतही विचारले जाऊ शकतात हा बहुधा दुर्मिळ अनुभव असावा. उत्सुकता होती ती या सवालाना जबाब कसे मिळतात ते ऐकण्याची, पण जबाब अर्थातच सरळसोट. समाज म्हणजेच सरकार म्हणजेच सेन्सॉर आणि म्हणजेच लेखक. सगळं मुळी एकरूपच. अभिव्यक्ति ही मुळात व्यक्तिगत समाधानासाठी नसून ते समाजपरिवर्तनाच्या दिशेने टाकलेलं एक पाऊल आहे. साम्यवादी समाजरचना निर्माण करणं हेच लेखकापुढचं ध्येय आणि तेच त्याचं व्यक्तिगत समाधान. इतकं ठामपणे सगळं गृहीतच धरलेलं आहे, तेव्हा मतभिन्नता, गळचेपी, व्यक्तिस्वातंत्र्य असले सगळे प्रकार मुळातच इररेलवन्ट ठरतात.

अवामी रंगमंचाच्या या बैठकीत कमिटेड जबाबात मोकळेपणा नव्हता; पण निदान सवालात तरी होताच. निष्ठा तयार करणाऱ्या कुठल्याही राजकीय किंवा सामाजिक विचारांच्या कारखान्यात इतकं तरी स्वातंत्र्य दिसतं का, याबद्दल थोडी शंकाच आहे.

चर्चा संपली मात्र. अवामी ग्रुपमधलं वातावरण झकास सैलावलं. चर्चा संपल्यावर येणारी खेळकर इन्फॉर्मलिटी. सिगरेट—काड्या-पेट्याची देवाण-घेवाण. 'बिल कोण भरणार? आपण तर सारेच प्रोलिटरिएट!' अशी थट्टा-मस्करी करीत मागवलेला चहा. अवामी रंगमंचवाल्यांची नाटकांची निवडही चांगली. नुकतंच त्यांनी इब्सेनचं 'घोस्ट्स' 'अतीत की परछाइयाँ' म्हणून सादर केलं. त्याचं वैशिष्ट्य हे की, त्याची नाटकं ट्रेड युनियन्समार्फत होतात. अवामी रंगमंचाला

'प्रोलिटरिएट' कडूनच अर्थसहाय्य केलं जातं. त्यांची नाटकंही कामगारवस्तीत किंवा कारखान्यांमधूनच केली जातात. हॉट नाटकाना कामगारवर्गाकडून आश्रय मिळतो असा सूर दोन महिन्यापूर्वी मुंबईत झालेल्या एका चर्चेत निघाला होता; पण प्रत्यक्षात कामगारवर्गाची अभिरुची, वैचारिक पातळी बदलण्याची निष्ठा बाळगणारा हा ग्रुप काही करू शकेल असं वाटतं. भारतात सध्या अस्तित्वात असलेल्या कुठल्याही मार्क्सिस्ट पक्षाशी किंवा ग्रुपशी मात्र या मंडळींची काही बांधिलकी नाही. कारण त्यांनीच सांगितल्याप्रमाणे या पक्षाच्या सध्या असंख्य चिरफळ्या उडाल्या आहेत. मार्क्स स्वतः तत्त्वज्ञानी होता आणि मार्क्सवादी नव्हता हे एक बरं; नाही तर यापैकी कशाला मार्क्सिझम म्हणावं याविषयी स्वतः मार्क्सदेखील बुचकळ्यात पडला असता! पण आपल्या विचारांवर निष्ठा ठेवून नियमितपणे काही करणारा असा कोणी ग्रुप पाहिला की, या देशाच्या बौद्धिक जीवनाची थोडी शाश्वती वाटू लागते! ¤

## पृथ्वी थिएटर

काही तात्त्विक बैठक मनात ठेवून चाकोरीबाहेरच्या वाटा चोखाळणारं, वैचारिक नाटकांचं बरंचसं हमखास ठिकाण म्हणजे छबिलदास, हे मराठी प्रेक्षकांना माहीत आहे. हिंदी आणि इंग्रजी नाटकवाल्यांचं असं छबिलदास आहे जुहूला. शशी कपूरनं आपल्या वडिलांच्या नावानं सुरू केलेलं पृथ्वी थिएटर अॅंड वर्कशॉप म्हणजे एक प्रकारचं छबिलदास; पण अतिशय सोफिस्टिकेटेड. थिएटरची इमारत, तिथले नट, नाटककार, प्रेक्षक इथपासून ते तिथल्या इन्फॉर्मल वातावरणापर्यंत सगळ्यात हे सोफिस्टिकेशन जाणवावं. जुहूच्या निसर्गरम्य परिसरात गर्द झाडीमध्ये वसलेलं छोटंसं, टुमदार बैठं थिएटर. इमारत नितांत देखणी आणि कोंडी वाटायला लावणारी. तिथंच छोटंसं पुस्तकांचं दुकान. प्रदर्शनासारखी मांडून ठेवलेली पुस्तकं. प्रसिद्ध चित्रकृतींची मुद्रितं. चोखंदळपणे ठेवलेली वैचारिक पुस्तकं आणि नाटकं. जगाच्या वाङ्मयातले गाजलेलं क्लासिक्स. ह्यात भाषेचं बंधन नाही.

थिएटर म्हणूनही पृथ्वी थिएटर आधुनिक आहे. षट्कोनी आकाराचं वैशिष्ट्यपूर्ण स्टेज. त्याला दर्शनी पडदा नाही. रंगमंचाच्या तीन बाजूंना केलेली बसण्याची व्यवस्था. आतून भिंतीना लावलेला काळा रंग. चोख ध्वनिव्यवस्था. आरामशीर मऊ गाद्यांची आसनं. छबिलदासच्या पार्श्वभूमीवर तर फारच सुखकारक! पण एकूण सगळं अगदी खूपच 'प्रस्थापित' वगैरे वाटू नये, म्हणून आसनक्रमांक देणं चतुराईनं टाळलेलं. पहाटे काकडआरतीला गेलेले भक्तगण कसे गाभाऱ्याचा दरवाजा उघडायची भक्तिभावानं वाट बघत असतात, तसं थिएटरचं दार कधी उघडतंय म्हणून नाटक सुरू होण्याआधी बाहेरच्या व्हराड्यात, पायऱ्यांवर माणसं प्रतीक्षा करत बसतात आणि एकदा दार उघडलं, की...... पुढचे सगळे सोपस्कार कुणाही मुंबईकराला पाठ असतात! गाडी किंवा बस असो, नाही तर थिएटर असो; 'पळा, पळा, कोण पुढे पळे तो' अशी एकच धमाल उडवत हल्ला करायचा! सोफिस्टिकेशन वगैरे वस्तु एवढ्यापुरत्या जरा बाजूला. गावाकडच्या थेट्रात कसं शीटांना नंबर नसतात, तसा इथेही आसनांवर क्रमांक न घालून 'अस्सल ग्रामीण आणि पर्यायानं आदिम जीवनाशी नातं सूचित करणारा इफेक्ट' दिला जातो!

पण परवा रूपवेधनं सादर केलेल्या 'इडिपस'नं कळसच केला. तशी पृथ्वी-थिएटरला गर्दी असते. अधून-मधून काही नाटकं हाउसफुलही असतात; पण इंटिमेसीचं वातावरण असलेल्या या थिएटरमध्ये गर्दी अशी फारशी जाणवत नाही. इथले प्रेक्षक बरेचसे ठरलेले, नियमितपणे येणारे; पण कोणा नाटकात नसिरुद्दिन शाह, शबाना आझमी असे कुणी चकचकते सितारे असले, तर होणारी गर्दी ही अधिक हिंदी फिल्लम इष्टायलची असते! 'इडिपस'चे पाच प्रयोग जाहीर केले होते. पहिल्या प्रयोगाला तिकिटांसाठी भली मोठी रांग आणि तिकिटं काही मिनिटातच संपली. हे एक गौडबंगालच. गर्दी तर मन लावून वाढतेय. इथे 'इडिपस'ची रांग आहे की 'सिलसिला' वगैरेची? याची एकदा जाऊन खात्री करून घेतली. गाडीविडीवालं पब्लिक 'आपल्या न्याय्य मागण्यासाठी' बाह्या सरसावून थेट रस्त्यावर. शेवटी ह्या कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न हाती घेण्यासाठी स्वतः दिग्दर्शिकेला मैदानात उतरावं लागलं!

नाटकाचा प्रयोग बरं समाधान देणारा. सॉफोक्लीजनं तर आपलं काम उत्तमच करून ठेवलंय. दिग्दर्शिकेनंही आपलं काम चांगलं केलं. लेवल्सचा कलात्मक वापर. तसाच प्रभावी वापर काळ्या कपड्यातल्या कोरसचाही. ग्रीक नाट्यपरंपरेतल्या 'इडिपस रेक्स' मध्ये आणि सगळ्याच ग्रीक नाटकांमध्ये कोरस खास महत्त्वाचा असतो. नाटकाची एकसंधता तो टिकवतो आणि नाटकातल्या निवडक घटनांवर भाष्यं करून त्याना उठावही आणतो. वीणा चावलानी बसवलेल्या या कोरसच्या हालचाली फार परिणामकारक आहेत. इंग्रजी सिनेमांमधून बायबल आणि ग्रीक पुराणातल्या कथा आपल्या भेटीला येतात, तेव्हा त्यांच्यासोबत असतात भव्य सेटस्, चांगल्या दर्जाची भाषा. नटांचे चांगले उच्चार आणि योग्य आघात. त्याची दणकट, धिप्पाड आणि छाप पाडणारी शरीरयष्टी. यापैकी कसलीही साथ नसताना आणि नाटकाची कथावस्तूही सर्वज्ञात असताना अशी एखादी कलाकृती सादर करणं ही तशी अवघड परीक्षा आहे; पण दिग्दर्शिकेचं कौशल्य आणि नटवर्गाचा अभिनय यामुळे नाटक प्रेक्षणीय झालं आहे. ¤

मागच्या आठवड्यात 'इंटर्नॅशनल कौन्सिल फॉर टुरिझम' तर्फे मुंबईचे महापौर डॉ. मेमन यांचं एक भाषण झालं. भाषणाचा विषय होता, 'नागरी सुविधा आणि पर्यटक/पर्यटन.' दस्तुरखुद्द भाषण झालं, ते अगदीच छोटंसं आणि फारसं काहीच न सांगणारं; पण त्यानंतरची कौन्सिलची उत्साही सभासदांची महापौरांशी बातचीत आणि महापौरांची पार्लमेंटरी उत्तरं ही मात्र खास होती. ही नंतरची चर्चा टुरिझमशी खास संबंध नसलेली; पण मुंबई शहराच्या जिव्हाळ्याची.

प्रश्न : बेस्टच्या काही बसेस अगदी भयंकर रंगाच्या जाहिरातींनी चितारून ठेवलेल्या आहेत. मध्यंतरी आम्ही त्याबद्दल तक्रार केली, तेव्हा ते बंद झालं होतं; पण सध्या आपलं परत ये रे माझ्या मागल्या.

उत्तर : काय म्हणता! बघू आम्ही ह्या

विषय चर्चेला.

प्रश्न : रस्त्यांच्या नावाच्या पाट्या ठळक का लावल्या जात नाहीत ?

उत्तर : एवढंच ना ! लावून टाकू अशा पाट्या.

एक इंटरेस्टिंग तपशील – मुंबईतल्या सगळ्या रस्त्यांना, अगदी लहान गल्ली-बोळांना आणि चौकांनासुद्धा नावं देऊन झालेली आहेत आणि कुठल्याही महापुरुषाच्या नावाला आता नो वेकन्सी !

प्रश्न : सरकारी कार्यालय मुंबईबाहेर हलवणार म्हणे ?

उत्तर : काही कल्पना नाही बुवा ! महापालिकेची कार्यालये मात्र आम्ही वाद्रयाला हलवणार आहोत.

प्रश्न : रस्ते सुधारण्यासाठी महानगरपालिका काम करते ?

उत्तर : उघड आहे, दुरुस्ती करते. ठेकेदारांकडून दोन वर्षांच्या गॅरंटीनं रस्ते बांधून घेते.

प्रश्न : महापौरपद फक्त एकच वर्षाचं का ?

उत्तर : जास्तीत जास्त जणांना हा बहुमान वाटून घेता यावा, म्हणून.

प्रश्न : रात्रीच्या वेळी बेस्ट बसेस थांब्यावर का थाबत नाहीत ?

उत्तर : सांगू हा आपण त्यांना.

प्रश्न : म्युनिसिपल शाळांचा दर्जा एवढा कमी का ?

उत्तर : तुम्ही तुमची मुलं घाला. बघा आत्ता सुधारतो की नाही दर्जा !

यावर उपप्रश्न नाही !

दोन सुंदर घोषणा मात्र ऐकायला मिळाल्या आणि छान टवटवीत वाटलं. विहार, तानसा, वैतरणा इ. तलावांजवळ पर्यटक बगले आहेत आणि हे स्वस्त आणि मस्त बंगले म्हणे आम जनतेलाही देण्यात येतील ! दुसरं, भांडूपजवळ वृंदावन गार्डन्ससारखी एक भव्य बाग लवकरच होणार आहे.

कौन्सिलच्या इंटरनॅशनल सभासदांना त्या रात्री इन्द्रधनुष्यी स्वप्नं पडली असतील !

– ललिता बर्वे

# बांगलादेश

## निवडणूक आणखी लांबली

वा. दा. रानडे

बांगलादेशमधील अध्यक्षीय निवडणूक दुसऱ्यादा पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामागे बी. एन. पी. ( बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टी ) या सत्तारूढ पक्षाचे कोणते उद्देश आहेत ? पाकिस्तानचे अध्यक्ष झिया-उल हक्क यांनी सत्ता हाती घेताना दोन महिन्यांत निवडणुका घेण्याचे आश्वासन दिले होते; पण त्यांच्या राजवटीला पाच वर्षे होऊन गेली तरी पाकिस्तानात निवडणुका घेण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. बागला देशातील निवडणूक पुढे ढकलण्यामागे तसा उद्देश दिसत नाही. आम्हाला तयारीला अधिक अवधी हवा म्हणून निवडणूक पुढे ढकलावी अशी विरोधी पक्षाचीच मागणी होती. घटनेप्रमाणे नोव्हेंबरच्या पलीकडे निवडणुका लांबवता येणार नाहीत.

अध्यक्षीय निवडणूक होईल पण त्यातून बांगलादेशात खरोखर लोकशाही येणार आहे का की, लोकशाहीचा केवळ देखावा केला जाणारआहे ? हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. सत्तारूढ पक्षाच्या हालचाली लोकशाहीचा देखावा करण्याचे दृष्टीनेच चाललेल्या दिसतात. खुल्या वातावरणात आम्ही निवडणुका घेत आहोत विरोधी पक्षांना प्रचारास पूर्ण वाव दिलेला आहे,असे सत्तारूढ पक्षातर्फे भासविण्यात येत आहे. अध्यक्ष झिया उर रहमान याच्या खुनानंतर लष्करी कायदा जारी करण्यात आला. तो पूर्णपणे उठविला नाही. तरी निर्बंध बरेच सैल केले जाण्याचा संभव आहे; पण हा सारा देखावा आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

खरी आवश्यकता आहे ती झियांच्या राजवटीत जारी करण्यात आलेली घटना बदलण्याची. या घटनेत पार्लमेन्टचे अधिकार मर्यादित केलेले असून महत्त्वाच्या प्रश्नांचे बाब-तीत निर्णायक अधिकार अध्यक्षांनाच दिलेले आहेत. अध्यक्षीय निवडणूक आपण जिंकू असा सत्तारूढ पक्षाला विश्वास वाटतो याचे कारण विरोधी पक्ष विस्कळित आहेत, निवडणुका पुढे ढकलल्याने आपली काहीच हानी होणार नाही. उलट आम्ही तुम्हाला तयारीस अवधी दिला आहे. एवढे करूनही विरोधी पक्षांपैकी कोणी निवडणुकीवर बहिष्कार घालणार असेल तर तो स्वतःचा दुबळेपणा लपविण्याचा प्रयत्न आहे, अशी टीका करायला अब्दुल सत्तार याच्या सत्ताधारी पक्षास संधी मिळेल. आवामी लीग, जातीय समाजतांत्रिक दल यानी निवडणुकीची नवी तारीख मान्य करावी लागेल. नाहीतर आपली विश्वासार्हताच तो गमवून बसतील. विरोधी पक्ष एकत्र येण्याची शक्यता दिसत नाही. तसेच सत्तारूढ पक्षाला एकट्याने आव्हान देण्याएवढे बळही कोणाजवळ नाही.

शेख मुजीबुर रहमान याच्या कन्येने अवामी लीगची सूत्रे हाती घेतल्यापासून त्या पक्षास पाठिंबा वाढत असल्याच्या बातम्या येत होत्या; पण निवडणुकीत भाग घ्यायचा को नाही याबाबत त्या पक्षाचे धोरण अजून स्पष्ट नाही. निवडणुकीत पराभवाची नामुष्की तर पत्करावयाचा नाही आणि निश्चित यशाची तर खात्री नाही. कारण झियानी यापूर्वी घेतलल्या निवडणुकाचा अनुभव लक्षात घेता निवडणूक कितपत खुल्या वातावरणात होईल याचा अवामी लीगच्या नेत्याना शका वाटते. निवडणुकीवर आपण बहिष्कार घालावा आणि संपूर्ण संसदीय लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी आदोलन सुरू करावे असे पक्षातल्या एका गटाला वाटते; पण पक्षाने याबाबतीत अजून निर्णय घेतलेला नाही. अध्यक्षीय निवडणूक आपण लढविली तर लोकाचा पाठिंबा आपल्या उमेदवारास कितपत मिळेल याचाही अदाज नते घेत आहेत आणि विजयाची शक्यता अजमावून निवडणूक लढविण्याचा निर्णय अजूनही घेतला जाईल. विरोधी पक्षानी संयुक्त आघाडी करून सत्तारूढ पक्षाच्या उमेदवाराविरुद्ध एकच उमेदवार उभा केला तर निवडणूक चुरशीची होईल; पण तशी शक्यता दिसत नाही.

सरकारने अध्यक्षीय निवडणूक दुसऱ्यादा पुढे ढकलली ती लोकशाहीबद्दलच्या व विरोधी पक्षाबद्दलच्या प्रेमामुळे नव्हे. विरोधी पक्षाचा

मलपृष्ठ २ वर

## मीनाक्षीपुरम

# मुस्लिम प्रतिक्रिया

रघुपती भट्ट
पेठ वडगाव, कोल्हापूर

श्री. हनिफ मोमीन हे माझे मित्र एका वेगळ्या वातावरणातले आहेत. 'इस्लाम'वर श्रद्धा असूनही त्यांचे कुटुंब बरेचसे लिबरल आहे. मीनाक्षीपुरमला जे धर्मांतर झाले त्यामुळे हिंदु आणि मुस्लिम या दोन्ही बाजूना एक धक्का जाणवला. काही खूश झाले, काही अस्वस्थ झाले, तर काही न विचार करताच संतप्त झाले. श्री. हनिफ याची प्रतिक्रिया काय झाली हे मला बघायचे होते.

वर्तमानपत्रांनी आणि विविध नेत्यांनी इतक्या संमिश्र प्रतिक्रिया आणि वृत्ते दिली आहेत की, त्याचा परिणाम आपल्या विचारशक्तीला सुन्न करणारा आहे. त्यात विचारवंतांची समीक्षा कोणत्या तरी एका बाजूला आपल्याला वळवते.

हनिफ यांची प्रतिक्रिया त्याची अस्वस्थ स्पष्ट करणारी होती. 'धर्मांतर' हे प्रकरण तेवढे बरे झाले नाही असे त्यांना वाटते.

इस्लाममध्ये चातुर्वर्ण्य आदि भेद नाहीत, त्यामुळे इस्लामचे आकर्षण हरिजनांना वाटले असावे. हिंदु समाजामध्ये आपल्याला समानता मिळणे शक्य नाही. शिवाय मुस्लिम धर्म हा हिंदु धर्मापेक्षा सर्वस्वी वेगळा. त्याला कवटाळल्यावर हिंदु धर्मीयांना जाग येईल अशी भावना त्यामागे असावी, असे हनिफना वाटते.

मुस्लिम आक्रमक असतात असा एक समज आहे. कितपत आक्रमक आहेत हा वादाचा मुद्दा होऊ शकेल. हनिफ म्हणाले, 'पण त्या समजानेसुद्धा हरिजन इस्लामकडे आकर्षित होऊ शकतात.'

पण सिकदर बख्त यानी भाजपच्या मेळाव्यात नुकतेच असे भाष्य केलेय की, इस्लाममध्ये भेद नाहीत, पूर्ण समता आहे असे मानणे चुकीचे आहे. इस्लाममध्ये धोबीमुस्लिम, खाटीक मुस्लिम, न्हावी मुस्लिम असे वर्ग आहेत आणि यांना इतर मुस्लिम कमी लेखतात. तेव्हा इस्लाम स्वीकारल्याने आपल्याला समान दर्जा मिळेल असे जर हरिजनांना वाटत असेल तर ती साफ चुकीची समजूत आहे.

सिकंदर बख्त याचे म्हणणे हनिफनी काही अंशी मान्य केले. इस्लाममध्ये असे भेद आहेत. काही मुस्लिम स्वतःला थेट पैगंबराचे वंशज समजतात. अरबस्तानातून काही वर्षांपूर्वी आलेले केरळातील काही मुस्लिम स्वतःला अगदी शुद्ध रक्ताचे समजतात. बाकीचे बाटगे मुसलमान आपल्यापेक्षा कमी दर्जाचे आहेत, असा समज त्यांच्यात आहे, ही गोष्ट खरीच. हजार वर्षे त्यांचे रक्त शुद्ध राहिले असेल असे समजणे मूर्खपणाचे आहे.

पण हनिफच्या मते 'या भेदापोटी इतर मुसलमानांबरोबर जरी ते रोटी-बेटी व्यवहार करीत नसले तरी 'नमाज' च्या वेळी सगळे मुसलमान एकच असतात. मग तो पैगंबरचा वंशज असला काय किंवा काल कन्वर्ट झालेला असला काय, ते शेजारी शेजारी प्रार्थना करतात, एवढी समानता इस्लामने सर्वांना मंजूर केलेली आहे. ही समानता हिंदूमध्ये नाही, ही लक्षात घेण्यासारखी बाब आहे.'

पण हे धर्मांतर टिकाऊ नव्हे, असे हनिफना वाटते. त्यामध्ये त्यांना 'शॉक ट्रीटमेंट'-चा वास येतो. हिंदू समाजाला खडबडून जागे करण्यासाठी म्हणून वापरण्यात आलेला हा उपाय असावा. याला नंतर पुष्टी देणारेही घडले आहे. शंकराचार्य, विश्व हिंदु परिषद, हिंदू एकता वगैरेच्या प्रयत्नांना या धर्मांतरामुळे गती आली, हे सुविख्यातच आहे. या ट्रीटमेन्टने हिंदु समाजाकडून भरपूर सवलती मिळवून घ्याव्यात असा त्याचा बेत असण्याची शक्यता आहे.

*या धर्मांतराने मुसलमानांनी हुरळून जाऊ* नये, असे हनिफना वाटते. मुसलमान भारतात नेहमीच अल्पसंख्यांक राहणार असे त्यांचे मत आहे आणि त्यातून जे अल्पसंख्यांक दंगा करण्याचा प्रयत्न करतात त्यांना बहुसंख्यांकांचा मार खावा लागतो. तेव्हा आपली ताकद ओळखून, आपल्या आवाक्यातच त्यांनी समाधानी राहावे, असा सल्ला हनिफ आपल्या धर्मबांधवांना देऊ इच्छितात.

हरिजन मुस्लिम झाले तरी त्यांच्या धर्मांतरामागे हिंदू धर्मावर त्याचा असलेला राग आहे, मुस्लिम धर्माचे प्रेम नाही. त्यांना हव्या असणाऱ्या सवलती आणि दर्जा मिळाला की, उद्या पुन्हा ते मुस्लिम धर्माचा त्याग करतील. त्यामुळे मुस्लिम आहेत तेथेच राहतील. हिंदूचा बर्थरेट लक्षात घेता मुसलमान या देशात कधी बहुसंख्यांक होतील असे वाटत नाही.

उलट या धर्मांतरामुळे निष्कारण हिंदू आणि मुस्लिम समाजात कडवटपणा निर्माण होईल. त्यामुळे अशा धर्मांतरांना उत्तेजन देणारे अगर त्यामुळे हुरळून जाणारे मुस्लिम 'भ्रमा'त आहेत असे हनिफना प्रामाणिकपणे वाटते.

आणखी एक रास्त भीती त्यांना वाटते. हिंदूंच्यातल्या धर्मवेड्या प्रवृत्तीचे पुनरुत्थान होण्याचे! 'हिंदुस्थान' किंवा 'हिंदुराज्य' व्हावे असे वाटणारे अनेक गट आपल्या देशात आहेत; पण आपल्या देशाची एकंदर प्रवृत्ती ही सेक्युलर किंवा निधर्मी असल्याने त्या राष्ट्रीय प्रवाहात या गटांनी आपल्याला सामावून घेतले आहे. 'हिंदू' धर्मावरचा हा हल्ला या गटानी फार सीरियसली घेतला आणि त्यांना सामूहिक पाठिंबा मिळत गेला तर मुस्लिमाच्या दृष्टीने ते फार धोकादायक आहे.

जोपर्यंत या देशात 'सेक्युलर' राजवट आहे तोपर्यंत या देशातले मुस्लिम सुखी राहतील. तेव्हा ही 'सेक्युलर' राजवट जपणे महत्त्वाचे आहे. या 'सेक्युलर' राजवटीमागे देशाचे 'सेक्युलर' स्पिरिट आहे. या सेक्युलर स्पिरिटला धोका निर्माण करणे म्हणजे आपल्या हातांनी आपल्या पायावर धोंडा पाडून घेण्यासारखे आहे. 'हिंदू' धर्मावर होणारे अशा प्रकारचे धर्मांतराचे हल्ले हे अशा प्रकारचेच आहेत. तेव्हा *'इस्लाम'ने अशा प्रकारच्या प्रकरणांना* मुळीच महत्त्व किंवा उत्तेजन देऊ नये, असे हनिफ यांना कळकळीने वाटते.

यामध्ये जर परकीय पैसा असेल तर तो पैसा आमंत्रित करणारे किंवा त्याचे स्वागत करणारे, या दोन्ही प्रवृत्ती धोक्याच्या आहेत आणि या प्रवृत्तींना आपल्या धर्मबांधवांनी जवळपास थारा देऊ नये, असेही हनिफना वाटते हे लक्षात घेण्याजोगे आहे.

या धर्मांतराने 'मुसलमानां'चे काही तरी चाललेले आहे अशी शंका हिंदूंना येणे साहजिकच आहे, असे हनिफना वाटते.

कारण असे की, सबंध मुस्लिम जगात धर्म आणि परंपरेची लाट पुनश्च वर उठलेली आहे. इस्लामी जगात सुधारणा आणू पाहणाऱ्या प्रवृत्ती आता लोप पावलेल्या आहेत आणि पुनश्च धर्मवेडेपणा, परंपराप्रेम इत्यादी सनातनी वृत्तीचे पुनरुज्जीवन झालेले आहे. भारताचा शेजारी पाकिस्तान या लाटेत केव्हाचाच समाविष्ट झालेला आहे; पण भिन्न संस्कृतींना धर्म एका गाठीत बांधू शकत नाही असे म्हणत स्वतंत्र झालेल्या बांगला देशामध्येसुद्धा या प्रवृत्तींनी जबरदस्त उचल खाल्लेली दिसते. आज-काल मुस्लिम संस्कृती आणि पाकिस्तान यांच्याशी सुसंवाद साधणाऱ्या प्रवृत्ती तेथे उफाळून आलेल्या दिसतात.

तेव्हा त्या प्रवाहाशी जवळीक साधून भारतामध्ये जर अशा प्रकारचे काही घडवावे अशी महत्त्वाकांक्षा जर कोणी बाळगत असतील तर त्यांच्यासारखे मूर्ख तेच, अशा शब्दात हनिफनी त्यांची संभावना केली.

कारण इस्लामिक रिपब्लिकमध्ये काहीही चालू शकते. कारण तेथे त्यांचेच राज्य आहे. भारतामध्ये तशा प्रकारचे काहीही चालणे शक्य नाही आणि तशा प्रकारच्या कृत्यांनी उलटा परिणाम साधला जाण्याचीच जोरदार शक्यता आहे, असे हनिफना वाटते.

अरबी पैशाला काउंटर-अटॅक म्हणून हिंदू दानशूर धनिकांना आपला पैसा वापरता येणे शक्य नाही काय ? दोन नंबरच्या पैशाने आपल्या देशात एक प्रतीअर्थव्यवस्थाच निर्माण झालेली आहे. हा पैसा जर सत्कारणी लावायचे ठरवले तर पैशाच्या धर्मांतराला योग्य प्रतिशह मिळण्याची शक्यता आहे; पण अशा धर्मांतरांना काय अर्थ आहे ?

हनिफ मोमीन यांच्याबरोबर आणखी एक माझे मित्र सिकंदर मोमीन यांनीही मला आपली प्रतिक्रिया ऐकवली. श्री. सिकंदर हे उर्दू माध्यमाच्या शाळेत शिक्षक म्हणून काम करतात. त्यांच्या मते अगदी विचारसुद्धा न करण्याच्या पात्रतेचे हे धर्मांतर आहे. एवढ्या सख्येने धर्मांतरित झालेल्या हरिजनांनी हिंदू आणि मुस्लिम या दोन जमातींमध्ये निष्कारण कटुता निर्माण करण्याचे कार्यच केले आहे, या शब्दातच त्यांनी धर्मांतराची संभावना केली.

आणखी एक मुस्लिम श्री. नूरमहम्मद सुतार यांचेही मत असेच होते.

एकंदरीत या प्रकाराने आमच्या भागातील मुस्लिम अस्वस्थच झाले आहेत, असे मला आढळले आणि अशा प्रकारची धर्मांतरे ही राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने रोखली पाहिजेत, असेच त्या सर्वांचे मत पडल.

'धर्मांतर' ही चिंताजनक बाब बहुतेक साऱ्या नेत्यांनी मनोमन ओळखलेली आहे. कितीही जरी निधर्मीपणाचा आव आणला तरी हिंदूनेते आपण हिंदू-धर्मीय आहोत हे विसरू शकत नाहीत. भारतातल्या बहुतेक पक्षांच्या नेतेपदी हिंदूनेतेच आहेत. त्यांच्या आत खोलवर कोठे तरी झालेली जखम भरून काढणे अवघड आहे.

तेव्हा स्वातंत्र्यप्राप्तीनंतर किरकोळ प्रकार वगळले तर हिंदू-मुस्लिम या देशात सुखात राहात आहेत. 'कम्युनल' स्पिरिटचे प्रकार थोड्या ठिकाणी आहेत. तेव्हा या सुखात 'बिब्बा' घालण्याचे प्रकार आपण सर्वांनीच धिक्कारले पाहिजेत. त्यांचा निषेध केला पाहिजे, अशी भावना मला मुस्लिमात प्रखरपणे आढळली. □

## नामांतर आणि धर्मांतर

मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा प्रश्न पुनश्च जोर धरणार असे दिसते. कारण नामांतर व्हावे असे ज्यांना वाटते त्यांनी त्यासाठी एक वेगळाच उपाय शोधला आहे आणि तो म्हणजे 'नामातर न झाल्यास धर्मांतर !' तसा धर्मांतराचा प्रश्न नवीन नाही. धर्मांतराच्या संदर्भात गेल्या कित्येक दिवसांपासून बातम्या येत आहेत. प्रामुख्याने दक्षिण भारतात व मीनाक्षीपुरमला सर्वांत मोठ्या सख्येने धर्मांतर झाले. त्या बातमीने विषाद वाटला; पण तो हरिजनांनी हिंदूधर्म सोडला म्हणून नव्हे, तर त्यांना तो सोडावा लागला म्हणून. वाईट वाटले ते हिंदूधर्मरक्षणाचा ठेका घेतलेल्या समूहाच्या डोळेझाकीचा व त्यांच्या प्रवृत्तीचा. 'साधना' संपादक ना. ग. गोरेंच्या शब्दात, 'एक हजार वर्षे आपल्या देशातील रक्त थेंबाथेंबाने गळून चाललेले स्वतःच्या डोळ्यांनी जो समाज पाहतो, परंतु ती गळती थांबवण्याचा मात्र तो काहीच उपाय करत नाही,' याचे खरे वाईट वाटते.

मीनाक्षीपुरमला ज्या लोकांनी धर्मांतर केले त्यांनी कोणत्या धर्मात जावे हा भाग स्वतंत्र मानला तरी त्यांनी आज हिंदू धर्माच्या संदर्भात दुसऱ्या टोकाचा धर्म स्वीकारून, हिंदू धर्मातील वाईट वृत्तीला व ती प्रवृत्ती जोपासणाऱ्यांना चोख उत्तर दिले, असे मला वाटते.

हिंदू धर्मबद्दल आदर असतानाही दक्षिणेत ज्या हरिजनांनी धर्मांतर केले त्यांनी वाईट केले असे वाटणे फारसे योग्य नाही. कारण इतके दिवस ते हरिजन राहिले, वाईट वर्तणूक मिळत असतानाही त्यांनी धर्मत्याग केला नाही. हिंदू धर्मीयांना त्यांनी परिवर्तनासाठी अवधीही थोडा नव्हे तर कित्येक वर्षांचा दिला होता आणि म्हणूनच धर्मांतरात त्यानी टोकाचा धर्म स्वीकारल्याने त्यांचे चुकले असे वाटण्यात अर्थ नाही.

पण 'नामांतर न झाल्यास धर्मांतर' ह्या घोषणेने मात्र सखेद आश्चर्य वाटले. कारण दक्षिणेतील लोकांनी हिंदू धर्माच्या जाचाला कंटाळून जे आज केले ते महाराष्ट्रातील लोकानी आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली १९५६ लाच केलेले आहे आणि तेही सखोल चिंतनानंतर ! असे असताना 'नामांतर न झाल्यास धर्मांतर करू' असे ते आज कुणाला उद्देशून म्हणतात, ही धमकी ते कुणाला देतात, हे मात्र समजले नाही. कारण ज्यांनी नामांतराचा आग्रह धरला त्यात बहुसंख्य असे मानणारे आहेत की, आंबेडकरानी त्यांना जनावरासारख्या जगण्यातून माणूस बनवले. त्यांना स्वतंत्र अस्तित्व प्राप्त करून दिले आणि म्हणूनच नामांतराची मागणी करणाऱ्यांत मोठ्या प्रमाणात आंबेडकरांनी स्वीकारलेल्या धर्मानुयायांचा समावेश आहे. बहुसंख्य बौद्ध आहेत.

याउलट नामांतराला अगदी टोकाचा विरोध करणाऱ्यांत, नामांतराचा प्रश्न वापरून ज्यांनी अशोभनीय गोंधळ घातला त्यात, प्रामुख्याने तथाकथित संस्कारित, कर्म-

पृष्ठ २२ वर

# उत्तरमीमांसा : २३ :

स. शि. भावे

## विमामहर्षी अण्णासाहेब चिरमुले आणि त्यांनी जोपासलेली 'वेस्टर्न इंडिया' वृत्ती

सातारा हे आजही छोटे आणि मागासलेले गाव आहे. मग शंभर वर्षांपूर्वी ते कसे असेल याची कल्पना करता येईल. पुणे-मिरज रेल्वेमार्गापासून हे नेहमीच अकरा मैल दूर राहिले आहे. आज रेल्वे जवळ आली आहे. तरीही ती तीनएक मैल दूर आहे आणि कृष्णानदीपलिकडे आहे. पूर्वेला नदीपर्यंत आणि पलिकडे स्टेशनपर्यंत वाढ होण्याला सुरुवात झाली आहे, पण या वाढीचा वेग मंद आहे. अजून पंचवीस वर्षांनीदेखील हे गाव छोटेच राहिले असेल ! कारण, आधुनिक औद्योगीकरणाच्या दृष्टीने वाढावे असे या गावात व गावासभोवती काही नाही.

अशा या छोट्या गावात कर्तबगार पुरुषांची एक मालिका निर्माण व्हावी याचे आश्चर्य वाटते. 'महाराराष्ट्र-मित्र' आणि 'शुभसूचक' ही नियतकालिके सातारला सव्वाशे वर्षांपूर्वी सुरू झाली. नगरवाचनालयही त्याच सुमारास सुरू झाले आणि नंतरच्या लोकोपयोगी उपक्रमांच्या पाठीशी उभी राहिलेली मोठी माणसे आज आठवावी लागतात.

पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेची स्थापना करणारे रावबहादूर काळे; पहिल्या साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष दादासाहेब करंदीकर; वेस्टर्न इंडिया विमा कंपनीची १९१३ मध्ये स्थापना करणारे विमामहर्षी अण्णासाहेब चिरमुले; मुबई लेजिस्लेटिव कौन्सिलचे अध्यक्ष भाऊसाहेब सोमण; रयत शिक्षण संस्था स्थापून शिक्षणक्षेत्रात क्रांती करणारे पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील; आयुर्वेदाचे अत्याधुनिक संशोधनात्मक पुनरुज्जीवन करावे म्हणून आयांग्ल महाविद्यालयाचा विकास करणारे डॉ. मोरोपंत आगाशे; त्यांच्यापासून स्फूर्ती घेऊन शास्त्रशुद्ध औषधींच्या निर्मितीत 'रस' घेणारे डॉ. भाऊराव आगाशे; व्यायामाचार्य क्रांतिकारक भिडेगुरुजी आणि त्यांचे सच्छिष्य व्यायामसंघटक दत्तोपन्त परांजपे; मूळ क्रांतिकारक पंथाचे व सात वर्षे चक्की पिसून आल्यावर होमिओपाथीचे सूक्ष्म संशोधन करणारे डॉ. वा वि. आठल्ये; पातांजलयोगाची व्युत्पन्न मीमांसा करणारे कृ. के. ऊर्फ बाबा कोल्हटकर; राष्ट्रीय परंपरेतून कम्युनिस्ट झालेले नाथ घाणेकर आणि कॉ. विष्णुपंत चितळे; गजानन व्यायामशाळेची स्थापना करणारे भीमकाय गणपतराव साठे; लोकशाहीर दामूअण्णा एकबोटे; समर्थ सेवा मंडळाचे दक्ष अध्यक्ष बन्याबापू गोडबोले; ट्रस्टी कंपनीत प्राण ओतणारे साहित्यिक शि. गो. भावे; अस्पृश्यांत सर्वप्रथम काम करणारे प्रो. श्री. म. माटे आणि साहित्य व नाटक अशा दोन्ही अकादम्यांची पारितोषिके मिळवणारे नटवर्य चिंतामणराव कोल्हटकर...

१८८० पासून १९४०-४५ पर्यंतच्या काळात या छोट्या गावाने जी एकापेक्षा एक कर्तबगार माणसे समाजसेवेसाठी दिली त्यांच्यापैकी वरील नावे ही केवळ काही दिग्दर्शनात्मक नावे आहेत. स्वातंत्र्यापर्यंत सातारची लोकसंख्या चाळीस हजाराच्या आतच होती, शंभर वर्षांपूर्वी ती सुमारे पंधरा ते वीस हजार होती. प्रश्न पडतो तो हा की, एवढ्या छोट्या लोकसंख्येतून इतकी सेवाभावी आणि कर्तबगार माणसे कशी निर्माण झाली ?

सर्वसाधारण लोकसंख्येशी कर्तबगार व लोककार्य करणाऱ्या मंडळीचे प्रमाण किती असते ? हे प्रमाण केव्हा वाढते व केव्हा घटते ? व का ? हे प्रश्न समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी किंवा सामाजिक इतिहासकारांनी सोडवायचे आहेत. या संशोधकांनी, पन्नास ते शंभर वर्षांपूर्वीच्या काळातील या घटनेचे संशोधन करायला हवे आहे.

कारण असे की, लोकसंख्या कमी, पण कर्तबगार माणसे बरीच, ही घटना केवळ सातारा गावापुरतीच मर्यादित नाही. साताऱ्याप्रमाणे सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, जळगाव, अकोला, अमरावती अशा इतर जिल्ह्याच्या ठिकाणी लोककार्य करणाऱ्या कर्तबगार मंडळीच्या फळ्या १९३० ला संपणाऱ्या पन्नास वर्षांत उभ्या राहिल्या होत्या.

केवळ जिल्ह्याच्या ठिकाणीच नव्हे तर पेण, पनवेल, वाई यांसारख्या आणखी छोट्या गावातही कर्तबगार माणसांचे पीक त्या काळात आलेले दिसते. पेणचे कटलरी कारखाना काढणारे काकासाहेब मनोहर, पनवेलचे रामभाऊ मंडलिक, किंवा वाईचे केवलानंद सरस्वती (नारायणशास्त्री मराठे) व त्याचे प्रकांडपंडित शिष्य तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ही अगदी सहजपणाने आठवणारी नावे.

¤

या थोर पुरुषांच्या लोककल्याणाच्या कार्यात विविधता होती; परंतु त्यांच्या अंगच्या गुणवत्तेत आणि त्यांच्या कार्यपद्धतीत एकाच प्रकारची शिस्त आणि एकाच प्रकारचा मूल्यभाव आढळतो.

स्वत:ची शारीरिक क्षमता आणि बौद्धिक गुणवत्ता या दोन्हीकडे कटाक्षाने लक्ष पुरविणे हा या मंडळीचा पहिला विशेष. स्वत:चे व्यक्तिमत्त्व हे अंगीकृत कर्तव्याचे साधन आहे आणि हे साधन सदासर्वदा घासूनपुसून, तेलपाणी देऊन चकचकीत, लखलखीत आणि धारदार ठेवले पाहिजे, अशी या कटाक्षामागील भूमिका होती.

आपल्या बुद्धीची केवळ गुणवत्ता व प्रत उंच दर्जाची असून समाधान नाही, तर तिचा आवाकाही व्यापक आणि विस्तृत असला पाहिजे, असा दुसरा आग्रह या मंडळीचा दिसतो. यापैकी प्रत्येकाची एक किंवा दोन ज्ञानक्षेत्रे ही खास अभ्यासाची असत आणि इतर सात-आठ क्षेत्रे उपोद्बलक असत. यामागे विचार असा दिसतो की, जो

जो इतर क्षेत्रांचे ज्ञान वाढेल तो तो आपल्या खास क्षेत्राचे ज्ञान अधिक पक्के, अधिक खोल आणि अधिक अर्थपूर्ण होईल.

याचा तिसरा विशेष असा दिसतो की, आपला प्रपंच स्वावलंबनाने नेटका करायचा. त्यासाठी दिवसाकाठी ठराविक वेळ व ठराविक श्रम द्यायचे. पूर्ण वेळ लोककार्य व त्यासाठी कोणत्या तरी मार्गाने निर्वाहवेतन हा नंतरचा पक्ष त्यांना मान्य नव्हता.

चौथा विशेष म्हणजे, उपजीविकेसाठी खर्च होणाऱ्या वेळानंतर व श्रमानंतर उरलेला वेळ आणि उरलेली श्रमशक्ती ही मंडळी स्वतः निवडलेल्या एखाद्या लोकोपयोगी कामासाठी देत. येथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. उरलेला वेळ म्हणजे फावला वेळ अशी कल्पना नव्हती.

या सर्व मंडळींचा दिनक्रम पाहिला तर आश्चर्यकारक रीतीने ध्यानात येते की, ही सारी मंडळी दोन दोन पूर्ण वेळची कामे एकेकटयाने करीत होती. उपजीविकेसाठी जर सात-आठ तास काम केले तर तेवढेच, म्हणजे सात-आठ तास काम अंगीकृत उद्योगासाठी ही मंडळी करीत असत. त्यांचा कामाचा दिवस हा सोळा ते अठरा तासाचा असे.

त्यांचा पाचवा आणि या विवेचनापुरता शेवटचा विशेष म्हणजे, असे सोळा—अठरा तास कामात मग्न राहण्यात या मंडळींना स्वतःचे असे समाधान मिळत असे. नव्हे, स्वतःच्या कामात ही मंडळी मोठ्या मस्तीने गर्क झालेली असत. सोळा-अठरा तास काम करून ते दमत नसत किंवा त्यांना कंटाळा येत नसे. उलट त्यांचा उत्साह वाढतच असे; असे त्यांचे दीर्घ आयुष्य आणि दीर्घ आरोग्य यावरून दिसून येते.

या मंडळींसंबंधी विचार करू लागले म्हणजे काही प्रश्न उभे राहतात. या मंडळींना हा अखंड उत्साहाचा झरा कसा काय सापडला होता? त्यांची चिकाटी ऐंशी-नव्वद वर्षांपर्यंतही कशी टिकून राहिली? घरचे खाऊन लोककार्याच्या जास्तीत जास्त भाकऱ्या भाजताना त्यांना कधी वैताग कसा आला नाही? कामातूनच उत्साह आणि त्या उत्साहातून पुन्हा काम, असे यांचे तपश्चक्र शेवटपर्यंत अथकपणे कसे चालू राहिले?

त्यांना कार्याचे फल ( reward ) असे काय मिळाले? पैसा, सत्ता, लोकप्रियता, मुला-बाळांना सुसंधी-अशा व्यावहारिक रूपात तर काहीच मिळाले नाही. गाव–प्रांत–राष्ट्र अशी त्यांच्या कार्याची क्षेत्रे विस्तारत गेली; पण त्यांचे व्यक्तिमहात्म्य तसे विस्तारत गेले नाही. कार्य हाती घेताना या मंडळींनी स्वतःला त्या कार्याचे साधन मानले. कार्य विस्तृत आणि विकसित होतानाही स्वतःला त्यांनी साधनच मानले. कार्याचे महत्त्व स्वतःला म्हणजे साधनाला कधी येऊ दिले नाही. मग कार्यापेक्षा स्वतःचे महत्त्व अधिक असे मानण्याची सुतराम् शक्यताच नव्हती.

बाहेर दिसणारे असे काही फळ दाखविता येत नाही; पण मनोमन यांना काही फळ मिळत असावे. काय असेल ते फळ? मनाची तृप्ती? शांतता? कर्तव्यपूर्तीचे समाधान? असे एकाच कल्पनेवर बोट ठेवून या फळाचे वर्णन करता येईल असे काही दिसत नाही! ¤

परवा, २९ ऑगस्टला, स्व. वासुदेव गणेश ऊर्फ अण्णासाहेब चिरमुले यांची तिसावी पुण्यतिथी जरा बोलकेपणाने साजरी झाली. युनायटेड वेस्टर्न बँकेने, सातारला, आपल्या मुख्य कचेरीत, त्यांचे पूर्णाकृती तैलचित्र या प्रसंगाने लावले आणि संस्थापकाची आठवण जागी केली. युनायटेड वेस्टर्नचे सध्याचे अध्यक्ष श्री. वि. श्री. ऊर्फ बाबासाहेब दामले यांनी हे स्मरण ठेवून मोठी औचित्यबुद्धी प्रकट केली आहे. यामागे बँकेचे पूर्वी दीर्घकाळ अध्यक्ष असलेले श्री. रा. ना. ऊर्फ बन्या बापू गोडबोले यांची प्रेरणा असणार याची खूण संबंधितांना पटेल.

या प्रसंगाने वरील विचार मनात आले आणि मुख्यतः ते अण्णासाहेब चिरमुले यांच्या संबंधात येत गेले.

सातारला लहानपणी अण्णासाहेबांना पाहिले त्या वेळीच ते गावात एक आख्यायिका झाले होते.

अजिंक्यताऱ्याच्या अर्ध्या उतारावर माचीला ते राहात. वेस्टर्न इंडिया विमा कंपनीची कचेरी पायथ्याशी सपाटीला भवानी पेठेत होती. अण्णासाहेब रोज दोनदा 'खाली' येऊन 'वर' जात. चाल धीमी आणि वजनदार. छत्री एका खांद्यावर, किंवा चढताना पाठीला आधार म्हणून दोन्ही काखांत आडवी धरलेली. पूर्ण खादीचा पोषाख. कपाळावर सहज दिसेल असे छोटे आवाळू, ओठ झाकणाऱ्या मिशा.

आमचे घर होते त्या यादवगोपाळ पेठेचा चढ (किंवा उतार) फार तीव्र होता. म्हणून यादवगोपाळातून ते उतरत असत. पण चढून परत जाताना मात्र सोमवार पेठेच्या धीम्या चढावरून येत असत. त्यांचे गावात जाणे आणि परत येणे कमालीचे वक्तशीर होते. म्हणजे त्या शाळकरी वयातही तो वक्तशीरपणा जाणवत असे. ते असे जात असताना आम्ही आदराने, दूर राहून, पाहत असू. मात्र त्यांची भीती अशी वाटत नसे.

अण्णासाहेबांसंबंधी ऐकलेली आणि आजपर्यन्त मनावर ठसलेली एक पहिली गोष्ट म्हणजे त्यांचे स्वतःच्या प्रकृतीवरचे प्रयोग. पहाटे उठून फिरायला जाऊन, सूर्योदयापूर्वीच परत येणारे त्या वेळी सातारला पुष्कळजण होते. पण या सकाळच्या फिरण्यातही अण्णासाहेबांचे, विचारपूर्वक ठरवून प्रयोग चालत. शंभर पावले चालणे. नंतर शंभर पावले दुडुदुडु धावणे (सध्याचे Jogging). पुन्हा दोनशे पावले चालणे व धावणे. पुन्हा शंभर पावले चालणे व धावणे, असे शिस्तशीर विभाग करून त्यांचे फिरणे पुरे होत असे.

आहारविषयक असेच प्रयोग. फळे पूर्ण परिपक्व झाल्यावरच खावीत. त्यातील साखर त्या वेळी पूर्ण निर्माण होत असते, असे त्यांचे एक सूत्र होते. त्यामुळे केळे पुरते पिकून पिवळे दिसू लागले की मग ते खात. पेरू खाताना असेच शास्त्र. पेरूचा बियांचा आतला चेंडू ते ठेवून देत. भोवतालचा गर फक्त खात असत. खुद्द आहार किती असावा यासंबंधी त्यांचे असे एक सूत्र असे. माझ्या वडिलांना एकदा ते म्हणाले होते, 'राजाभाऊ, वयोपरत्वे माणसे कमी खातात. म्हणजे पचू शकते तेवढेच खातात; पण हा उलटा क्रम झाला. खरे तर, जे खायचे ते पचवायची आपली तयारी पाहिजे. त्यासाठी तर व्यायाम करायला हवा.'

हा बारीक तपशील एवढ्यासाठी सांगितला की त्यावरून 'शरीरमाद्यम् खलु धर्मसाधनम्' ही त्यांची निष्ठा स्पष्ट व्हावी. या निष्ठेने ८७ वर्षापर्यंत त्यांनी आपले शरीर-मन सदैव ताजे-तगडे ठेवले आणि स्वतः ठरवलेल्या कार्याच्या कारणी लावले. ¤

सातारा स्वदेशी कमर्शियल कंपनी, वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी, युनायटेड वेस्टर्न बँक, वेस्टर्न इंडिया ट्रस्टी अँण्ड एक्झिक्युटर कंपनी, विमा मुद्रक आणि प्रकाशक अशा संस्था त्यांनी स्थापन केल्या. बदलत्या नव्या रूपात, आणि मूळ ध्येयाने, या साऱ्या संस्था आजही काम करीत आहेत.

वयाच्या चाळिसाव्या वर्षी नव्या व्यापारी संस्था काढणे, आणि त्या भरभराटीला आणणे यातच जे यश आहे ते कमी नाही. कल्पकता, धडाडी, चिवटपणा, दक्षता, कार्यक्षमता असे अनेक व्यवहारकुशलतेचे गुण असल्याशिवाय हे यश मिळणे शक्य नाही.

तथापि या व्यवहारोपयोगी गुणांच्या जोडीने, अथवा या गुणांना आधार म्हणून जे ध्येयवादी गुण अण्णासाहेबांच्या कार्यात होते, ते अधिक महत्त्वाचे होते.

स्वदेशी हे त्यांच्या ध्येयांपैकी पहिले ध्येय होते. ते स्वत.पुरते खादीधारी होते; पण स्वदेशीची त्यांची कल्पना अधिक व्यापक होती. देशाचा व्यापार, आर्थिक व्यवस्था सर्वच्या सर्व स्वकीयांनी सांभाळावे असे त्या काळी त्यांचे स्वप्न होते.

स्वकीयानी चालविलेल्या अर्थकारणातून समाजातील सामान्यासाठी आर्थिक स्थैर्य आणि आर्थिक आधार निर्माण झाला तरच त्या अर्थकारणाचा उपयोग, अशीही त्याची धारणा होती. 'आयुर्विमा' ही जबाबदारी इतक्या जुन्या काळी संस्थारूपाने त्यांनी अंगावर घेतली ती या धारणेनेच.

सर्व समाजाने चालविलेली संस्था आणि विश्वस्त भावनेने व्यवस्थापिला जाणारा निधी, ही त्यांच्या व्यवस्थापनाची दोन सूत्रे होती.

पहिल्या सूत्रानुसार, भागधारकाच्या प्रतिनिधीबरोबर विमेदारांचे प्रतिनिधी 'वेस्टर्न इंडिया'च्या संचालक मंडळावर असतील अशी त्यांनी व्यवस्था केली होती. आज जीवनमहामंडळावर विमेदारांचे प्रतिनिधी संचालक म्हणून नसतात. राष्ट्रीयीकरणाचे रौप्यमहोत्सवी वर्ष चालू आहे आणि तरीही 'वेस्टर्न–इंडिया'ची पुरोगामिता 'एलायसी'ला स्वीकारार्ह वाटत नाही.

दुसऱ्या सूत्रानुसार, विमेदारांना कमीत कमी हप्ते भरावे लागावे, विमेदारांना जास्त बोनस मिळावा आणि भाडवली स्वरूपाचा, तसेच व्यवस्थापकीय खर्च कमीत कमी राहावा, अशी त्यांची सदैव दक्षता असे. ही वृत्ती 'वेस्टर्न इंडिया' वृत्ती म्हणून ओळखली जात असे.

'वेस्टर्न इंडिया'चे त्या वेळचे अध्यक्ष भाऊसाहेब सोमण, शंकरराव साठे, मोरोपन्त आगाशे; संचालक बाबूराव वैद्य, स्काउटचे डी. पी. जोशी व मो. ना. नातू, नरूभाऊ लिमये किंवा अधिकारी कृ. य. जोशी, शि. गो. भावे, काशीकर, खांडेकर, नानासाहेब नारळकर आणि कंपनीचा देशभर विखुरलेला सेवकवर्ग या सर्वांमध्ये ही 'वेस्टर्न इंडिया' वृत्ती कमी-अधिक प्रमाणात बाणलेली होती. नंतर निघालेल्या युनायटेड वेस्टर्न बँकेत आजही ही 'विश्वस्त वृत्ती' दिसते. बन्याबापू गोडबोले व सध्याचे अध्यक्ष बाबासाहेब दामले याना हे बाळकडू थेट अण्णासाहेब चिरमुल्यांकडून मिळाले आहे.

यानंतर वेस्टर्न इंडिया ट्रस्टी अँण्ड एक्झिक्युटर कंपनीचे काम सुरू होणे हा 'वेस्टर्न इंडिया' वृत्तीचा स्वाभाविक परिपाक होता. दुर्दैवी घटना घडली आणि विम्याचे पैसे जर अशिक्षित विधवेच्या अथवा अज्ञानाच्या हाती आले तर त्या पैशाची वाट लागण्याचीच शक्यता अधिक असते. व्यक्ती–विश्वस्तदेखील असावे तेवढे भरंवशाचे निघतातच असे नाही. म्हणून संस्था-विश्वस्ताची कल्पना रुजविण्याचे काम शेवटी शेवटी अण्णासाहेब चिरमुल्यांनी हाती घेतले.

¤

आर्थिक व्यवहाराच्या संस्था, कार्यक्षमतेने, सचोटीने, लोकहिताच्या ध्येयाने, आणि मुख्य म्हणजे विश्वस्त भावनेने चालत्या राहाव्या, रूढ व्हाव्या यासाठी चिरमुल्यांनी आपले आयुष्य वेचले. अनेक संस्था स्थापिल्या. कर्तबगार, विश्वासू माणसे जोडून एका वृत्तीची संघटनाच जणू निर्माण केली.

यासंबंधात दोन प्रश्न मनात येतात.

पहिला हा की सध्याच्या 'भारतीय जीवन बीमा निगम'मध्ये 'वेस्टर्न इंडिया' वृत्ती का आढळत नाही? वेस्टर्न इंडियाने १९१३ साली काम सुरू केले त्या वेळी सरासरी आयुर्मर्यादा २२ वर्षे होती. १९७१ साली ही सरासरी ५५ झाली. म्हणजे अडीचपटीने वाढली. म्हणजे आयुर्विम्यातील 'संभाव्य अनपेक्षितता' (risk) कमी झाली; पण या प्रमाणात जीवन बीमानिगमचे विमादाते कमी झालेले नाहीत. १९२० ते ४० या जुन्या काळात 'वेस्टर्न इंडिया' जो बोनस देत होती, त्यावेळच्या किमतीच्या तोडीस तोड बोनस 'निगम' आजही देऊ शकत नाही. त्या वेळी खाजगी विमा कंपन्यांची स्पर्धा होती. आज एकाधिकार आहे. तरीही देऊ शकत नाही. 'निगम'चा व्यवस्थापकीय खर्चही भरमसाठ वाढतो आहे. असे का व्हावे? राष्ट्रीयीकरणाने आधीची विश्वस्तवृत्ती जाऊन तेथे नोकरशाही वृत्ती येणे अपरिहार्य असते काय? पण याचा विस्ताराने विचार पुन्हा केव्हा तरी करावा लागेल.

दुसरा प्रश्न हा की अण्णासाहेब चिरमुल्यांच्या मागे कोणती प्रेरणा होती? छोटया क्षेत्रात मोठे काम करणाऱ्या त्या काळच्या शेकडो स्थानिक नेत्यांची प्रेरणा कोणती होती?

अण्णासाहेब चिरमुल्यांसारखी काही माणसे आपल्या कार्यापेक्षा मोठी होती. इतर माणसे आपल्या कार्याइतका मोठेपणा अंगी आणण्याच्या सतत प्रयत्नात होती. या साऱ्यांची प्रेरणा कोणती होती?

स्वतः अण्णासाहेब चिरमुले यांनी योगित्व प्राप्त केले होते, असे त्यांच्या निधनप्रसंगावरून वाटते. ज्या दिवशी (२९–८–५१) ते गेले त्या दिवशी सकाळपासून त्यांना त्याची कल्पना होती. शेवटच्या श्वासापर्यंत ते चैतन्यशील होते. अखेरच्या क्षणाच्या आधी काही वेळ त्यांनी जमलेल्या मंडळीना भजन करायला सांगितले. ते स्वत.ही भजन म्हणू लागले. भजनाची धून चालू असतानाच त्यांचा समाधानी जीवनक्रम समाधानाने संपला!

या समाधानाची, श्रद्धेची, लोकहितासाठी पूर्ण कर्तव्य भावनेने खपण्याची प्रेरणा कोणती होती? लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी ह्या राष्ट्रपुरुषांच्या आदर्शाने ही प्रेरणा साकार झाली होती असे म्हणता येईल का?

आज, वाढत्या लोकसंख्येत ही प्रेरणा वाढत्या प्रमाणात का दिसत नाही? अपवाद आहेत; पण पूर्वी जो नियम होता, तो आज अपवाद आहे. असे का? या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठीही पुन्हा केव्हा तरी सविस्तर विचार करायला हवा. □

अवतीभवती । शरद कृष्णन्

# इंदिरा प्रतिभा प्रतिष्ठान निधी मुख्यमंत्री निधीमध्ये जमा करावा....

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री अंतुले यांच्या विरुद्ध निरनिराळ्या ट्रस्टसाठी निधी गोळा करण्याबाबत जे आरोप करण्यात आले होते, त्याचे सत्ताधारी पक्षाने लोकसभेमध्ये जोरदार खंडन केले. संसदीय व्यासपीठावर अंतुलेजीना इतक्या पद्धतशीरपणे सांभाळून घेतल्यावर सत्ताधारी पक्षाचे केन्द्रीय-नेते अंतुलेजीना सांभाळून घेतील असे वाटले होते; पण त्यांचा जोरदार बचाव करून केवळ दोनच दिवस जातात आणि लगोलग त्यांच्या उचलबांगडीची बातमी येते याचा अर्थ काय समजायचा ? अंतुलेजींची जर हकालपट्टी करायची होती तर लोकसभेमध्ये त्यांचे एवढे जोरदार समर्थन कशासाठी केले ? वृत्तपत्रे आणि विरोधी पक्ष स्वस्थ बसणार नाहीत, अशी खातर जमा झाल्यामुळे हा निर्णय घेतला की काय ? अर्थात इंदिराजींच्या कार्यपद्धतीबाबत कोणतेही संकेत नसतात. त्या विशिष्ट वेळी जे योग्य वाटेल ते करायचे आणि पुढे जायचे असा त्यांचा खाक्या असतो. इंदिरा प्रतिभा प्रतिष्ठान आणि अन्य ट्रस्ट यांची प्रकरणे सोलपटून जनतेसमोर येणे आपल्या पक्षाच्या हिताचे नाही. याबाबत इंदिराजींची खातरजमा झाली असल्यानेच अंतुलेजींच्या उचलबांगडीबाबतच्या हालचाली त्वरेने झाल्या असाव्यात.

आज देशात विरोधी पक्षाची ताकद ती काय ? पण संख्याबळाने नगण्य असूनही विरोधी पक्षांनी, अंतुलेजींनी ज्या पद्धतीने या इंदिरा प्रतिभा प्रतिष्ठान व अन्य ट्रस्टसाठी निधी गोळा केला, त्या विरुद्ध जोरदार रान उठवले. देशामधील सर्व प्रमुख वृत्तपत्रांनी या संदर्भात अंतुलेजींच्या विरोधी भूमिका घेतली. इंडियन एक्सप्रेसने हे प्रकरण तर इतके सातत्याने लावून धरले की, या प्रकरणी जनप्रक्षोभही झपाट्याने वाढीस लागला. संसदेमध्ये अंतुलेजींचे निर्लज्ज समर्थन केले गेले तरी विरोधी पक्ष खचला नाही. अर्थमंत्री व्यंकटरामन यांच्या विरुद्ध हक्कभंगाचे ठराव दाखल करण्याचे प्रयत्न त्यांनी केले. लोकसभेमध्ये त्यांच्या या प्रयत्नांना मुळीच यश आले नाही. तरी राज्यसभेमध्ये हे हक्कभंग प्रकरण धुमसले. राज्यसभेचे, पदसिद्ध अध्यक्ष उपराष्ट्रपती हिदायतुल्ला यांच्या कारकीर्दीचा मोठा भाग कायद्याचा अर्थ लावण्यात खर्ची पडला आहे. त्यांनी हे हक्कभंग प्रकरण बाजूस सारण्यापूर्वी बराच विचार केला. खेरीज विरोधी पक्षानी महाराष्ट्र विधानसभा व विधान परिषद येथेही या प्रकरणी जोरदार चर्चा घडवून आणली. इतकेच नव्हे तर वृत्तपत्रातून या प्रकरणाची पुरेशी चर्चा झाल्यावर चाचणी जनमत-कौल घेऊन जनमत अंतुलेजींच्या विरोधात असल्याचे दाखवून देण्यात आले. भारतीय जनता पक्षाने पुण्यामध्ये रस्त्यावर फॉर्म्स वाटून जनतेकडून प्रतिक्रिया मागवल्या. २३७४ मंडळींनी याबाबत आपले मत व्यक्त केले आणि २३७४ पैकी १७३४ जणांनी– अंतुलेजींनी आता जावे अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. या जनमत चाचणीला फार मोठी व्यापक बैठक आहे असे नव्हे, परंतु जागरूक नागरी मतदारांची प्रतिक्रिया या कौलामुळे नोंदवली गेली असे म्हणणे अवाजवी ठरू नये. वारे कोणत्या दिशेने वहात आहे, हे लक्षात आल्यावर आणि अंतुलेजींचा आणखी पाठपुरावा करणे त्रासदायक होईल याची खातरजमा करून घेतल्यावरच इंदिराजींनी या प्रकरणी अखेरचे निर्णय घेतले असावेत.

अंतुलेजी जाणार असे म्हटल्यानंतर स्वाभाविकपणे प्रश्न निर्माण होतो की, आता महाराष्ट्राची सत्तासूत्रे कोणाच्या हाती सोपवणार? आज तरी दिल्लीमध्ये अनेक नावाची चर्चा चालू आहे. त्यामध्ये माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण व वसंतदादा पाटील यांचीही नावे आहेत. खेरीज अंतुलेजींच्या सहकाऱ्यांपैकी फक्त रामराव आदिक यांचेच नाव घेतले जात आहे. खेरीज संरक्षण-उत्पादन मंत्री शिवराज पाटील व राज्यसभेमधील इंदिरा काँग्रेसचे उपनेते एन. के. पी. साळवे यांच्या नावाचाही समावेश आहे. ज्यांनी आपल्या बरोबर मंत्री म्हणून अथवा केंद्रीय स्तरावरील पक्षसंघटक म्हणून काम केले आहे अशा नेत्याची निवड करण्याकडे आजवर इंदिराजींचा कल असला, तरी पुनर्विचारानंतर त्या या प्रकारास फारशा अनुकुल राहिलेल्या दिसत नाहीत. केंद्रस्थानी असलेल्या ज्या नेत्यांच्या नावांचा वर उल्लेख केला आहे त्या नेत्यांपैकी शिवराज पाटील यांच्याकडे त्यांचा कल असला तरी त्यांना मोकळे करणेही अवघड आहे. संरक्षण खात्याला कॅबिनेट दर्जाचा मंत्री नाही. शिवराज पाटील या खात्यात राज्यमंत्री आहेत. त्यांना तेथून हलवणे हितावह नाही. शंकरराव चव्हाण यांच्या नावाचे महाराष्ट्रात मुळीच स्वागत होणार नाही. दादा आणि रामराव आदिक या दोन नावांमधून अखेरची निवड होईल असा अंदाज आहे. विद्यमान मुख्यमंत्र्यांना वाचवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू असले तरी त्यांना यश येणार नाही आणि महाराष्ट्राच्या नेतृत्वात बदल होणार ही दिसती गोष्ट आहे. विधिमंडळ इंदिरा काँग्रेस पक्षाचा कल अजमावला गेला तरी याबाबतीत त्यांना स्वातंत्र्य दिले जाणार नाही आणि नेत्याची निवड अखेर दिल्लीतूनच होईल !

अंतुलेजी मुख्यमंत्री पदावरून हलले तरी त्यांनी निर्माण केलेल्या ट्रस्टबाबतची चर्चा होतच राहील. या ट्रस्टवर ज्यांनी ट्रस्टी म्हणून काम केले त्यांनाही अनेक अडचणींना तोंड द्यावे लागेल. या ट्रस्टवर उच्च न्यायालयाचे दोन न्यायमूर्ती आहेत. त्यांनी ही जबाबदारी स्वीकारलीच कशी असा प्रश्न पडतो. खेरीज अंतुलेजींच्या कार्यपद्धतीची माहिती असूनही महाराष्ट्र मंत्रिमंडळाचे मुख्य-सचिव श्री. पी. एम्. गवई या प्रतिष्ठानवर ट्रस्टी म्हणून आहेत. श्री. गवई हे आय्. ए. एस्. अधिकारी आहेत. मुख्यमंत्र्यांच्या दडपणामुळे त्यांनी ही जबाबदारी स्वीकारली असे मानले तर शासकीय सेवेत असल्यामुळे त्यांच्यावर जी बंधने असतात त्याचे काय ? किमान पक्षी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सचिवांना त्यांनी याबाबत लेखी कळवून त्यांची अनुमती घेणे आवश्यक होते. याबाबतचे संकेत जर त्यांनी सांभाळले नसतील तर त्यांना याबाबत कदाचित शिस्तभंगाच्या कारवाईला तोंड द्यावे लागेल. या ट्रस्टमध्ये महाराष्ट्र शासनाने मोठी रक्कम गुंतवली आहे. खेरीज हाती असलेल्या सत्तेचा वापर करूनच पैसा गोळा करण्यात आला आहे. देणगीदारांनी लाखो रुपयांच्या रकमा अंतुलेंच्या हाती सुपूर्द केल्या, त्या वेळी काही तरी पदरात पडावे, अथवा पडले म्हणूनच या देणग्या दिल्या गेल्या. एवढ्या मोठ्या रकमाचे हे ट्रस्ट खाजगी राहू देणे सयुक्तिक ठरणार नाही. मुख्यमंत्री-निधीमध्ये हा सर्व पैसा जमा करून टाकावा म्हणजे पैसा परत मागण्याचा जो बागुलबुवा दाखवण्यात येतो, त्यालाही पायबंद बसेल

आणि जनतेचेही समाधान होईल. चूक दुरुस्त करण्याचा हा सगळ्यात सोपा मार्ग आहे.

### अंतुलेजींचे भवितव्य काय आहे ?

एखादी वावटळ यावी अशा पद्धतीने अंतुलेजी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले. वर्षादीड वर्षाची त्यांची कारकीर्द चांगलीच गाजली. त्यानी मंत्रिमंडळामधील सहकाऱ्यांची जराही किंमत ठेवली नाही. महाराष्ट्र म्हणजे मी अशा पद्धतीने स्वतःची प्रतिमा तेज ठेवण्याचा सतत प्रयत्न केला. त्यांच्या कार्यपद्धतीविरुद्ध दिल्लीस अनेक तक्रारी करण्यात आल्याच होत्या. अलीकडे म्हणजे हे फंड-प्रकरण चर्चिले जाण्यापूर्वीच सुमारे १५ दिवस इंदिरा कॉंग्रेसच्या खासदारांनी या संदर्भात तक्रार केली होती व अंतुलेजींनी केलेल्या अनेक गैरप्रकारांचा लेखी तपशील श्रेष्ठीसमोर सादर केला होता. तेव्हापासूनच अंतुलेजीचे दिल्लीमधील स्थान पातळ झाले होते. फार काळ ते मुख्यमंत्रीपदी राहणे संभवनीय नाही हे लक्षात घेऊनच त्याना मंत्रिमंडळामध्ये फेरबदल करण्याची परवानगी नाकारण्यात आली. दरम्यान हे फंडप्रकरण जोरात उफाळून आले आणि अंतुलेजींविरुद्ध वातावरण तयार झाले. राजकीय हेतूसाठी त्याचा बचाव करण्याचा प्रयत्न केला गेला तरी त्याचा अधिक पाठपुरवा करणे योग्य होणार नाही अशी इंदिराजींची खात्री झाली आहे. त्यांना मुख्यमंत्रीपदाच्या जबाबदारीतून मोकळे केले, याचा अर्थ त्यांची राजकीय कारकीर्द संपुष्टात आली असा काढणे आततायीपणाचे ठरेल. जनता विसरभोळी असते आणि क्षमाशीलही असते. स्वतः इंदिराजीनाही याचा अनुभव आलेला आहे. खेरीज गैरप्रकारांबाबत भरपूर बदनामी झाली असूनही कृष्ण मेनन किंवा टी. टी. कृष्णाम्माचारी पुन्हा सत्तास्थानी विराजमान झालेच होते; अंतुलेजी यांच्याबाबतही काही काळानंतर असेच काही झाले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. त्यांच्या दोषाबद्दल त्यांना रजा दिली गेल्यावर त्यांना संरक्षणही दिले जाईल. अंतुले यांचे इतर गुणावगुण काय असतील ते असोत; पण ते अल्पसंख्य समाजामधील आहेत याचा विसर पडून चालणार नाही. काही तरी निमित्त करून अंतुलेजींची मुख्यमंत्री पदावरून उचलबांगडी केली अशी भावना मुस्लिम समाजात निर्माण होणार नाही, याची दक्षताही श्रेष्ठींना घ्यावीच लागेल. काही काळानंतर अंतुलेजी केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये दाखल झाले अथवा एखाद्या महत्त्वपूर्ण देशात त्यांची वकील म्हणून नेमणूक झाली तर ते आजवरच्या परंपरेस धरून झाले असेच मानावे लागेल.

महाराष्ट्राचे राजकारण सध्या चांगलेच ढवळून निघाले आहे. सत्तांतराचे वेध लागले असल्याने मुंबई आणि दिल्ली दोन्ही ठिकाणी जोरदार धावपळ सुरू आहे आणि एकेकाळी ज्याच्या मर्जीने हे सत्तांतराचे राजकारण हलत असे ते छत्रपती दिल्लीत बसून हा तमाशा पहात आहेत !

## □ लाला जगतनारायण यांची हत्या

पंजाबमधील राजकारणाला जातीय वळण देऊन शिखांनी जे वातावरण तयार केले आहे, त्यामुळेच लाला जगतनारायण यांच्यासारख्या वृद्ध राष्ट्रवादी शिखाची हत्या झाली. लालाजी स्वातंत्र्यपूर्व काळापासून राजकारणात असून अखेरपर्यंत ते आपल्या वृत्तपत्राद्वारा आपली मते निर्भीडपणे व्यक्त करत असत. जातीय भावनांना हात घालून लोकाना उत्तेजित करणे सोपे असले, तरी त्यामुळेच काही अतिरेकी, विरोधकाना शत्रू समजून विवेक सोडून देतात आणि मग लालाजींच्या हत्येसारखे प्रकार घडून येतात. पंजाबचे पंजाब व हरियाना अशा दोन राज्यात विभाजन केले त्या वेळीही शीख जनमताचा कानोसा घेऊनच ही विभागणी करण्यात आली होती; स्वतंत्र पंजाब निर्माण झाल्यावरही शिखांचे समाधान झालेले दिसत नाही. आता त्यांनी खलिस्तानची मागणी उचलून धरली असून या प्रश्नावर शिखांच्या भावनांशी खेळ खेळला जात आहे. शीखसमाज अनेक व्यवसायाच्या निमित्ताने देशभर विखुरला असला तरी स्वधर्मसंकेताच्या बाबतीत या समाजात एकजूट आहे. धार्मिक भावनांना हात घालून खलिस्तानची मागणी पुढे रेटली जाऊ लागल्यावर लाला जगतनारायण यानी त्याला जोरदार विरोध केला.

कोणत्याही विषयावरील आपली मते निर्भीडपणे व्यक्त करण्याबद्दल लालाजींची ख्याती होती. वयाची ८० वर्षे होऊन गेली तरी तब्येत चांगली असल्याने लालाजींनी वृत्तपत्रीय क्षेत्रामधील आपले काम उत्साहाने चालू ठेवले होते. लोकशाही हक्काचे ते कट्टर पुरस्कर्ते असल्याने त्यांनी आणीबाणीतही जोरदार विरोध केला होता. मूळ धरू लागलेल्या खलिस्तानच्या चळवळीला त्यांनी विरोध करताच त्यांच्या विरुद्ध वातावरण तापवण्यात आले. पण लालाजी डगमगले नाहीत. त्यानी आपले विचार निर्भीडपणे व्यक्त केले. असे करण्यामुळे त्यांच्या जिवाला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्यानेच त्याना पंजाब शासनाने शरीरसंरक्षक देऊ केला होता; पण कायम अशा बंदोबस्तात वावरणे त्याना रुचले नाही. काही काळानंतर त्यांनी शरीरसंरक्षकाला बरोबर घेऊन जाणे बंद केले. अर्थात हत्येचे खूळ डोक्यात भिनल्यावर माथेफिरूंनी त्याच्या शरीरसंरक्षकाला दाद दिली नसती. आणि कदाचित त्याचीही हत्या घडवून आणली असती. हत्येचे राजकारण हे केव्हाही निषेधार्ह असल्याने सर्व राजकीय पक्षानी लालाजींची हत्या करणारांची निर्भर्त्सना केली आहे. विरोधी राजकीय विचार अशा अतिरेकी मार्गांनी दडपता येणार नाही. वैचारिक पातळीवर मुकाबला करूनच आपले म्हणणे पटवून द्यावे लागेल. पण केवळ जनभावनेशी खेळून वातावरण तापवणाऱ्या खलिस्तानच्या पुरस्कर्त्यांना या गोष्टीचे भान राहिलेले दिसत नाही. लालाजींच्या हत्येचा प्रश्न लोकसभेमध्ये उपस्थित केला गेला तेव्हा या हत्येमागे आणि खलिस्तानच्या चळवळीमागे परकीय शक्तीचा हात असल्याचे गृहमंत्र्यानी सांगितले. गृहमंत्र्यांचे हे म्हणणे नाकारता येणार नाही. कारण खलिस्तानचा पुरस्कार करणाऱ्या मंडळींनी आपले स्वप्न साकार करण्यासाठी आपण अमेरिकाच काय पण चीन वा पाकिस्तानकडूनही मदत स्वीकारू, असे जाहीरपणे सांगितले आहे. खलिस्तानच्या चळवळीमागे अथवा लालजींच्या खुनामागे परकीय शक्तीचा हात असो अथवा नसो. पण या हत्येमुळे आधीच गढूळ झालेले वातावरण आणखी तापले जाईल यात संदेह नाही. या खुनाचा तपास लगोलग करून तीन व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. अटक केलेल्या या गुन्हेगारांना खलिस्तानचा पुरस्कार करणाराकडून सहाय्य मिळाले असण्याची शक्यताही नाकारता येत नाही. पंजाबचे मुख्यमंत्री दरबारसिंग यानीही तशी शंका व्यक्त केली आहे.

खलिस्तानची चळवळ केवळ शक्तीचा वापर करून मोडून काढणे सयुक्तिक नसले, तरी या चळवळीचे पाठिराखे राष्ट्रीय हितसंबंध धोक्यात येतील अशा पद्धतीने काम करू लागल्याने या चळवळीचा पुरस्कार करणाऱ्याविरुद्ध कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. त्यातच लालाजींची हत्या झाल्याने अशा स्वरूपाच्या कारवाईची नितांत आवश्यकता निर्माण झाली आहे. देशासमोर अनेक गंभीर प्रश्न असताना आणि देश आर्थिक संकटातून जात असताना अराष्ट्रीय प्रवृत्ती जर डोके वर काढू लागल्या तर त्याचा बंदोबस्त करण्याचे कर्तव्य शासनाला पार पाडावेच लागेल. लालाजी हे झुंजार पत्रकार व स्वातंत्र्यसैनिक होते. निखळ राष्ट्रवादी असल्याने परिणामांची तमा न बाळगता त्यानी आपले कर्तव्य बजावले. त्यांचे सुयोग्य स्मारक उभारून पंजाब शासनाने त्यांच्या कार्याचा गौरव केला पाहिजे. □

# 'कांद्या'ची कथा : चाकण ते निफाड

अरविंद वामन कुलकर्णी, अलिबाग (रायगड)

कांद्याच्या उत्पादनाबाबत भारतात महाराष्ट्र हा अग्रेसर आहे. महाराष्ट्रात सात लक्ष टन कांदा पिकतो. पुणे, नाशिक व सातारा या तीन जिल्ह्यातील काही तालुक्यांत त्याचे आज कित्येक वर्षे सतत पीक घेतले जात आहे. पोळ, रागडा, उन्हाळी अशी कांद्याची तीन 'घराणी' आहेत. 'पूना मीडियम' या नावाने ओळखला जाणारा चाकणच्या परिसरातील टपोरा, गोल-गरगरीत कांदा सर्वोत्कृष्ट समजला जात असून तो परदेशी निर्यात होतो. त्याचे वैशिष्ट्य असे सांगतात की, तो सर्वांत जास्त टिकाऊ असून कालांतराने त्याची बाहेरची एकेकच पाकळी सुकत जाते. एकदम सारा कांदा सुकत नाही. नंबर १, गोलटी, चिंगळी, दुबोळका किंवा जोडकांदा अशी उतरत्या श्रेणीत प्रतीनुसार कांद्याची वर्गवारी केली जाते. नाशिक जिल्ह्यातील कांदा लाल रंगाचा असून पुणे जिल्ह्यातील कांदा लालसर पांढरा असतो. या मानाने सातारा जिल्ह्यातील कांदा जास्त पांढरा असतो. कोकणात होणाऱ्या पांढऱ्याशुभ्र कांद्यापेक्षा घाटावरील कांदा जास्त टिकाऊ आहे.

कांद्याचे पीक पाच महिन्याचे असून त्याचे तयार केलेले रोप ऑगस्टच्या अखेरीस लावण्यात येते. पीक जानेवारी महिन्यात येते. प्रामुख्याने कोरडवाहू जमिनीतून काढण्यात येणारे हे पीक आहे. जिथे बारमाही पाण्याची सोय असेल तिथे याची दोन पिकेही घेतली जातात; पण अशी सोय या भागात फार क्वचित ठिकाणीच दिसते. फेब्रुवारी ते जून हा या पिकाच्या विक्रीचा हंगाम. शेतकरी संघटनेने कांद्याचा उत्पादनखर्च प्रत्येक हेक्टरला रु. ११०५६-०० इतका सांगितलेला आहे. प्रत्येक हेक्टरला जमिनीच्या कसानुसार आणि मशागत वगैरेनुसार कांद्याचे पीक २२५ ते ३५२ क्विंटल इतके येते. म्हणजे एकरी ९० ते १४०-८० क्विंटल पीक येत असून प्रत्येक क्विंटलचा सरासरी उत्पादनखर्च रुपये ५८-८१ ते ३७-७३ इतका होतो.

असा खर्च येत असूनही गेली कित्येक वर्षे शेतकऱ्याला मात्र तो फार कमी किंमतीत विकावा लागत होता. १९७४ ते १९७७ या सालात प्रत्येक हंगामात त्याची किंमत रु. १५ ते रु. ४० प्रतिक्विंटल अशीच होती. हा शेतकऱ्याला फेब्रुवारी ते जून या कालावधीत मिळणारा दर झाला. मात्र कांद्याचे व्यापारी तोच कांदा नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये २०० ते ३०० रुपये प्रतिक्विंटल या भावाने विकत होते. मुळातच कांदा नाशिवंत पीक. दीर्घकाळ तो घरी ठेवणे अशक्य. त्यातच देणी आणि दारिद्र्य यांनी गांजलेला शेतकरी योग्य भावाची वाट पाहू शकत नाही. याचा फायदा व्यापाऱ्यांनी उठविला नाही तरच आश्चर्य! तसेच विवंचनाग्रस्त शेतकऱ्याला कांद्याच्या साठवणुकीची तात्पुरतीही सोय 'छपरी' बांधून करता येत नाही, ही आणखी एक अडचण. शेतातून परस्पर बाजारात कांदा आणणे आणि तोही पोत्यातून न आणता मोकळाच आणणे ही इकडची पद्धत 'अडचणी पोटी जन्मलेली सोय' अशाच स्वरूपाची दिसते. चाकण, लासलगाव, नीरा यासारख्या पेठात शेतकरी प्रामुख्याने ट्रकनेच कांदा आणतो. सुमारे ६-६॥ टन कांदा ट्रकमध्ये मावतो. तो मोकळाच भरलेला असतो. कारण पन्नास किलोला एक पोते असा हिशोब केल्यास शेतकऱ्याला एकरी १८० ते १८२ पोती वापरावी लागतात आणि तीनेक रुपयास एक पोते, हा भाव लक्षात घेतल्यास शेतकऱ्याला त्याचा भाडवली खर्च परवडण्यासारखा नसतो. अलीकडे डिझेलच्या दरवाढीमुळे ट्रकची भाडीही भरमसाट वाढलेली आहेत. शेतकऱ्याला ६-६॥ टनामागे किमान १५०-२०० रुपये भाडे म्हणून मोजावे लागतात!

याबरोबरच दलाल-व्यापाऱ्यांचा चढेल लहरीपणा लक्षात घेतला तर या शोषणप्रक्रियेत शेतकऱ्याचे कसे हाल होत असतील याची कल्पना येऊ शकते. दाराशी आलेल्या शेतकऱ्याच्या मालाकडे नाक मुरडूनच पाहायचे, हा व्यापाऱ्यांनी बनविलेला नि जिवाभावाने पाळलेला सार्वत्रिक नियमच असल्याचे दिसते. साऱ्या देशासाठी जीवनोपयोगीच नव्हे, तर अत्यावश्यक वस्तूची निर्मिती करणारा बळिराजा आपल्या देशात सतत झिडकारला व लुबाडला गेलेला आहे. आपण निर्माण केलेल्या मालाचा भाव ठरविण्याचे स्वातंत्र्य त्याला कधीही लाभलेले नाही. मुळात बहुसंख्य शेतकरी हा निरक्षर, अडाणी. त्यात कमालीचा गरजू. कमालीचा असंघटित. तेव्हा हिंदुस्थानात त्याची संख्या सत्तर टक्के असूनही तो सतत उर्वरित तास टक्क्याकडून नागवला गेलेला आहे. जे इतरत्र इतर पिकाबाबत, तेच या परिसरात कांद्याबाबत होत होते. कांद्याचा दर व्यापारीच ठरवत. त्यात कांद्यात 'खाद' (खराब वा हलक्या प्रतीचा कांदा) जास्त आहे, अशी तक्रार करून तो आणखी खाली ओढण्याचा प्रयत्न करीत. शेतकऱ्याने त्याचे म्हणणे अमान्य केले तर त्याचा माल सर्वजणच नाकारीत. अशा स्थितीत गरजू शेतकरी शरण जाण्यावाचून दुसरे काय करणार? वर्षानुवर्षे हीच परिस्थिती या भागात चालू होती. शेतकऱ्यांतील अस्वस्थता, असंतुष्टता बेताबेताने आकार धरीत होती. ती लक्षात घेऊनच चाकणच्या परिसरातील कांदा पिकविणाऱ्या शेतकऱ्यांनी कैफियत चव्हाट्यावर मांडायचे काम सर्वश्री मामा शिंदे, बाबूलाल परदेशी, शंकर वाघ, गोपाळराव जगनाडे, बेंद्र इत्यादींनी केले. हा सगळी समाजवादी विचारसरणीची स्वतंत्र कार्यकर्ती मंडळी. शेतकऱ्याचे हाल कमी व्हावेत, त्याची कोंडी फुटावी इतकाच हेतू त्याच्या हालचालीमागे;

पण त्यांच्या प्रयत्नांना अपेक्षित असे यश लाभू शकले नाही.

## नवे सूत्र

१९७६–७७ साली श्री. शरद जोशी या भागात आले. विलायतेतील बडी नोकरी सोडून शेतीच्या प्रयोगासाठी ते पुण्याला परतले होते. मिळत असलेल्या उत्तम प्रतीच्या बागायती जमिनीची खरेदी न करता त्यांनी चाकणहून ४–४॥ मैलावर असलेल्या आंबेठाण येथे चोवीस एकर कोरडवाहू जमीन कसण्यासाठी खरेदी केली होती. शरद जोशी या भागात आले आणि त्यांच्या सहवासाने वर उल्लेखिलेल्या कार्यकर्त्या मंडळीच्या हालचालींना एक नेमकी दिशा गवसू लागली. एक नवे सूत्रच सापडले. स्वत: शरद जोशीचा कांदा १९७८ साली चाकणच्या बाजारात आला. त्याची किंमत वीसेक रुपये क्विंटल या दरातच झाली म्हणे !

शरद जोशी तिथली सारी परिस्थिती न्याहाळीत होते.क्रमाक्रमाने साऱ्या गोष्टी त्यांच्या लक्षात येत होत्या. ग्रंथगत अभ्यासाच्या आधारावर भारतीय शेती व शेतकरी यांच्याबाबतीत त्यांच्या मनात तयार झालेल्या विशिष्ट प्रतिमेत आता वस्तुस्थितीचे प्रत्यक्ष रंग भरू लागले. उत्पादनासाठी होत असलेला शेतकऱ्याचा खर्च, तो वेचीत असलेले कष्ट, निसर्ग आणि व्यापारी या दोन लहरी सत्ताधीशांवरील त्याचे दुबळे परावलंबन आणि अखेरीला त्याच्या पदरात पडणारा नगण्य असा अत्यल्प मोबदला, याची त्यांना प्रत्यक्ष अनुभवाने जाणीव होऊ लागली. चाकणच्या परिसरातील कांदा, बटाटा व भुईमूग पिकविणारेच नव्हे, तर भारतातील साडेसहा लाख खेड्यांतून पसरलेला शेतकरी दीनदुबळा, दरिद्री, लाचार, परावलंबी का, या प्रश्नाचे ठोस नि वास्तव उत्तर त्यांना मिळू लागले. शहरी 'इंडिया' नि ग्रामीण 'भारत' याच्यातील दरी त्यांनी नेमकी हेरली. इंग्रज गेलेले असले तरी त्यांची वसाहतवादी वृत्ती शहरानी टिकविली आहे आणि ग्रामीण परिसर त्यांच्या शोषणाचे साधन बनलेला आहे, या त्यांच्या विचाराना इथल्या अनुभवानी प्रत्यक्षाचा आधार दिला.ही परिस्थिती बदलायला हवी असे त्यांना तीव्रतेने जाणवले. त्या दृष्टीने ते शेतकऱ्यांशी बोलू लागले. बेताबाताने शेतकरी त्यांच्याकडे आकृष्ट होऊ लागले. कोणत्याही राजकीय वा तत्सम पक्ष-पंथाचा संपूर्ण अभाव आणि शेतीमालाच्या भावासाठी उत्पादनखर्चाशी सांगड घालू पाहणारी नवी शास्त्रशुद्ध विचारसरणी, यामुळे त्यांच्याभोवती शेतकरी गोळा होऊ लागले. त्यांच्यावरील शेतकऱ्यांचा विश्वास वाढू लागला. आपल्याला जे हवे ते रास्त आहे, शास्त्रशुद्ध आहे आणि त्याच्या प्राप्तीसाठी आपणच झगडले पाहिजे, हे त्यांना पटत गेले. जास्त मागायचे म्हणून काही तरी सुचतील ते भाव, ही पुढारी मंडळीची पद्धत त्यांनाच हास्यास्पद वाटू लागली. योग्य ईप्सित साध्य करण्यासाठी शरद जोशीनी त्यांना सनदशीर मागणीचा आणि त्यानंतर शांततामय सत्याग्रहाचा मार्ग सांगितला.त्यानुसार चाकणच्या परिसरात निव्वळ आर्थिक कारणासाठी लढले गेलेले कांदा-उत्पादक-शेतकऱ्यांचे पहिले ऐतिहासिक आंदोलन १९७८ च्या मार्च महिन्यात उभे राहिले !

¤

१९७७ मध्ये केन्द्र सरकारने कांद्याच्या बाबतीत निर्यातबंदी जाहीर केली. ती पुढे (आंदोलनामुळेच) २५ एप्रिल १९७८ रोजी रद्द करण्यात आली. तरी दरम्यानच्या काळात कांद्याच्या भावावर तिचा फार प्रतिकूल परिणाम झाला. ते जारीने कोसळले.शेतकऱ्याची दैना उडाली. या घसरगुंडीच्या काळात शेतकऱ्याला संरक्षण मिळावे म्हणून पहिले आंदोलन श्री. शरद जोशी यानी मार्च १९७८ मध्ये जाहीर केले.या पहिल्याच आंदोलनाला शेतकऱ्यांनी चांगला प्रतिसाद दिला. मात्र या भागातील 'पुढारी' यापासून अलिप्त राहिले. त्यांचा आजवरचा 'राजकारणा'तील दीर्घ अनुभव लक्षात घेता त्याना अशा 'विनापुढारी' आंदोलनाच्या यशाबद्दल शंका वाटली तर आश्चर्याचे कारण नाही; पण या आंदोलनाने पहिल्या फेरीतच यश मिळविले. योग्य भाव मिळाल्याशिवाय कांद्याची खरेदी-विक्री होऊ द्यायची नाही, ही आज्ञा शेतकऱ्यानी आपल्या साऱ्या गरजा गुंडाळून ठेवून कठोरपणे अंमलात आणली. परिणामी शासनाला त्यांची दखल घ्यावीच लागली. कांद्याला ४५ ते ६० रुपये प्रतिक्विंटल असा भाव मिळाला. या आंदोलनामुळे झालेली ठळक अशी प्राप्ती म्हणजे, शेतकऱ्यांच्या संघटित दडपणामुळे शासनप्रणीत नाफेड या संस्थेला कांदा-खरेदीचे आदेश मिळाले. नाफेडने ४५ ते ६० रुपये या निर्धारित भावाने कांदा खरेदी करणे हा व्यापाऱ्यांच्या एकतंत्री शोषणक्रियेला दिला गेलेला चांगलाच धक्का होता. पहिल्याच आंदोलनाने मर्यादित का होईना; पण यश मिळविले, याचा शेतकरी-वर्गाला आनंद होऊन त्यांचा उत्साह दुणावला. इतर हितसंबंधितांना मात्र अचंबा वाटला. 'शेतकरी संघटना' या स्वतंत्र बिरुदाखाली शेतकरीवर्ग असा एकवटू शकतो हे दृश्यच अभिनव होते. आजवर सोयिस्कररीत्या साऱ्या राजकीय पक्षानी गरज लागेल तसे या शेतकऱ्यांना फक्त वापरण्याचेच काम केले होते. ते स्वत:च्या पायावर उभे राहून आपल्या हक्कांसाठी संघटित होऊ शकतात, हे शरद जोशीनीच प्रथम दाखवून दिले. त्यांचा हा प्रयत्न खरोखरच अपूर्व होता; पण त्याची त्या वेळी दुर्दैवाने घ्यावी तशी दखल घेतली गेली नाही !

अशी आंदोलने पुन्हा पुन्हा करण्याची शेतकऱ्याने सतत तयारी ठेवली पाहिजे, हे जोशी सांगत होतेच. कारण शोषणाला चटावलेले प्रस्थापित 'इंडिया'वाले 'भारतीयां'ना मोकळीक देतील असा आशावाद बाळगण्यात पूर्वानुभावरून अर्थ नव्हता. त्याप्रमाणे मार्च १९७९ मध्ये चाकणाच्या परिसरात शेतकऱ्यांना पुन्हा दुसरे आंदोलन उभे करावे लागले. या वर्षी पीकच कमी आले होते. त्यामुळे शेतकऱ्याला बऱ्यापैकी भाव मिळाले होते. जूनमध्येच तो ८० रुपये प्रतिक्विंटल होता; पण शासनाने नाफेडच्या द्वारे होणारी खरेदी बंद केली म्हणून शेतकरी खवळला. पुन्हा त्याला व्यापाऱ्याच्या वा दलालाच्या ओटीत पूर्णपणे ढकलण्याचाच हा प्रयत्न असल्यागत होते आणि ते त्याला मान्य नव्हते. हे आंदोलनही यशस्वी ठरले. त्याची अखेर नाफेडतर्फे खरेदी सुरू करण्यातच झाली. (या वर्षीच्या नोव्हेंबर-मध्येच कांद्याच्या भावाने ५०० रु. क्विंटल हा उच्चांक गाठला. याचा लाभ इंदिराजींनी निवडणुकीत पुरेपूर उचललाही; पण या भावाचा शेतकऱ्याला लाभ झाला नाही, ते मुद्दाम लक्षात ठेवले पाहिजे. कारण त्याचा कांदा जूनमध्येच यापेक्षा किती तरी कमी भावाने – म्हणजे ८० रुपयांच्या घरात विकला गेलेला होता ! फायदा पुन्हा दलालांचा, व्यापाऱ्यांचाच झाला.)

या वर्षी शेतकरी संघटनेच्या दृष्टीने एक महत्त्वाची गोष्ट घडली, ती म्हणजे शरद जोशींच्या संपादकत्वाखाली मुखपत्र म्हणून साप्ताहिक 'वारकरी' ३ नोव्हेंबर १९७९ रोजी चाकणहून सुरू झाले. श्री. बाबूलाल परदेशी हे 'चाकण प्रिंटिंग प्रेस'चे मालक व संघटनेचे ठळक कार्यकर्ते 'वारकरी' चे कार्यकारी संपादक झाले. पहिल्या अंकातच संघटनेने 'कांदा – ५० पैसे किलो, बटाटा – १ रुपया किलो आणि भुईमूग रु. २–५० किलो' अशा दरात विकण्याचे शेतकऱ्यांना आवाहन केलेले दिसते. (आठवत असेल तर ग्राहकांनी या वस्तूंचे त्या वेळचे बाजारभाव आठवावेत!) 'वारकरी'सारखे एखादे साधन शेतकरी संघटनेला आपल्या नव्या विचारांच्या प्रसारासाठी आवश्यकच होते. पण त्याचाही प्रसार जितका व्हायला हवा होता तितका झाला नाही; एरव्ही शरद जोशींच्या भूमिकेबद्दल शहरवासियांत इतके गैरसमज पसरले नसते. का कोणास ठाऊक, स्वत: शरद जोशींनीही 'शहरी' वृत्तपत्रांतून आपली भूमिका स्पष्ट करणारे लेखनही केले नाही. कदाचित् 'भारत – इंडिया' ही दरीच त्याच्या आड आलेली असावी.

या दोन आंदोलनानंतर १९८० च्या मार्चमध्ये शेतकरी संघटनेला कांद्यासाठी पुन्हा याच परिसरात तिसरे मोठे आंदोलन उभे करावे लागले. या आंदोलनाकडे बरीच खळखळ करून शासनाला तर लक्ष द्यावेच लागले; पण त्याचबरोबर बातमीच्या स्वरूपात का होईना, मराठी वृत्तपत्रांनाही त्याची थोडी-फार दाद घ्यावी लागली.

१९८० साली पुन्हा कांद्याचे भाव कोसळ (वि) ले (गेले). याआधी ४५ ते ६० रुपये दराने क्विंटलभर कांदा खरेदी करणाऱ्या 'नाफेड' नेही ४० रुपये दराने खरेदी सुरू केली. शेतकरी संघटनेने या वेळी सर्व गोष्टी लक्षात घेऊन ५० ते ७० रुपये प्रतिक्विंटल भाव मागितले होते. तिची मागणी पुढीलप्रमाणे होती—

| | |
|---|---|
| २० टक्के खाद (खराब वा निकृष्ट माल) असलेला कांदा | – ५० रुपये प्रतिक्विंटल |
| १५ ,, ,, ,, ,, ,, | – ५५ ,, ,, |
| १० ,, ,, ,, ,, ,, | – ६० ,, ,, |
| ५ ,, ,, ,, ,, ,, | – ६५ ,, ,, |
| ० ,, ,, ,, ,, ,, | – ७० ,, ,, |

चाकणच्या पेठेतील पंचवीसेक व्यापारी – दलालांनीही पत्रक काढून संघटनेच्या या मागणीस जाहीर पाठिंबा दर्शविला. त्यांनी योग्य ते सहकार्यही देऊ केले; पण शासनाची तयारी नव्हती. म्हणून शेतकऱ्यांना आंदोलन करावे लागले. त्यांनी २७ फेब्रुवारीला पुणे – नाशिक हा राजमार्ग बंद केला. हजारो शेतकरी आपल्या बैलगाड्यांसह रस्त्यावर ठाण मांडून बसले. यात चाकणजवळच्या निघोज या गावच्या शेतकऱ्यांचा उत्साह मोठा होता. त्यांनी मारके बैल रस्त्यावरील गाड्यांना बांधले. त्यांना बाजूला सारणे पोलिसांना सर्वस्वी अशक्य होते. पोलीस दलाची फार मोठी पंचाईत या वृषभदळाने केली! या निघोजकर मंडळींचा तर असा आग्रह होता म्हणे की, हजार बैलगाड्या घेऊन सरळ पुण्यात शिरायचे आणि पुण्याची कटीमेखला असलेला लक्ष्मीरोडच बंद करून टाकायचा; तिथे पहाटे पोहोचायचे या हिशेबाने एका रात्री आठेकशे बैलगाड्या चाकणला आल्यादेखील होत्या; पण आंदोलनात कटकटी वाढायला नकोत म्हणून कुणी तरी निघोजकरांची कशाबशी समजूत घातली आणि हा प्रसंग टाळला!

## 'नाफेड' व शेतकरी

मार्चच्या प्रारंभी शरद जोशी चाकणला उपोषणाला बसले. शेकडो सत्याग्रहींना अटक करण्यात आली. त्याच वेळी पुण्याच्या येरवडा जेलमध्ये फार मोठ्या संख्येने कांदा – कैदी ठेवले गेले होते. या काळात घडलेली एक हकीकत त्या परिसरात सारखी सांगितली जाते. चौकशीसाठी आलेल्या नाफेडच्या अधिकाऱ्यांना फेडरेशनच्या ऑफिसात काही तरुण शेतकऱ्यांनी घेराव घालून अडकविले. अधिकाऱ्यांभोवतालचा त्यांचा विळखा काही केल्या सुटेना. शेवटी तिथल्या पोलीस अधिकाऱ्यांनीच चातुर्य लढविले आणि अनवस्था प्रसंग टाळला. तिथून जवळच उपोषणाला बसलेल्या 'साहेबां'ना – हे शरद जोशींचे लोकप्रिय नाव – याचा फार त्रास होईल, तेव्हा तेथून लांब अंतरावर असलेल्या पोलीस चौकीत हा 'घेराव'चा कार्यक्रम करण्यास त्यांनी त्या तरुणांना सुचविले. सर्वांना तिकडे गाडीतून एकदम नेण्याची तयारीही दाखविली. साहेबांना त्रास होईल या जाणिवेने त्या तरुणांनी पोलिसांच्या कल्पनेला मान्यता दिली. सर्वांना पोलिसांच्या जाळीबंद वाहनातून चौकीवर नेण्यात आले. एकेक अधिकारी खाली उतरविला गेला. तो प्रथम आतल्या खोलीत गेला नि तिथून मागच्या दाराशी तयार ठेवलेल्या गाडीने ते सारे अधिकारी पुण्याला पळविले गेले! त्यांच्या पाठोपाठ गाडीतून उतरलेल्या तरुण पोरांच्या लक्षात हा पोलीसी कावा नंतर आला. मग त्यांनीही तो गमतीने घेतला. प्रसंग चिघळू दिला नाही. पुढे नाफेडचे एक अधिकारी श्री. पाटील चाकणला आले आणि त्यांनी वाटाघाटी करून शेवटी ५० रु. ते ७० रु. हा भाव मान्य केला. त्यामुळे शरद जोशींनी उपोषण सोडले.

पण एप्रिलच्या अखेरीस एकाएकी नाफेडने खरेदी बंद केली. चर्चेने सुधारणा झाली नाही तेव्हा शेतकरी संघटनेने पुन्हा आंदोलनाचे दुसरे पर्व सुरू केले. पुन्हा रस्ता रोखण्यात आला. सत्याग्रह सुरू झाला. अटकेचे सत्र सुरू झाले. शासनाच्या या दगा देणाऱ्या कृतीचा निषेध म्हणून शरद जोशींनी पुन्हा उपोषणाला सुरुवात केली. वातावरण चांगलेच तापले. शासनाने एस्. आर्. पी. चा पलटण आणून ठेवली होती; पण या सर्व काळात पोलीस अतिशय संयमाने व जबाबदारीने वागले. शांत आणि नि:शस्त्र सत्याग्रहींवर त्यांनी बळाचा वापर केला नाही, ही उल्लेखनीय गोष्ट म्हणून नोंदावी लागेल! या वेळी पुढारी–गणाकरवी आतून आंदोलन व संघटना फोडण्याचे मात्र जारीने प्रयत्न होत होते. जोशींचे उपोषण चालू असतानाच हवामान पावसाळी झाले. वळवाचा पाऊस केव्हाही कोसळेल अशी चिन्हे दिसू लागली. पाऊस कोसळला की, उघड्यावरचा कांदा भिजून कुजेल अशी परिस्थिती निर्माण झाली. अशा वेळा नेहमीच प्रस्थापितांना आपल्या फोडाफोडीच्या कामासाठी उपयोगी पडणाऱ्या असतात. 'या जोश्याच्या नादाला कशाला लागता? येईल त्या किंमतीला कांदा विकून रिकामे होण्यात खरा शहाणपणा आहे. भिजका कांदा म्हणजे फक्त खताची धन!' असा प्रचार सुरू

झाला. बेताबेताने यावद्दलची कुजबूज वाढू लागली. आज येईल त्या किंमतीला कांदा विकून वाटल्यास नंतर पुन्हा आदोलनासाठी प्रयत्न करावा असा साळसूद सल्लाही काहीजण देऊ लागले. शेतकरी संघटनेच्या दृष्टीने हा अगदी कसोटीचा काळ होता. बहुसंख्य शेतकरी-आंदोलकाच्या मनातही चलबिचल निर्माण होऊ लागली; पण असे केले तर 'साहेब' काय म्हणतील याचा धाक मनोमनी होताच. अशा वेळी लोकांचे मनोधैर्य राखण्याचे, त्यात नवा जोम भरण्याचे महत्त्वाचे काम शरद जोशी याच्या पत्नी सौ. लीलाताई यांनी केले. उपोषणाने अतिशय क्लान्त झालेल्या आपल्या नवऱ्याच्या शेजारी उभे राहून समोर दाटलेल्या प्रचंड शेतकरी समुदायापुढे भाषण देताना त्यानी सागितले की, 'ज्या कोणाला कांदा विकावा असे वाटत असेल त्याने तो जरूर विकावा. इतर काय म्हणतील याचा विचार करू नये; पण सर्वच्या सर्व शेतकऱ्यांनी जरी हे आदोलन सोडायचे ठरविले तरी चांगल्या कार्यासाठी माझ्या नवऱ्याने सुरू केलेले हे उपोषण त्याने सोडावे असे मी म्हणणार नाही ! इतकंच नव्हे तर माझा नवरा, मी, आमची गाडी, दोन बैल आणि डॅशी कुत्रा रस्त्यावर बसू आणि हे आदोलन पुढे नेऊ!' लीलाताईंच्या या निर्धाराचा फार मोठा परिणाम शेतकऱ्यावर झाला आणि घरभेद्याच्या कारवाया धुळीस मिळाल्या, असे चाकणला अनेकजण पाणावलेल्या स्वरानी सागतात !

यानंतर आत्महत्येचा आरोप ठेवून जोशीना अटक करण्यात आली. इस्पितळात करण्यात येणाऱ्या वैद्यकीय उपचारानाही त्यानी साफ नकार दिला. या साऱ्या घटनांचे पडसाद दिल्लीपर्यंत उमटले आणि ६ मेपासून खरेदी सुरू करण्याच्या नाफेडला आज्ञा आल्या. त्यामुळे जोशीनी उपोषण सोडले. त्या क्षणी सर्व काही मिटल्यासारखे वाटल; पण शासन जोशीची आणि शेतकरी संघटनेची आगळीक (?) विसरायला तयार नव्हते. जोशीना १२ मेला या 'आत्महत्येच्या प्रयत्ना'च्या खटल्यात कोर्टापुढे हजर करण्यात आले. नंतर न्यायाधिशानीच त्यांना गैरहजर राहण्याची परवानगी दिली. हा खटला अजूनही चालू असल्याचे कळते. आजमितीस तर जोशीवर तीनेक डझन खटले शासनाने भरलेले आहेत. जोशीचा अपराध काय, तर त्यानी शेतकऱ्यांना शेतीमालास योग्य भाव मागायला शिकविले नि त्यासाठी सत्याग्रहाचा मार्ग सागितला !

सहा मेनंतर नाफेडने खरेदी सुरू केली; पण ती सुधेपणाने नव्हती. त्यात शेतकऱ्याना वाईट वागणूक मिळू लागली. हेतुपुरस्सर अडवणूक होऊ लागली. ताटकळत ठेवण्यात येऊ लागले. माल नाकारण्यात येऊ लागला. सहानुभूती तर नव्हतीच नव्हती. शेतकरी संघटनेकडे सारख्या तक्रारी येऊ लागल्या. त्याची दखल घेऊन संघटनेने नाफेड व शासन याच्याशी बोलणी करण्याचा प्रयत्न केला; पण काही जमले नाही. तेव्हा २१ मे १९८० रोजी चाकण येथे शेतकऱ्यांची एक जगी सभा झाली. त्यात जोशीनी या तक्रारीच्या निवारणासाठी आदोलनाचे तिसरे पर्व सुरू करण्याची घोषणा केली. त्यानुसार २४ मे रोजी पुन्हा 'रास्ता रोको' आंदोलन सुरू झाले. पुन्हा फार मोठ्या प्रमाणावर धरपकड झाली. शरद जोशी, परदेशी, बंद्रे प्रभृती सात नेत्याना पकडून दूर औरंगाबाद जेलमध्ये नेण्यात आले. अन्यायाचा निषेध म्हणून आपल्या गावात मतदान-केंद्रे उघडू देऊ नका, विधानसभेच्या निवडणुकांवर बहिष्कार टाका हा संघटनेचा आदेश मोठ्या प्रमाणात इथल्या ग्रामीण परिसरात पाळला गेला.

१९८० च्या या तिसऱ्या आंदोलनाच्या काळात केवळ चाकणच्या परिसरात कार्यान्वित झालेल्या शेतकरी संघटनेला पाय टेकायला एक नवी भूमी आपोआप लाभून गेली आणि चाकणपेक्षा जास्त जोमाने तिथे शरद जोशीच्या विचाराचे बीज रुजले; पाहता पाहता फोफावलेही !

## नासिक जिल्हा जागा झाला

१९८० च्या कांदा-उत्पादकांच्या तिसऱ्या आंदोलनात चाकणला एक भिडू लाभला. याआधीची दोन्ही आंदोलने शरद जोशी आणि चाकणचे शेतकरी हे मिळून लढले. त्या दोन्हीच्या वार्ता त्याच्या शिवेला शीव लावून बसलेल्या नि कांद्याचेच उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना समजल्याशिवाय, त्याच्यावर परिणाम केल्याशिवाय राहिल्या नाहीत. हे नाशिक जिल्ह्यातील शेतकरी होते. त्याचेही कांद्याच्या पिकाच्या विक्रीबाबतचे अनुभव चाकणकरांसारखेच. तशीच अडवणूक, तसेच शोषण. तसे पाहायला गेले तर आपल्या देशातील कृषिविश्वातील शोषण करणाऱ्यात, शोषले जाणाऱ्यांत नि शोषण करण्याच्या पद्धतीत एक विलक्षण साम्य आहे. शोषण करणाऱ्याची साळसूद नि स्वार्थी भोंदूगिरी, शोषिले जाणाऱ्याचे असहाय्य नि लाचार परावलंबन आणि शोषणाच्या पद्धतीचा धृतराष्ट्री निगरगट्टपणा सारीकडे सारखाच. शेतकरी हा हिंदुस्थानचा सार्वभौम बळिराजा असा तोंडाने अष्टौप्रहर गजर लावलेला, पण प्रत्यक्षात त्याला अधिकाधिक जखडण्याचे, नागविण्याचे प्रयत्न चाललेले !

पिंपळगाव बसवंत, चादवड, निफाड अशा नाशिक जिल्ह्यातील काही ठिकाणचे शेतकरीही जागे झाले. चाकणचे उदाहरण त्यांनी शिरोधार्ह मानले. श्री. माधवराव खंडेराव मोरे, (कै.) माधवराव बोरास्ते यांच्यासारखी माणसे मुद्दाम शरद जोशीना भेटून गेली आणि कांदा-आदोलनाची एक नवी शाखा नाशिक जिल्ह्यात उघडली गेली. ही शेतकरी संघटनेचीच एक वाढती फादी होती. या भागातील आंदोलनात मात्र अनिष्ट गोष्ट घडली. १९ मार्च १९८० रोजी पिंपळगाव बसवंत येथे सत्याग्रही आंदोलकांवर एस. आर. पी. नी गोळीबार केला. त्यात आना कचरू गवारे (रा. पाचोरे) आणि पांडुरंग शंकर निकारे (रा. शिरवड) हे दोन कादा—उत्पादक ठार झाले. आंदोलनाचे एक नेते श्री. माधवराव खंडेराव मोरे याच्यासह आठ माणसे लाठीमारात जबरदस्त जखमी झाली. या घटनेचा सर्वत्र अतितीव्र निषेध झाला. शासकीय चौकशीही झाली. चांदवडला कादा प्रश्नासाठी सहा जणांनी उपोषण केले. त्याचे नेतृत्व माजी आमदार किसनराव डावखर यांनी केले. निफाडला १५ एप्रिलला एक प्रचंड सभा झाली. शरद जोशी त्याला हजर राहिले. त्यांनी नव्या राजकीय पक्षविरहित आणि शेतीमालाच्या भावाबाबतच्या शास्त्रशुद्ध भूमिकेमध्ये जमलेल्या हजारो 'बळिराजा'ना जमा करून घतले. तिथे जमलेल्या साऱ्यांना हे जाणवून गेले की हा नेता वेगळा आहे. आजवर आपण पाहिलेल्या 'भोकमाग्या' नेत्याची ही अवलाद नव्हे. केवळ आमच्यासाठीच आम्हाला काही तरी मागायला सागणारा हा पहिला नेता आहे. त्यात याचे 'कमिशन' वगैरे काही प्रकार नाही, तसे त

पिकांचा उत्पादनखर्च आणि त्यावर रीतसर १२-१२॥ टक्के नफा यांची अपेक्षा करणारे याचे आकडे आजवर कधीही कुणीही असे समजावून दिले नव्हते. त्यांच्यातील काहीजणाना औद्योगिक उत्पादनाचा खर्च अशा पद्धतीने काढला जातो हे ठाऊक होते. पण तीच सर्वमान्य पद्धती शेतीमालाबाबत का नाही, असा सवाल विचारणारे शरद जोशी पहिलेच. नुसत्या शेतकऱ्यांनाच नव्हे, तर शासनाला, पुढाऱ्याना नि अर्थतज्ज्ञ विचारवंतांनाही जोशींची ही चाल नवी व अनपेक्षित होती. या देशात रुजलेले अर्थशास्त्र, ते शिकलेले नि शिकविणारे शिक्षक, ते अवलंबिणारे 'नियोजन'कार, शासनातील अर्थखात्याचे केन्द्रीय वा राज्याराज्यांतील मंत्री, या खात्याचा मंत्रालयीन सचिव-गण या साऱ्यांनीच आजवर ' इंग्रजी' यंत्रोद्योगमूलक अर्थशास्त्रावर स्वतःची जोपासना केलेली. त्याना तर्कदृष्ट्या सुदृढ असलेले शरद जोशींचे हे *'भारतीय' बनावटीचे कृषिप्रधान अर्थशास्त्र* गोंधळात टाकू लागले ! आजवर त्याना असे अर्थशास्त्र न जाणणाऱ्या तथाकथित शेतकरी-पुढाऱ्याना गुंडाळणे सहज जमलेले होते. शेतकऱ्यांची मुकी तोंडे तर ते सहज आवळू शकत होते. पण हा शरद जोशी वेगळाच नेता होता. त्याच्याबाबतीत अर्थशास्त्रीय अगडबंब तत्त्वे, आकड्या-हिशेबांचा चक्रव्यूह किंवा 'आतली' दाने-देणग्या वगैरे कोणत्याच मात्रेचा इलाज चालण्यासारखा नव्हता. मुख्य म्हणजे त्याच्या स्वार्थशून्यतेचा शेतकऱ्यांना विश्वास वाढत चाललेला. ते वाढत्या संख्येने त्याच्या विचारांमागे उभे राहात चाललेले. यामुळेच शरद जोशींनी चाकणच्या परिसरातील शेतकऱ्यांप्रमाणे नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांचीही मने जिंकली. त्यांना शेतकरी संघटनेच्या कामात समाविष्ट करून घेतले.

## ३०० रुपये भावाचा ठराव

त्याच्या या साऱ्या धडपडीचा आणि तिला शेतकऱ्यांकडून मिळालेल्या अनुकूल पावतीचा पुरावा १९८० च्या १५ ऑगस्ट या स्वातंत्र्यदिनी दिसतो. निफाडला या दिवशी कै. भाऊसाहेब हिरे यांच्या नावाने उभारलेल्या नगरात एक प्रचंड शेतकरी-मेळावा भरला. शरद जोशी (शासनाने चिकटविलेल्या नि लादलेल्या एकाहून एक भयानक आरोपांसह) त्याला हजर राहिले. त्यांनी शेतकऱ्यांना उद्देशून एक भाषणही दिले. ही सभा ऊस-उत्पादकांची होती. त्या मेळाव्यात उपाध्यक्ष श्री. प्रल्हाद कराड पाटील यांनी एक ऐतिहासिक ठराव मांडला-'उसाचा उत्पादनखर्च लक्षात घेता शेतकऱ्याला उसाचा किमान भाव प्रतिटन रुपये ३०० मिळालाच पाहिजे.' त्या वेळचे साखरमहामंडळाचे अध्यक्ष कै. माधवराव बोरास्ते यांनी त्याच्या समर्थनार्थ मोठे भाषण केले. इतरही वक्ते बोलले आणि हा ठराव एकमताने पास करण्यात आला. नाशिकच्या परिसरात नव्याने होऊ घातलेल्या (आणि अखेरीस यशस्वी झालेल्या) ऊस-उत्पादकाच्या नव्या आंदोलनाची ही नांदी होती. या उसाच्या आंदोलनालाच मग शरद जोश्यानी कांद्याचे आंदोलन जोडले आणि १९८१ साली कांद्याच्या ६० ते ७५ रुपये प्रतिक्विंटल या भावाला शासकीय मान्यता मिळविली।

□

ही तिन्ही आंदोलने आणि त्यांची यशस्वी अखेर याचा अर्थ या भागातील कांदा पिकविणारा शेतकरी एकदम सुखी झाला, त्याच्या साऱ्या विवंचना मिटल्या, बाजारात माल नेताक्षणी त्याला योग्य भाव लगेच मिळू लागला असा कुणी घेऊ नये. तसे झाले असते तर फार चांगले झाले असते. पण खरा प्रकार घटनेने समान हक्क मिळालेल्या अस्पृश्य समाजाच्या स्थितीसारखा झाला आहे. मंत्रालयातून निघणाऱ्या फर्मानात त्याचे हक्क राखले गेले, हॉटेल वा निवासालयातून 'मुक्त प्रवेशा'च्या पाट्या लागल्या, अनेक तऱ्हेची संरक्षणे त्या समाजाला देण्याचे शासकीय आदेश केले गेले. पण या 'साऱ्याची अखेर कशात झालेली दिसते आहे ? सवर्ण समाजाने जिवाभावाने हे कागदी आदेश उक्तीबरोबरच कृतीत स्वीकारले असते तर धर्मांतराचा प्रश्न निर्माण झाला नसता. या संदर्भात, आत्ममग्न प्रस्थापितांनी सामाजिक पातळीवर जे केले तेच आजवर पिळल्या जाणाऱ्या या शेतकऱ्यांबाबत आर्थिक पातळीवर करायचा प्रयत्न केला तर नवलही *वाटायला नको. उसाच्या बाबतीत प्रस्थापिताचे प्रयत्न* फारसे फलदायी झाले नाहीत, होऊ शकले नाहीत. याचे कारण राजकारण किंवा साखर कारखाने आणि त्यामागची सहकारशक्ती आहे, हे उघड आहे. इतर पिके आजही व्यक्तिगत खरेदीच्या लहरीवर हेलकावे खात आहेत. सत्ताधाऱ्यांची खुर्चीनिष्ठ उदासीनता त्यांना मदत करते हेही उघड आहे. तंबाखूच्या पिकाप्रमाणे कांद्याच्याआडही त्या त्या *क्षेत्रातील प्रस्थापित दलालांची मक्तेदारी अडवणूक केल्याशिवाय* कशी राहील ? हे धनवंत प्रस्थापित त्यांच्या जोरावरच उभ्या राहणाऱ्या शासनाच्या कृपामय औदासिन्याखाली नाफेड किंवा तंबाखू फेडरेशनच्या कामात 'कायदेशीर' व्यत्यय निर्माण न करू शकले तर ते प्रस्थापित कसले ? तेव्हा कांदा काय, तंबाखू काय, दूध-भात काय किंवा अन्नधान्ये किंवा तेलबिया किंवा कडधान्य काय, ही पिके निर्माण करणाऱ्या, त्यासाठी खप खप खपणाऱ्या शेतकऱ्याच्या मार्गात जमेल त्या मार्गाने काटे पसरण्याचा उद्योग झाला नाही तरच आश्चर्य म्हणावे लागेल ! यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणींचेच भांडवल करून त्याचे शेतकरी संघटनेच्या प्रयत्नांच्या अपयशाशी समीकरण करण्यासाठी टपून बसलेली वृत्तपत्रे आणि हितसंबंधी यांच्या कार्याबद्दलचा विचार करायला हवा; पण खचून जाता उपयोगाचे नाही. आता कांदा-खरेदीतील तूट सांगून कार्यपद्धतीतील अकार्यक्षमता झाकण्यासाठी खरेदी बंद करण्याचे सूचक विचारही शासन व्यक्त करीत आहेच.

## कठोर आत्मपरीक्षणही हवे

शेतकरी संघटनेच्या कार्यपद्धतीमध्ये दोष नसतील असे नाही. दोष असतील, अपुरेपणा असेल, कच्चेपणाही असेल; कागदावर मिळालेली यशे प्रत्यक्षात फसलेल्या स्वरूपात असतील; पण अनेक वर्षे रुळलेल्या प्रस्थापित अनिष्ट गोष्टींवर त्याना मात करायची आहे. अपेक्षित यशासाठी अधिक काळ थांबायची तयारीही त्यांनी ठेवायला हवी. चुका लक्षात घेऊन त्याची दुरुस्तीही स्वतःच करायला हवी. याबाबतीत जितके कठोर आत्मपरीक्षण संघटनेचे नेते करू शकतील तितके ते त्यांच्या हिताचे होईल. अशा काही गोष्टींचा सहज असा इथे निर्देश करता येईल. संघटनेच्या ऊस, कांदा, तंबाखू, दूध, भात इत्यादी वेगवेगळ्या पाख्यांत आवश्यक अशी सुसूत्रता ( co-ordination ) दिसत नाही. ती निर्माण झालीच पाहिजे. त्यावर संघटनेचे अस्तित्व अवलंबून आहे, हे नेत्यानी लक्षात घेतलेच पाहिजे. तसेच आंदोलना-

नंतर मान्य झालेल्या शर्थीची अंमलबजावणी योग्य मार्गाने होते की नाही हे पाहण्याची आणि नसेल तर त्या दृष्टीने काही तरी निश्चित अशी व्यवस्था संघटनेकडून होणे अगत्याचे आहे. आजवर संघटनेने कायम स्वरूपाचा निधी उभा केलेला नाही. ते सद्य:स्थितीत योग्य असेलही; पण यापुढे असा निधी उभा करणे ही गरज ठरणार आहे. त्यासाठी खजिनदार वगैरे पदाधिकारी असलेली एखादी कार्यकारिणी मध्यवर्ती स्वरूपात उभी राहणे आवश्यक आहे. ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्यात नासिक जिल्ह्यातील वांगीतुंगी या गावी शेतकरी संघटनेचे मोठे अधिवेशन भरणार आहे, असे कळते. त्यात अशा प्रश्नांचा खोलवर विचार होऊन निश्चित मार्गाची आखणी झाली पाहिजे. ही शेतकरी संघटना काहीही करून तिच्या राजकीय पक्षविरहित आणि आर्थिक स्वरूपात टिकली पाहिजे, देशातील इतर प्रांतांतही तिची अशाच 'शुद्ध' भूमिकेवरून लागलागवडीसह लावण झाली पाहिजे, हे विसरून चालायचे नाही. कारण ती काळाची गरज आहे. ती नाकारणे म्हणजे अधिक गोंधळाला किंवा संकटांना आमंत्रित केल्यासारखे होणार आहे.

¤

शेतकऱ्यांची योग्य भावासाठी आंदोलने असा एकच कार्यक्रम शरद जोशींनी चाकणच्या परिसरात हाताळलेला नाही, हे मुद्दाम सांगायला हवे. पवनाधरणग्रस्तांच्या यातना शासनाच्या वेशीवर टांगण्याचे फार मोठे कार्य त्यांनी केलेले आहे. चाकण ते वांद्रे हे ६५ कि. मी. चे अंतर आहे. या भागात तीसेक छोटी गावे किंवा वाड्या आहेत. हा भाग भामनहर खोरे म्हणून ओळखला जातो. पवना नदीचे धरण बांधताना ज्यांची घरे-दारे, जमीनजुमला त्यात गेला त्याचे पुनर्वसन शासनाने या भागात केले आहे; पण कसल्याही सोयी केलेल्या नव्हत्या. साधा रस्ताही नव्हता. शाळा किंवा आरोग्य याबाबतीत अगदी प्राथमिक सोयीही नव्हत्या. माणसे आपली राहताहेत, कशीबशी जगताहेत नि एक दिवस मरताहेत, असा एकंदर मामला होता. जोशींनी आणि त्यांच्या शेतकरी संघटनेने यांचे प्रश्न धसाला लावले. शासनावर अवलंबून न राहता महाराष्ट्र बँकेच्या मदतीने सर्वप्रथम एक फिरता दवाखाना सुरू करून अनेकांचे प्राण वाचविले. डॉ. भारती यांनी याबाबतीत मोठे काम तिथे केलेले आहे. आपल्या गाऱ्हाण्यांची दाद लागत नाही म्हणून शेवटी शरद जोशींनी एक 'लॉंग मार्च'ची कल्पना ठरवून ती प्रत्यक्षात आणली. या उपेक्षित भू-भागातील दुर्दैवी जनतेची रस्त्यासारखी साधी मागणी जनतेसमोर मांडण्यासाठी त्यांनी २४ जानेवारी १९८० रोजी वांद्रे या (रायगड जिल्ह्यालगत येणाऱ्या पुणे जिल्ह्याच्या एका टोकाच्या) खेड्यातून चाकणच्या दिशेने मोठा मोर्चा काढला. या मोर्चाने ६५ कि. मी. ची सलग तीन दिवस पायी चाल केली आणि २६ जानेवारी १९८० रोजी दुपारी चाकणमध्ये तो शिरला. तीन दिवसांची शिदोरी सोबत घेतलेले आठ ते दहा हजार लोक या मोर्च्यामध्ये सहभागी झालेले होते. त्यात हजारावर महिला होत्या. विशेष म्हणजे स्वत: शरद जोशी त्याबरोबर तीन दिवस चालत होते. शेतकरी संघटनेने वैद्यकीय सेवा देऊ केली होती. डॉ. रत्ना पाटणकर आणि डॉ. दाक्षायणी देशपांडे या दोन डॉक्टर-विदुषी सतत तीन दिवस पायपीट करीत आरोग्यसेवेचे काम निष्ठेने करीत होत्या. आपल्या भागाकडे होणारे दुर्लक्ष शासन दूर करेतोवर सारा-बंदीचा कार्यक्रम मोर्च्यामध्ये सहभागी झालेल्या सर्वांनी पत्करला होता. आपापल्या वस्तीतील रस्ता श्रमदानाने तयार करण्याची तयारीही दाखविली होती. कच्च्या स्वरूपात या मार्गाचे काम झालेले आहे. तिचे पक्के रूप मार्गस्थ झाले असले तरी लाल फितीत गुरफटले गेले आहे. शासन ते केव्हा प्रत्यक्षात आणणार कळत नाही. त्यासाठी पुन्हा जोशींना एखादा लॉंग मार्च काढण्याची पाळी आली नाही म्हणजे पुष्कळ झाले !

इकडील खेड्यात व्हॉलीबॉलचा खेळ बराच लोकप्रिय आहे. त्याचे सामनेही होतात. शेतकरी संघटनेने त्याच्या स्पर्धा भरवून मुद्दाम मोठे बक्षीस ठेवले होते. त्या खेळाला उत्तेजन देण्याचे कामही केले होते. *भजनासारख्या सांस्कृतिक कार्यक्रमातही संघटनेचा सहभाग* मोठा आहे. इथून बरीच भाजी पुण्या–मुंबईसारख्या शहरांत जाते. ती पिकविणाऱ्या शेतकऱ्याला मिळणारा भाव आणि ती खरेदी करणाऱ्या ग्राहकाला द्यावा लागणारा भाव यातील मोठी तफावत संघटनेने मुद्दाम लोक पाठवून उघडकीस आणण्याचे काम केलेले आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या हिशेबाच्या पट्ट्या सावधपणे तपासून घेण्यास संघटना सतत सूचनाही देत असते. या कामामागील भूमिकाही सर्व लोकांत संघटनेचा प्रसार व्हावा अशीच आहे आणि शेतकरी संघटनेचा प्रसार म्हणजे हेतुपूर्वक दाबलेल्या शेतकऱ्यांच्या अस्मितेचीच जागृती होय. शेतकरी आता प्रश्न विचारू लागला आहे हे अशा जागृतीच्या प्रक्रियेचेच प्रथम लक्षण म्हणावे लागेल.

तटस्थपणे ध्यानी घ्यायचे म्हटले तर शेतकरी संघटनेचे हे प्रयत्न गैर आहेत असे कोणीही समंजस म्हणू शकणार नाही. या प्रयत्नात काही कच्चे दुवे नसतील असेही नाही; पण सध्याच्या जमान्यात या गोष्टी जबाबदार वृत्तपत्रांनी व लोकहितदक्ष मंडळींनी समजुतीने व जबाबदारपणे इतरेजनांना पटवून दिल्या पाहिजेत, अशी वस्तुस्थिती आहे आणि वचक व वजन असणारी वृत्तपत्रे वगैरे तर 'शहरी' वळणाची आहेत. ती जोशींच्या चळवळीबद्दलचे सत्य शोधण्यासच का कू करणारी दिसतात. ती ना जोशींच्या मते खोडू शकतात, ना त्यांची भलावण करू शकतात. तेव्हा शेतकरी संघटनेने स्वत:च्या योग्य मार्गावर भिस्त ठेवून आपले अस्तित्व टिकविले पाहिजे. कारण ही संघटना व तिचे प्रयत्न उद्याला लिहिल्या जाणाऱ्या चोख नि सत्यप्रिय इतिहासलेखनाचे ठळक विषय ठरणार आहेत. ☐


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

# देवाघरचा पाऊस

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

श्यामचा संसार (कथा बावीसावी)

फिरोझ रानडे

# सासूबाई येती घरा....

'ज्याप्रमाणे पैशाचे सोग आणता येत नाही असे पूर्वीचे लोक म्हणत तसेच चांगल्या प्रकृतीचे पण सोग आणता येत नाही.' श्यामने असे म्हणताच एकच हशा पिकला.

श्याम व राधा बरीच वर्षं महाराष्ट्राच्या बाहेर राहून वर्षापूर्वीच मुंबईला रहायला आले होते. महाराष्ट्राच्या बाहेर दूर राहिल्यामुळे त्यांच्याकडे नातेवाईक–पाहुणे असे कधी आलेच नाहीत. कलकत्त्याला असेपर्यंत, तेथे मोठा मराठी समाज असल्यामुळे, त्याबद्दल विशेष काही वाटले नाही.

पण पुढे आसामात बदली झाल्यावर मराठी माणसाच्या सहवासाची भूक जाणवू लागली. तशी त्या दूर आसामी गावीं पाच-सहा मराठी कुटुंबं होती; पण ती तेथलीच असल्यामुळं तोच तोचपणा येत असे.

त्यामुळे अगदी नातेवाईक मंडळी जरी माहीत तरी कोणी तरी मराठी बोलणारे यावेत, भेटावेत, त्यांचा पाहुणचार करावा असे श्याम व राधाला खूप वाटत असे. त्यामुळे कोणी मराठी अधिकारी कचेरीच्या कामाकरता जरी आला असला तरी श्याम त्यांना अगत्याने घरी रहायला बोलवत असे.

अशा श्यामच्या घरी वास्तव्य करून गेलेल्या सगळ्या पाहुण्यांत श्यामच्याच मनात घर करून राहिलेले पाहुणे म्हणजे आपटे–कुटुंब.स्वत: श्री.आपटे कोठल्या तरी सरकारी कचेरीत कलकत्त्याला असत. वय असेच ५४–५५वर्षांचे. आपटेबाईसुद्धा त्या वयायोग्य म्हणजे ४९–५० वर्षांच्या. त्यांना बिचाऱ्यांना मूल-बाळ नव्हते.तेव्हा कलकत्त्याला एकटं कुठे ठेवावयाचे म्हणून व हा प्रदेशही पाहून होईल म्हणून आपटेबाईंना त्यांनी बरोबर आणले होते व आता श्यामकडे रहाण्या–खाण्याची सोय होणार म्हणून मंडळी खूष होती. एकमेकांना सांभाळून घेणारे जोडपे म्हणून श्याम-राधाला त्यांच्याबद्दल खूप कौतुक वाटत असे.

दियापूर म्हणजे रेल्वेचे पूर्वेकडले शेवटचे स्टेशन. त्याचा उल्लेख करून एक दिवस आपटे श्यामला मोठ्या कौतुकाने म्हणाले, 'श्यामराव, ही अशी रेल्वे–लाइन तेथे संपते बघा! म्हणजे त्याच्यापुढे रूळच नाहीत. एकदम stop!'

श्याम कसला वात्रट! तो म्हणाला, 'आपटेसाहेब, रूळ संपलेले व एकदम stop, बघायला इतक्या लांब आसाममध्ये-दियापूरला कशाला यायला पाहिजे? आणि तेही मुंबईहून? अहो, बोरीबंदरला नाही का रूळ संपत? अगदी तुम्ही म्हणता तसा अगदी stop!'

आपटेसाहेबांचा चेहरा पहाण्यासारखा झाला! श्यामने तो पाहिला व आनंद मानला.

आपटेमंडळींचं खरं प्रेमाचं संभाषण सुरू होत असे ते रात्री १०–१०॥ वाजता. त्या वेळी आपट्यांना 'बाहेर' जाण्याची भावना होत असे. त्या गावी वीज वगैरे असली तरी ही 'बाहेर'ची सोय आपल्या तालुक्याच्या वगैरे गावी असते तशी थोडी दूर होती.

आपटे १०–१०॥ वाजता 'मी जरा जाऊन येतो' म्हणाले की सौ. आपटे आपली प्रवास-पेटी उघडून त्यातून बॅटरी, मेणबत्ती व काडेपेटी काढून देत असत व सोबत 'सांभाळून जा हं, म्हणून प्रेमळ सल्लाही देत असत.

मग ती बॅटरी, ती मेणबत्ती व ती काडेपेटी घेऊन आपटे निघत. अशा घाईने करावयाच्या गोष्टी आपटे इतक्या शांतपणे कसे करतात ह्याचा श्यामला अचंबा वाटे. बॅटरी नेल्यावर परत मेणबत्तीचं प्रयोजन काय व तोही विजेचा दिवा असताना, हे श्यामला काही केल्या कळत नसे.

तेव्हा एक दिवस अगदी न रहावून श्यामने त्यांना ह्या दोन-दोन गोष्टींचं प्रयोजन विचारलं. अर्थातच आपटे 'परत' आल्यावर!

'अहो, मेणबत्ती वाऱ्यात विझते म्हणून जाण्या–येण्याकरता बॅटरी हवीच!' आपटे.

'हे पटलं; पण मग मेणबत्ती कशाला? कारण जर बॅटरी जाण्या–येण्याकरता वापरता येते तशी ती थाबण्याकरता पण वापरता येईल की आणि परत विजेचा दिवा आहेच की!'

'पण विजेचा भरवसा आहे काय? समजा वीज गेली तर? मग उगाच बॅटरी वाया जाऊ नयें म्हणून मेणबत्ती व ती पेटवायला काडेपेटी!' आपटे आपण महत्त्वाचा मुद्दा मांडला ह्या आनंदात म्हणाले.

'खरे आहे तुमचे म्हणणे.' श्याम मोठ्याने म्हणाला व मनाशी म्हणाला, 'आणि लोक म्हणतात की मराठी लोक 'दूरदर्शी' नसतात म्हणून!'

पण आता मुंबईला आल्यापासून श्याम-राधाला ही पाहुण्यांची चणचण बिलकूल जाणवत नव्हती. कधी श्यामच्या माहेरची तर कधी राधाच्या माहेरची नातेवाईक-मंडळी पाहुणचाराकरता येत असत.

तसेच आता श्यामच्या सासूबाई व श्यामचे दोन मेव्हणे पाहुणे म्हणून आले होते. प्रकृती व त्याची घ्यावयाची काळजी हा सासूबाईंचा मोठा आवडीचा विषय होता. दुपारचा चहा घेता घेता प्रकृतीवरून चाललेल्या गप्पात श्यामने जसे पैशाचे सोग आणता येत नाही तसे चांगल्या प्रकृतीचे पण सोग आणता येत नाही, असे म्हटले व एकच हशा पिकला.

जसे राजकारणात लोक वेगवेगळ्या कारणाकरता पडतात त्याप्रमाणे हा हशा पिकवण्यात सामील झालेल्या लोकांची कारणे पण वेगवेगळी होती. श्यामच्या विनोदाला हसले नाही तर श्यामच्या सासू-मेव्हण्यासमोर प्रस्टीज जाईल म्हणून राधा हसली होती. सासूबाई 'काय ग बाई माझा जावई छान बोलतो!' ह्या कौतुकाने हसल्या होत्या, तर दोन्ही मेव्हणं काय भिकार विनोद करतात हे जावईबापू, म्हणून कुचेष्टेने हसले होते.

साधारण सगळ्या मेव्हण्याना जावईबापूंच्या गुणाचे आपल्या घरात जरा वाजवीपेक्षा जास्तच कौतुक होत असते असे वाटत असते. म्हणून श्यामला बायकोच्या भावाला मेव्हणा ह्या मराठी शब्दापेक्षा 'साला' ह्या राष्ट्रभाषेतला शब्द जास्त योग्य वाटतो व आवडतो.

साधारण सासू ह्या जमातीबद्दल लोकाचे बिलकूल चांगले मत नसते. तसे बघितले तर जगात सासवा ह्या अल्पसंख्यच; पण हिंदुस्थानात त्या अल्पसंख्येच्यावरच त्यांचा रुबाब चालतो. जसे कोणतीही सुधारणा आणायला अल्पसंख्यांकांचा विरोध झाला की ती सुधारणा करावयाची स्थगित होते तसेच सासवानी जर एखाद्या गोष्टीला विरोध केला तर ती गोष्ट घरात होत नाही.

बायकांच्या सासवामध्ये तर 'गुण' असा अगदी शोधूनही मिळत नाही. ह्या सासवा आपल्या संसारात उगाचच लुडबुड करत असतात, आपल्या मुलीची व मुलांची म्हणजे नणंदाची व दिराची त्या जास्तच बाजू घेत असतात, नवऱ्याच्या मनात उगाच किल्मिष भरवतात, नातवांना आईविरुद्ध फूस लावतात असे आरोप बायकांच्या सासवावर केले जातात.

असेच गुण नवऱ्याच्या सासवामध्येही अर्थातच असतात; पण त्याच गुणाचे interpretation वेगळे केले जाते. एका सासूच्या बाबतीत जी 'उगाचच लुडबुड' वाटते ती दुसऱ्या प्रकारच्या सासूच्या बाबतीत 'किती interst घेतात' अशी स्थिती होते. पहिल्या सासूबाई मुलीची वा मुलाची 'जास्तच बाजू' घेतात तर दुसऱ्या तऱ्हेच्या सासूबाई 'सगळ्यांना किती सारखे वागवतात' असे म्हटले जाते. पहिल्या म्हणजे बायकांच्या सासूबाई-नवऱ्याची आई-मुलांना 'फूस' लावते तर बायकोची आई 'योग्य' तो सल्ला मुलांना देत असते. असे ह्या दोन तऱ्हेच्या सासवांचे एकाच तऱ्हेचे वागणे; पण त्याचे interpretation मात्र किती वेगळे होत असते, बघा.

आता काही सासवा चांगल्या असतात, अगदीच नाही असे नाही; पण एकदा बदनामी जोडली की ती सुटता सुटत नाही. अगदी एखादी बाई खाष्ट आहे असे म्हणायचे असले की लोक 'काय सासूसारखी खाष्ट आहे' म्हणतात. अहो, ऑफिसमधल्या बॉसला सासू म्हणणारे लोक जगात आहेत! सासूइतकी वाईट प्रसिद्धी असलेली जगात दुसरी जमात नसेल, नाही?

पण ते काय वाटेल ते असो. सासवा कितीही बदनाम असोत वा वाईट असोत, श्यामला आपली सासू पाहुणी म्हणून फार आवडे. तसे पाहिले तर सासूच का अगदी राधाच्या माहेरचे कोणीही पाहुणे म्हणून आलेले श्यामला खूप आवडते. कारण राधाची माणसे पाहुणे म्हणून येण्यात खूप नफा असतो.

एक तर श्यामची सासू म्हणजे राधाची आई वा माहेरचे कोणी आले म्हणजे घरात अत्यंत खेळीमेळीचे वातावरण तयार होते व त्याचा परिणाम अगदी साध्या-साध्या दररोजच्या गोष्टीत दिसू लागतो.

आई वा माहेरची माणसं आली म्हणजे घरात, मराठीत ज्याला गोड-धोड म्हणतात वा चांगले-चुंगले म्हणतात, तशा प्रकारचे खायला वेगवेगळे होत असते व सगळ्यात मजा म्हणजे, हे सगळे करूनसुद्धा राधाला थकवा असा कधी येत नाही!

पण तेच श्यामच्या माहेरची माणसे येऊ द्यात व राधाला थोडे काम करायला लागू देत. तिला लगेच 'अतिशय थकवा' येतो. श्यामला हे राधाचे थकव्याचे कोष्टक काही केल्या कळलेले नाही. अगदी देवालासुद्धा कळले असेल का, ह्याचीही शंकाच आहे. कारण देवाला नाही सासर, नाही माहेर!

सासू पाहुणे म्हणून येण्याचा सगळ्यात मोठा फायदा म्हणजे ह्या दिवसात श्यामचे होणारे भरघोस कौतुक! सासूबाई तर कौतुक करत असतातच, पण राधासुद्धा त्या भरघोसात एकही दाणा कमी होऊ देत नाही.

आता जेवतानाचीच गोष्ट घ्या. श्याम जेवायला बसला होता. राधा वाढत होती. सासूबाई बाजूला उभ्या होत्या. वाढता वाढता राधा म्हणाली, 'अग आई, ह्यांना बाकीच्यासारखं असं अर्धवट जेवण चालत नाही. अगदी डावीकडे, उजवीकडे म्हणजे भात, पोळ्या, साधं वरण, आमटी, भाजी, चटणी, कोथिंबीर सगळं लागतं व तेही अगदी सकाळ-संध्याकाळ!'

प्रथम श्यामला वाटले की, राधा कोणा शेजाऱ्याची वा राधाच्या कोणा मामाची वगैरे गोष्ट सांगते आहे; पण ते सर्व पदार्थ प्रत्यक्ष पानात बघितल्यावर राधाचे हे सगळे बोलणे आपल्याबद्दलच होते, हे श्यामला कळले; पण अजूनी ह्या पानातल्या सगळ्या गोष्टी खऱ्या खऱ्या असतील असे त्याला वाटले नाही. पुष्कळ लोक नाही का दगडाच्या की लाकडाच्या बदाम-पिस्ते-काजू वगैरे गोष्टी हुबेहूब बनवून दिवाणखान्यात ठेवत, श्यामला प्रथम तसेच काही तरी वाटले; पण त्या सर्व गोष्टी खरेच आहेत हे बघितल्यावर त्याला आश्चर्यमग्न आनंद झाला.

तसेच कौतुक श्याम कचेरीत जाताना. राधा अगदी अत्यंत कोमल गांधारमध्ये 'आज उशीर नाही ना होणार आहे यायला?' असा सासूबाई जवळ असतील त्या वेळी अत्यंत काळजीमय व कौतुकमय प्रश्न विचारत असे. मग सासूबाई आपल्या भिवया जेव्हढ्या वर जातील तेव्हढ्या वर करून विचारत, 'का ग राधा, खूप काम असतं का? नेहमी उशीर होतो का ग?' मग राधाचे काम-पुराण अध्यायामागे अध्याय सुरू होत असे. इतके की, श्यामलाच इतकी स्तुती व आपण करत असलेल्या कामाबद्दलचे कौतुक ऐकून कानकोंडे व्हायला व्हायचं व तो लगेच तेथून सटकत असे. त्यावरही राधाचे कौतुक! 'बघितलेस आई, ह्यांना बाकीच्यांच्यासारखं कौतुक केलेलंही आवडत नाही!' सासूबाईंच्या भिवया आणखी वर होत.

संध्याकाळी कचेरीतून परत आल्यावर श्याम परत एकदा कौतुकाच्या शॉवरखाली भिजून निघत असे. चहाबरोबर खायला बटाटा-पोहे असतच व वर कौतुकाचे खोबरे!

'अग, आई, हे बाकीच्या नवऱ्यांसारखे नाहीत. ह्यांना कचेरीतून आल्यावर नुसता चहा कधीही चालत नाही!'

श्याम म्हणायचा, ह्या जीवनाच्या सहारा वाळवंटात जर सासूच्या कौतुकाचा व सासू आली आहे म्हणून होणाऱ्या कौतुकाचा जर oasis नसला तर जीवन किती भकास व भयाण झालं असत नाही? व 'स्वामी तिन्ही जगाचा...' ह्या मराठीतल्या सुप्रसिद्ध चालीवर गुणगुणायचा, 'स्वामी तिन्ही जगांचा सासूविना अभागी!' □

पुस्तके

# पागोळ्या

## विविधतापूर्ण काव्यसंग्रह

साहित्य संस्कृति मंडळाचे नवलेखकांना दिले जाणारे अनुदान मिळाले. श्री. वा. वि. भट (अभिनव प्रकाशन, मुंबई) यांच्यासारखे मुरब्बी प्रकाशक लाभले आणि सौ. शिरीष पै यांचा आशीर्वाद मिळाला की, एखाद्या लेखकाला, कवीला रसिकांपर्यंत पोहोचायला वेळ लागेलच कसा ? हा त्रिवेणी संगमलाभ ज्यांना झाला ते श्री. सदाशिव करंदीकर, गेले पावशतक कवितारतीची उपासना करीत आहेत. इ. स. १९५६ ते इ. स. १९७९ या कालावधीत लिहिलेल्या ४४ कविताचा 'पागोळ्या' हा त्यांचा पहिलावहिला काव्य-संग्रह आहे.

प्रेमकविता, निसर्गकविता, सामाजिक कविता, विनोदी कविता इत्यादी विभाग प्राध्यापकांनी आपल्या सोयीसाठी केले, असे सारेच कवी आणि रसिक मानतात. त्यात काही अंशी तथ्यही आहे यात शंकाच नाही. काही कवी आपल्या संग्रहातील काव्याची विभागणी तशी करतातही. आपली कविता ही प्रथम आणि अखेर कविता असते. ती चागली की वाईट, यशस्वी की अपयशी, एवढेच तुम्ही सांगा. ती अमुक एका प्रकारची, तमुक एका विषयावरची असा कोणताच शिक्का तिच्यावर मारू नका, असे कवीने म्हणणे सहाजिकही आहे हा प्रश्न मी उपस्थित केला त्याला कारण आहे. श्री. करंदीकर यांनी आपल्या कविता ज्या क्रमाने छापल्या आहेत ते पाहिले ( म्हणजे त्या वाचल्या ) म्हणजे मी असे का म्हणतो ते पटेल. या कवीचा प्रेम हा आवडता विषय आहे. तसाच त्याला विनोद, विडंबन आणि उपरोधही चांगला साधतो; पण जेव्हा 'सावली' ही कविता वाचल्यानंतर आपण 'तडजोड' कडे वळतो तेव्हा चटकन एका मूडमधून लगेच दुसऱ्या अगदी भिन्न मूडमध्ये जाणे कठीण जाते. पुढे जावे तर 'छंद' सारखी 'गंधात त्या धुंद होणे, हाच मला ध्यास छंद' सांगणारी कविता भेटते. त्यामुळे काव्यास्वादात विक्षेप येतो. त्यामुळे त्यांनी जर आपल्या कवितांची विषयवार विभागणी केली असती तर ? मला वाटते त्यांच्या कवितेच्या एकेका वैशिष्टयाचा अपेक्षित तो एकसंघ परिणाम झाला असता आणि कविमनाच्या विविध पैलूचे दर्शन घडले असते.

प्रेम हा सनातन आणि नित्यनूतन असा, अनादिकालापासूनचा आणि अनंत कालपर्यंत टिकून राहणारा विषय आहे. या कवीला प्रेमानुभवाने दिवाणे केले नसते तरच नवल? त्याच्या त्याच्या प्रेमकवितात अपेक्षापूर्तीपेक्षा अपेक्षाभंगाचे, सफल प्रेमाऐवजी असफल प्रेमाचे उसासे व्यक्त झाले आहेत. प्रेमात सफलता म्हणजे थांबलेली धडपड, ना तिथे हुरहुरीला, तडपण्याला वाव. आपल्या 'ओल्या चिंब आठवणी' मध्ये कवी म्हणतो '...आता करतो प्रवास, वाट ओसाड वैराण आणि कधी बरसतो, असा स्मृतीचा श्रावण !' 'माझ्या मना', 'निरोप' इत्यादी कवितांतून त्याने प्रेमाला आळविले आहे, जागवले आहे. त्याचप्रमाणे 'ताईची मंगळागौर', 'लेक आली माहेराला' सारख्या कौटुंबिक जिव्हाळ्याने ओथंबून गेलेल्या कविताही लिहिल्या आहेत. 'हरिभाऊ आपटे', 'सावरकर' यांच्यासारखे आदर्श, पुरुषोत्तमही त्याला साद घालतात, त्याची प्रतिभा अशा व्यक्तिदर्शनात्मक कविता वर्ज्य मानीत नाही. तो एक कवी आहे. शब्दांच्या, कल्पनेच्या विश्वात रमणे हा त्याचा पिंड आहे. त्यामुळे 'शब्द यावेत', 'मळभ' यासारख्या कविता तो सहजपणणे लिहून जातो. सौ. शिरीष पै यांनी 'स्वत:च्या सुख-दु:खांना वाट मोकळी करून देण्यासाठी त्यांनी कवितेचा माध्यम म्हणून उपयोग करून घेतलाय खरा; पण ती कविताच त्यांच्या कोंडलेल्या मनाची मुक्ती आणि स्वातंत्र्य बनली आहे,' काढलेले हे उद्गार या संदर्भात सार्थ वाटतात.

'पागोळ्या' या संग्रहाचा आणखी एक विशेष म्हणजे विनोदी कविता. हा विनोद 'परिहास' म्हणून येतो तसाच विडंबनाच्या, उपरोधाच्याही सहाय्याने प्रकट होतो. 'तडजोड', 'सवत', 'न्याय', 'हेचि दान देगा देवा', 'डॉक्टर', 'ढेकणास', 'भाट', कळप' या कविता वाचल्या म्हणजे मी काय म्हणतो ते सहजपणे लक्षात येईल.

एखाद्या कवितेचे, काव्यसंग्रहाचे आणि म्हणूनच कवीचे यश कशात समावले आहे ? त्याच्या कविता मनात घर करून राहतात का? कविता वाचून झाल्यानंतर त्यातील अनेक ओळी विनासायास लक्षात राहतात का ? तसे जर होत असेल तर तो यशस्वी ठरला असेच आपण म्हणू. 'रातराणीच्या स्पर्शाने, होतो पिंपळ दिवाणा !!' (चादण्याचे माझे जग'), '...शब्द बनतात मोती, येतो अर्थाला सुगंध ! गंधात त्या धुंद होणे हाच मला ध्यास छंद !!' ('छंद'), 'आतांच आताच, कविता होण्याचा चंदेरी आलेख, माझिया भाळी' ('आलेख'), '..स्मृतीचेच जल, व्हायचे तू उंट ! – आणि मुकाटयाने चाल वाळवंट !!' ('माझ्या मना'), 'सरोवरात फुलली कमळे ! कमळात फुलले सरोवर !!' ('लाजवंती'), 'माझ्या मातीच्या मनाला, वेड आकाश-फळाचे !!' ('वेड'), 'माझ्या तळहातावर, गिचमिड वारेमाप, 'फुलायचा' वर मला, 'जळायचा' आहे शाप' ('रेषा'), '(जगावे तरी कळपरूपे, चरावे...मरावे परी कळपरूपे उरावे...) कळपाय नम:'('कळप'), 'हेचि दान देगा देवा, कार्डावर मिळो रवा!' ('हेचि दान'), 'बोलवितां धनी त्याचे आम्ही शब्द होता चारा लब्ध जगूं ऐसे' ('भाट'), 'मन भरून येते तेव्हा, कविता होतेच असे नाही' ('मळभ'), इत्यादी पंक्ती मनात तरंगत राहतात हे यश काय कमी आहे ?

असा हा कवितेवर मनापासून प्रेम करणारा काव्यवेडा कवी आहे. त्याच्या प्रतिभेला, कविमनाला असंख्य धुमारे फुटोत आणि रसिकाना त्याच्या सरस, अधिकाधिक सुंदर कविता वाचायला मिळोत. अतृप्ती हा कविजनांना मिळालेला वर आहे. त्याच्या प्रतिभेने अधिक उंच झेप घेण्याची ईर्षा बाळगली पाहिजे. तृप्ती, संतोष हा कवीला मिळालेला शाप आहे हे मनोमनी समजून असावे हे बरे.

—चंद्रशेखर राजे

पागोळ्या
सदाशिव करंदीकर
अभिनव प्रकाशन, मुंबई १४
पृष्ठसंख्या : ४८ किंमत : पाच रुपये

फिनिक्स...

# ग्रंथनिगा....

मला राहून राहून एका गोष्टीचे आश्चर्य वाटते ते हे की, किती तरी लोकांची वाचनाची भूक तीव्र असून ती भूक भागवण्याची कसलीच चांगल्या प्रकारची व्यवस्था नसते. महाराष्ट्रातील जवळजवळ सर्व लहान-मोठ्या शहरांतून आमच्या ग्रंथालयाचे सभासद होण्यासाठी पत्रे येतात. पुष्कळ वेळा खेड्यापाड्यांतूनही येतात. या लोकांची ऐपतीप्रमाणे वाचनासाठी पैसेही खर्च करण्याची तयारी असते. खुद्द पुणे शहरातील आमचे काही वर्गणीदार ८००–९०० रु. इन्कम ब्रॅकेटमधील आहेत, जे आमची महिना रु. ३० वर्गणी भरतात.

सध्याच्या ग्रंथांच्या किमतीचा विचार केला की, सामान्य माणसांना ग्रंथ विकत घेऊन वाचायला सांगणे म्हणजे मूर्खपणाचे ठरेल. अर्थात काही व्यक्ती परवडत असताना किंवा काहींना परवडत नसताना ग्रंथ विकत घेतात. ग्रंथ विकत घेणे हा काही लोकांच्या बाबतीत acquisitive instinct होऊन बसतो.

आपल्या मालकीचा ग्रंथसंग्रह असला तर एक वेगळेच समाधान मिळते हे खरे आहे. पण ते समाधान पुष्कळ वेळा प्रारंभापुरतेच असते. कारण मला असाही अनुभव आला की, लग्नानंतर जसा हनिमूनला जोष येतो व नंतर उत्कटता कमी कमी होत जाते तसेच ग्रंथखरेदीनंतर वाचनाचा जोष असतो खरा, पण पुढे पुढे या बाबतीत काही विचित्र नियम लागू पडत जातात. मी जे या संदर्भात लिहितो आहे ते सर्वसाधारण निरीक्षण करून लिहीत आहे. माझ्या बावीस वर्षांच्या काळात जुने वैयक्तिक ग्रंथसंग्रह विकण्यासाठी अनेक व्यक्ती भेटून गेल्या. त्यांच्याशी अनेक प्रकारचे संवाद झाले त्यावरून लिहीत आहे. पहिली गोष्ट ही की, ग्रंथसंग्रह ठेवायचा कुठे, हा प्रश्न काही लोकांना सुरुवातीला भेडसावत नसला तरी कालांतराने केव्हातरी पुष्कळ लोकाना तो भेडसावतो. कुटुंब मोठे होत जाते तसतशी जागेची टंचाई होते. ग्रंथसंग्रह एका खोलीतून दुसऱ्या खोलीत हलवले जातात. शेवटी असेच आढळून येते की, ग्रंथराजांना ठेवायला आता कुठेच जागा नाही. जेवढा ग्रंथसंग्रह जास्त मोठा तेवढ्याच प्रमाणात हा प्रश्न जास्त बिकट. मग नवराबायकोची कुजबूज सुरू होते, 'विकून टाका हो ! माझ्याने त्याची साफसफाई होत नाही ! परवा डिस्टेंपर देण्याआधी बिगारीनी भिंत घासली तेव्हा पुस्तकाच्या कपाटाच्या आत कसला धुरळा ! शिणले मी साफ करता करता!'

'हो आपण सर्व स्टॉक त्या फिनिक्सवाल्याला विकून टाकू. पुस्तकाचे भारी वेड आहे त्याला. चांगले पैसे देईल तो !' नवरा म्हणतो व माझ्याकडे चौकशीला येतो.कुणीही माझ्याकडे जुनी पुस्तके विकायला येतो तेव्हा माझ्यातले सर्व रिप्रेशन बाहेर येते. मी ग्रंथालयात अक्षरशः कित्येक सहस्त्र रुपये टाकले. ग्रंथसंग्रह विक्रीला काढले तर त्याची काय किंमत येईल याचे मला पुरते भान असते. मग याला का सोडा, असा माझ्या मनात विचार येतो. शेवटी जुन्या ग्रंथांना अगदीच अल्पशी किंमत द्यायची, अशी माझी सूडबुद्धी असते. (परंतु अगदीच उत्कृष्ट ग्रंथ असला तर मात्र मी तो जाऊ देत नाही !)

ग्रंथसंग्रह स्वच्छ ठेवणे हेही एक मोठेच काम असते. आमच्या फिनिक्स ग्रंथालयात आम्ही आठवड्यातून एकदा बेगॉन स्प्रेचा फवारा संभाळून मारतो. डायरेक्ट पुस्तकावर कधीच मारत नाही, नाही तर शितोड्यांचे डाग दिसायला लागतात ग्रंथ बंद कपाटात असले तर ठीक, पण शेल्फ जर उघडे असतील तर दररोज झटकणेसुद्धा अपुरे पडते. (उघड्या असलेल्या शेल्फमधील ग्रंथाना प्रदूषणाचा असर होत असतो याचा कुणी विचार केला आहे का ?) मधेच गॅमेक्झिन पावडर टाक, डांबरी गोळ्या टाक, या सारख्या अनेक क्लृप्त्यांनी पुस्तकांची जपणूक करावी लागते. काही महिन्यांपूर्वी झुरळांनी भूमिगत होऊन आमच्या पुस्तकांवर असा काही बेमालूम हल्ला केला होता की, त्यांचा नाश करण्यासाठी एक Operation cockroach चा आराखडा तयार केला. Sunergistic Action बद्दल कुठे तरी ऐकले किंवा वाचले होते, आता समजा, तुम्हाला सर्दी झाली आहे. सी व्हिटॅमिनने सर्दी कमी होत असते. परंतु सोबत जर अॅस्पिरिन घेतले तर आणखीनच फायदा होतो. या दोहोबरोबर जर फेरमफोस घेतले तर (९५% केसेसमध्ये) सर्दी शेपूट मांडीत घालून पळून जाईल. याच न्यायाने मी कॉर्पोरेशनकडून फवारे मारले. त्यात माझे औषध मिसळले. नंतर बेगॉन बॅट विखुरली. ओडोनील टाकले व आठवड्यातून एकदा स्वतः बेगॉन स्प्रे करायला लागलो. आधी गॅमेक्झिन वगैरे टाकून झाले होते; पण त्याने काहीच उपयोग झाला नाही. नंतर हा सिनरजिस्टीकचा प्रकार सुचला. त्याने गेले.

एकदा 'टाइम' मासिकात एक धक्कादायक मजकूर वाचल्याचे आठवते. The cockroach and the rat are going to inherit the earth. आण्विक शस्त्रांचा मारा झाला तरी ही ब्याद मरणार नाही. मग आपण तरी काय करणार ? आपण मरेपर्यंत सारखं त्यांच्यासमोर दंड थोपटीत रहाणे एवढेच काय ते आपल्या हातात !

मी हे सर्व अशासाठी लिहिले आहे की, या दिवसांत कुणीही पुस्तके विकत घेण्याआधी या गोष्टींचा विचार करावा व माझे म्हणणे पटल्यास फिनिक्सची लाईफ-मेंबरशीप घेऊन हा सर्व उपद्व्याप टाळावा.

जागा आणि कीटक याशिवाय इतर किती तरी प्रश्न असतात. गळणे, पुस्तकांची पाने कालांतराने आपोआप पिवळी पडणे. काही पुस्तकांचे परत परत करावे लागणारे बाईंडिंग. लहान मुलांनी पुस्तके खराब करणे ओळखीच्या लोकांनी पुस्तके नेणे व परत आणून न देणे. (या शेवटच्या प्रकाराला आम्ही 'सुपर सर्क्युलेशन' असे नाव दिले आहे.) कारण या प्रकारात 'सर्क्युलेशन'चा वेग वाढवण्यासाठी काही करावे लागत नाही. आपल्याकडून जर जोशींनी पुस्तक वाचायला नेलं असेल तर त्यांनी ते कदमांना रेकमेन्ड केलं असेल व कदमांनी श्री. गोडबोले यांना !

काही घरांतील कर्मचाऱ्यांनीही पुस्तकांची चोरी करून विकल्याचे ऐकिवात आहे.

सध्या स्पेशलायझेशनचे युग आहे. अनुभवी ग्रंथपालालाच हे करू द्या !

—जे. एन. पोंडा

(मागील, दि. १२ सप्टेंबरच्या अंकातील पुस्तक-परीक्षण- 'ज्ञानभास्कर भास्करराव जाधव-एक विचारदर्शन' प्रा. राजा दीक्षित यांनी लिहिले होते. लेखकाचे नाव नजरचुकीने राहून गेले. —सं.)

# थोडक्यात ....

## प्रवास

श्री. वैजनाथ महाजन यांचा हा छोटासा काव्यसंग्रह त्याच्या मुखपृष्ठाच्या वेगळेपणामुळे चटकन लक्ष वेधून घेतो. श्री. महाजन याची कविता या मुखपृष्ठापासूनच सुरू होते. इथे लिहिले आहे-

प्रवास–

केव्हा संपणार हा प्रवास ? एकदा
तरी दिसेल का नवी चांदरात ?
चल जाऊ या क्षितिजापार.
केव्हा संपणार हा प्रवास......

आणि मग साहजिकच वाचक आतली पानं उलगडू लागतो. डोळ्यांना सुखद वाटणाऱ्या टाइपमध्ये, पांढऱ्याशुभ्र कागदावर कवितांच्या ओळी उतरल्या आहेत. 'वाटा'; 'क्षितिज', 'विघ्न', 'अश्वत्थाम्यास वचन' अशा जीवन–मृत्युविषयक कवितांनीच संग्रहाची सुरुवात होते. पण अधूनमधून

चांदणे तुडवित तू आलीस
आणि रातराणीखाली उभी राहिलीस.
वाळवंट तुडवित मी आलो.
आणि ओॲसिस् समजून उभा राहिलो.

किंवा

माझे हजार निश्वास सांगतील.
तुझ्या डोळ्यांची कहाणी
जाता जाता देऊन जा
तुझ्या आभाळातील पाणी

अशा प्रेमाच्या राज्यातल्या आठवणी भेटवात. तसंच–

जन्मापासून ज्यांचे देह उसवले होते
त्यांचे दुःख गावाबाहेरही पोरके होते.
कधीतरी डोंब विझेल असे त्यांनाही
वाटत होते.
पण वेशीवरच ज्याचे देह टांगले होते
त्यांना मुक्या आभाळाशिवाय काय होते?
...दगडाचे देव बनत होते.
पण देहाचे दगड काळे ठिक्कर पडत गेले.
चंद्र कोरण्याची भासशिल्पे पाहणाऱ्यांनो
पायतळीची मातीही कधी उसळत असते
याची याद आहे ना ?

अशी सामाजिक आशय असलेली कविताही या 'प्रवासा'त भेटते.

सुमारे साठ कविता असलेल्या या संग्रहाची दोन वैशिष्टयं आहेत. एक, पुस्तकाचा आकार व छपाई निश्चितच नेत्रसुखद आहेत आणि दुसरं म्हणजे, सर्व कवितांना शीर्षक दिलेली असून एकही कविता पंधरा–सोळा ओळीपलीकडे जात नाही. कवितांचे विषय, मांडणी यामध्ये फारसं निराळेपण नाही, पण जे म्हटलं आहे ते साधं स्वच्छ आणि सुबोध आहे.

प्रवास (काव्यसंग्रह)
वैजनाथ महाजन
अभिनव प्रकाशन, मुंबई
पृष्ठे : ६०, मूल्य : १० रु.

¤

## भेळपुरी

अवतीभवतीच्या घडामोडीवर निर्विष, निरोगी, विनोदी शैलीने खुमासदार भाष्य करणारे लेखक मराठी साहित्यामध्ये दुर्दैवाने फार कमी आहेत. जयवंत दळवीचा 'ठणठणपाळ' अशा साहित्यप्रकाराचाच एक आदर्श नमुना.

गेल्या दहा–पंधरा वर्षांत महाराष्ट्रामध्ये घडलेल्या महत्त्वाच्या वाङमयीन व सांस्कृतिक घडामोडीवर वेळोवेळी केलेल्या व्यंगपूर्ण भाष्यांचा संग्रह म्हणजे बगाराम भेळपुरीवाले यांची ही 'भेळपुरी' ! 'नेहरूचाचांना मुले किती ?' 'नारायणरावांचा खून झालाच नव्हता !', 'पुण्याचे लोक लै बेरकी', 'विठ्ठलभक्त डुक्कर' असे शीर्षकामुळेच वाचकाचं लक्ष खेचून घेणारे चोवीस लेख या संग्रहामध्ये आहेत. त्यापैकी काही जेमतेम दोन किंवा तीन पानाचे आहेत, तर काही आठ–दहा पानंही पसरले आहेत!

'खमंगपणामुळे आस्वाद्य ठरू शकणारी ही भेळपुरी संबंधितांना काही ठिकाणी काहीशी तिखट लागून ठसका लागण्याची शक्यता आहे. परंतु कसल्याही आकसाने, बोचऱ्या उपरोधाने कुणाला दुखवावे, ओरबडावे अशी किंचितही कर्त्याच्या मनात भावना नाही', असा कबुलीजबाब संग्रह–लेखकाने प्रास्ताविकातच दिला आहे.तसंच या लेखाची रचना 'वात्रटके' किंवा 'गंमतके' या स्वरूपाची असल्याचं म्हटलं आहे. या 'भेळपुरीने वाचकाचे तोंड चाळविले असल्यास लवकरच 'पाणीपुरी' घेऊन वाचकांसमोर येण्यास बगारामला आनंदच वाटेल', अशी पुनरागमनाची सूचनाही या प्रस्तावनेत आहे.

. अर्थात हे आगमन होईल तेव्हा होवो; तोपर्यंत वाचकांनी बगारामाच्या भेळपुरीवर तरी हात फिरवून पाहायला ( खरं म्हणजे जीभच ! ) हरकत नाही.

भेळपुरी (विनोदी लेखसंग्रह)
लेखक–बगाराम भेळपुरीवाले
उत्कर्ष प्रकाशन, पुणे
पृष्ठे १२८, मूल्य १२ रु.

¤

## गाभेवन

स्त्री–पुरुषसंबंधांविषयी प्रत्येक माणसाला कमी–जास्त ओढ असते. काही वेळा ती भावनिक पातळीवर असते; पण बहुतेक वेळा तिची उडी तात्पुरत्या शारीरिक आकर्षणापलीकडे फारशी जाऊ शकत नाही, तसंच या दोन पातळ्यांच्या मधली रेषाही अतिशय पुसट, झटकन पकडता न येण्यासारखी असते.

आपल्या 'गाभेवन' या कथासंग्रहात श्री. पद्माकर गोवईकरांनी हीच पटलं दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. पुस्तकाच्या मलपृष्ठावर त्याच्या लेखनशैलीचा परिचय करून देताना असं सांगण्यात आलं आहे की, 'पद्माकर गोवईकर हे स्त्री–पुरुषसंबंधाचा शोध घेणारे लेखन करण्यात ख्यातकीर्त आहेत. ते स्त्री–द्वेष्टे नाहीत. स्त्रीचे समर्थक आहेत. अर्वाचीन स्त्रीविषयी त्याना गाढ सहानुभूती आहे. अशी सहानुभूती असल्यामुळेच समकालीन स्त्रीचा जगतानाचा उडालेला गोंधळ, तिला पडलेला पेच ते चटकन आणि नेमका ओळखू शकतात...

'...या संग्रहात स्त्रियांची अनेक चित्रे रेखाटली आहेत.निम्म्याधिक कथातून यातली स्त्री प्रथम 'पुरुषी' बोलते आहे आणि जगतानाचा उडालेला तिचा गोंधळ आपल्याला ऐकू येतो आहे. पुरुष हे तिचे अर्धांग; पण त्यालाही ती शाश्वत गूढ राहिली आहे.

'या गढावरील असंख्य पदर आपल्या

'युनिक स्टाइल 'ने गोवईकर एकेक करून दूर करताहेत आणि आपल्याला नेताहेत गामेवनात!'

हे सगळं वाचल्यावर असं वाटलं की, कुणा तरी महाराष्ट्रीय फ्रॉइडच्याच तावडीत आपण सापडलो आहोत! पण तरी मनाचा हिय्या केला आणि २१ कथाचा हा संग्रह वाचायला घेतला.

एकेक कथा वाचून संपत होती आणि आधी आपण उगीचच एवढे घाबरलो, असा दिलासा मनाला मिळत होता. या 'गामेवना'त कसलाही मानसिक अस्वस्थतेचा धोका नाही. असलाच तर एवढाच की, संग्रह वाचत असताना काही ठिकाणी 'चित्त-वृत्ती' जरा जास्त 'उल्हसित' होण्याची शक्यता आहे; पण भरपूर हिंदी चित्रपट पाहणाऱ्यांना या रोगाचंही भय नाही.

त्यामुळं, तुम्हाला आता या विषयाचा गाभाच करतलामलकवत् काढून दाखवतो, अशी धमकी देऊन गोवईकर शड्डू ठोकून उभे राहिलेत खरे, पण बाहेरच्या पहिल्या दोन-चार पापुद्र्यांमध्येच त्यांचं स्वतःचंच अवसान गळून गेलेलं दिसतं. मग शिल्लक राहतो, तो असा संग्रह की, जो वाचण्याचा फारसा दुष्परिणाम नाही; पण वाचण्याचं फार पुण्यही नाही! ¤

गामेवन (कथासंग्रह)
लेखक-पद्माकर गोवईकर
उत्कर्ष प्रकाशन, पुणे
पृष्ठे १८४, मूल्य २५ रु.

—सतीश

## नामांतर आणि धर्मांतर

पृष्ठ ५ वरून

कांडाला वरकरणी विरोध करणाऱ्या पण जखम ओली असणाऱ्या, जातिप्रथेनुसार दलिताना त्यांचे स्थान दाखवून देण्याची भाषा करणाऱ्या उच्च वर्णीयाचा व दुखावलेल्या सवर्णांचा समावेश आहे. थोडक्यात आंबेडकरांना सर्वस्व मानणाऱ्यांत आणि आबेडकराना मानण्याचा आविर्भाव आणत त्यांच्या नावाला विरोध करणाऱ्यात हा छडा आहे. नामांतराला विरोध करणाऱ्यात प्रामुख्यानं उच्च वर्णीय, सवर्ण हिंदू आहेत व नामांतर व्हावे असे ज्यांना वाटते त्यात बहुसंख्य (इतरही आहेत, पण त्याचे प्रमाण अत्यल्प आहे) बौद्धधर्मीय आहेत.

'नामांतर न झाल्यास धर्मांतर', असा सरळ पर्याय आबेडकराना मानणाऱ्या लोकानी उपस्थित केला तर त्याचा अर्थ असा होईल की, आबेडकराना जर तुम्ही (उच्चवर्णीय हिंदू) मानत नसाल, आबेडकराचे नाव विद्यापीठास देण्यास हिंदू विरोध करत असतील तर आम्ही तरी त्याना का मानावे? आम्हीही धर्मांतर करू, त्याचबरोबर आमचा नामातराचा आग्रहही संपेल! थोडक्यात, उच्चवर्णीय हिंदू आबेडकराना मानत नसतील तर आम्हीहा मानणार नाही, असा त्याचा सरळ अर्थ होइल.

आणि असे झालेच, नामांतर न झाल्यास धर्मांतर केले तर नामांतराचा प्रश्न आपोआप निकालात निघल. कारण नामांतर न झाल्यास धर्मांतर या संदर्भात, ज्या धर्मात जाण्याचा दलितांचा मनोदय आहे त्या धर्मातील लोकाना आंबेडकराबद्दल फारशी आपुलकी नाही. असलाच तर रागच आहे. कारण 'मुसलमानाच्या मनावर लोकशाहीचा प्रभाव पडत नाही. त्याना फक्त धर्माविषयी प्रबळ आस्था वाटते. तो धर्म समाजसुधारणचा विरोधक आहे. त्याची राज्यनिष्ठा मुसलमान राज्य करीत असलेल्या देशाशीच असते. इस्लामी धर्म मुसलमानाला 'हिंदुस्थान ही मातृभूमी आहे'... असे विचार त्याच्या मनासहा शिवू देणार नाही –' अशा प्रकारचे मुसलमान लोकाच्या बाबतीत व इस्लामधर्माच्या सदर्भात विचार त्यानी 'थॉटस् ऑन पाकिस्तान' मध्ये माडले आहेत. इतकेच नव्हे तर आबेडकरांनी मुसलमान धर्म स्वीकरावा यासाठी हैद्राबादच्या निजामाच्या प्रेरणेने काही मुसलमान नेत्यानी तसा प्रयत्नही केला; पण ते त्याला बळी पडले नाहीत. कारण त्याना असे वाटत होते की हरिजनांनी इस्लाम धर्म स्वीकारल्याने, त्याचे अराष्ट्रीयीकरण होईल व नेमके तेच त्याना नको होते.

अशा प्रकारची आंबेडकराची मते असलेल्या धर्मात हरिजनानी प्रवेश केल्यानंतर, आबेडकराची मते दलिताना रुचतीलच असे नाही आणि मग त्यातून दलित आबेडकरविरोधी होण्याचाच जास्त संभव आहे. आणि मग करायला गेलो काय नी झाले काय, असे म्हणण्याची पाळी दलितावर यईल. अर्थात नामातर करवण्यासाठी 'नामातर न झाल्यास धर्मांतर' हा जर स्ट्रॅटेजीचा भाग असेल तर चांगलाच आहे. एक चांगला डाव आहे; पण आंबेडकरांच्या नावाच्या प्रेमाखातर, गंभीर विचाराअंती हा निर्णय घेतलेला असेल तर माझ्या मताचाही विचार व्हावा ही अपेक्षा.

कारण आबेडकरानी बौद्धधर्म स्वीकारला तो गंभीर चितनातून. ख्रिश्चन, शीख, मुसलमान धर्मांच्या सखोल अभ्यासातून! हिंदू कोडबिल संसदेत सादर करते वेळी पुरोगामी भासणाऱ्या व्यक्तीनी त्याना केलेल्या विरोधामुळे इतकेच नव्हे तर धर्माच्या संदर्भात त्याची काही निश्चित मते होती. त्याच्या मते 'धर्म हा मनुष्याकरिता असावा. जो धर्म आमची काळजी घेईल तो आमचा धर्म आहे.'

त्याच्या ह्या मताशी जवळचा त्यांना बौद्धधर्म वाटला.त्यामुळेच त्यानी तो स्वीकारला. त्यांच्याच शब्दात, बौद्धधर्म नीतीवर अधिष्ठित आहे. बौद्धधर्म मार्गदाता आहे. बुद्धाचा धर्म म्हणजे नीती. बौद्धधर्मात देवाची जागा नीतीने घेतली. बौद्धधर्म मला प्रज्ञा शिकवतो, तो मला अंधश्रद्धा व अद्भुतता शिकवत नाही, तो मला प्रज्ञा, करुणा व समता ही तत्त्वे शिकवतो, ज्यांची आवश्यकता मनुष्याला चागल्या व सुखी जीवनासाठी असते. अशा प्रकारे स्वीकारलेल्या धर्माचा त्याग एका समस्येच्या पूर्तीसाठी करावा हे तितकेसे बरोबर वाटत नाही.

नामांतर झाले नाही आणि दलित म्हणतात त्याप्रमाणे नामातर न झाल्यास धर्मांतर झाले तर आबेडकराच्या नावाबद्दलच्या आग्रहावर प्रश्नचिन्ह तर लागेलच, शिवाय धर्मांतराची कृती आबेडकरद्रोही होईल. कारण नामांतराला धर्मांतर हा पर्यायच होऊ शकत नाही. धर्म बदलल्याने प्रश्न सुटत नाहीत, ते सुटलेही नाहीत,फक्त प्रश्न बदलतात. अधिक गुतागुतीचे होतात.

शेवटी राहिला धर्माचा प्रश्न. समतेच्या संदर्भात कोणताही धर्म पूर्णतः समतेच्या चळवळीला मार्गदर्शन करू शकत नाही. कारण प्रत्येक धर्माला असमानतेचा इतिहासवारसा आहे. हिंदुधर्म जातीनी भरलेला, ख्रिश्चन धर्माने आशिया-आफ्रिकेला गुलाम करून लुटले, काळा-गोरा भेद अद्यापही होत आहे. बौद्धधर्माचा चीनमधील इतिहास अंगावर शहारे आणणारा आहे. दास-दासीना दिलेली वागणूक ताजी आहे. इस्लामलाही गुलामगिरी टिकवणारा इतिहास आहे. थोडक्यात, हिंदुधर्म सोडून बौद्धधर्मात व तो सोडून इस्लामधर्मात गेल्याने मनात दडलेल्या गुलामगिरीच्या साखळ्या तुटत नसतात...फक्त साखळ्या बदलतात!

—बी. वाय. कुलकर्णी, जालना

# पत्र–लेख

□ १२ सप्टेंबरचे 'माणूस'चे संपादकीय छान आहे. हिंदु धर्माच्या (वैदिक धर्माच्या) उदरात तेजस्वी विश्ववाद आहे, हे नेहरूजींचे प्रतिपादन आपण उद्धृत केले आहे. तसेच अन्य धर्मीयांचे वैदिक धर्मात पुन्हा शुद्धीकरण करणाऱ्या स्वामी श्रद्धानंदाचा उल्लेखही आपण केला आहे. श्रद्धानंदजीची परंपरा त्याचे आर्यसमाजी अनुयायी आजही पुढे चालवीत आहेत. छतारी (उत्तर प्रदेश)चे नवाबाच्या नातूचे हिंदु धर्मात आर्यसमाजाने शुद्धीकरण नुकतेच मागील महिन्यात केले, याबद्दल अगदी त्रोटक वृत्तांत वृत्तपत्रात आला आहे. दिल्लीच्या 'आर्यजगत्' व इतर आर्यसमाजी नियतकालिकात (६सप्टेंबर) या शुद्धिसोहळ्याचे वर्णन व तात्त्विक पार्श्वभूमी विशद करण्यात आली आहे. डॉ. रफाक अखलाक हे नबाबाचे नातू असून त्यांचे वय २५ वर्षे आहे. त्यांची 'शुद्धी' करून त्यांना डॉ. आनंदकुमार सुमन हे नाव देण्यात आले आहे. त्यांचे वडील वारले असून आजोबा जिवंत आहेत व त्याचे वय १२४ वर्षांचे आहे. छतारीच्या नबाबांचे नाव भारतीय राजकारणात हैदराबादच्या निजामी राजवटीशी, तसेच अलिगड विद्यापीठाशी निगडित असल्याचे जाणकारांना माहीत आहेच.

हिंदु धर्मात प्रवेश करताना डॉ. सुमन म्हणाले की, 'माझ्या राजपूत पूर्वजानी 'इस्लाम'चा स्वीकार करण्याची जी चूक केली ती मी हिंदु धर्मात प्रवेश करून सुधारीत आहे. बहादूरशहा जफरच्या काळात आर्थिक व इतर प्रलोभनांमुळे माझे पूर्वज मुस्लिम झाले होते. मी आता त्याचे प्रायश्चित घेत आहे. यज्ञोपवीत (जानवे) धारण करून त्यामागील उदात्त जीवन-दर्शनासाठी मी माझे जीवनसर्वस्व वेचीन!'

'माणूस'च्या याच अंकात दाजीचे पुनरागमन झाले असून ते लक्षणीय आहे. स. शि. भावे यांनी जेपी नाईक याच्या शैक्षणिक तत्त्वचिंतनाबद्दल व व्यावहारिक अपयशाबद्दल प्रा. दाभोळकरांच्या श्रद्धांजलीनिमित्ताने जे विवेचन केले आहे, ते नेहमीसारखेच चागले आहे. 'दि इकॉनॉमिस्ट' या ब्रिटिश साप्ताहिकाच्या अग्रलेखाच्या अनुरोधाने वा. दा. रानडे यांनी मांडलेल्या लोकशाही समाजवादी पद्धतीसंबंधीच्या वैचारिक सूत्रावर विचारवंतांनी प्रकट चिंतन करण्याची गरज तीव्रतेने भासते. स्वामी श्रद्धानंदांच्या शुद्धिआंदोलनासंबंधी एखादा लेख छापता आला तर सद्यःस्थितीत वाचकाना तो हवा आहे.

–प्रा. देवदत्त तुंगार
आर्यसमाज
पिंपरी, पुणे

## जादुई नगरी व आमच्या व्यथा

□ के. लाल यांच्या अद्भुत सृष्टीच्या जाहिराती पुण्यात झळकल्या आणि लहानपणी शाळेत पाहिलेल्या जादूच्या प्रयोगाच्या आठवणी चाळवल्या गेल्या. पत्नीच्या पुढे प्रस्ताव मांडला, पण तिने माझे नेहमीचे शब्द 'सत्य परिस्थितीला सामोरे गेले पाहिजे' हे ऐकवून थोडासा उपहासच केला. तेव्हा सुट्टीला नातू येण्याची वाट पाहण्याखेरीज गत्यंतर उरले नाही. नातवाला प्रयोग दाखविण्याच्या सबबीखाली बरोबर गेलो व पडदा वर जाण्याची उत्कंठेने वाट पाहू लागलो. उत्कट बिंदूला नेणाऱ्या वाद्यांच्या गजरात, क्षणोक्षणी बदलणाऱ्या प्रकाशझोतात, झगमगणारा पडदा बाजूस झाल्यावर के. लाल यांचे दर्शन झाले. जादूसाठी हमखास लागणारी छडी, जादूनेच निर्माण करून त्यांनी सुरुवात केली व हसून सांगितले की, येथे माझी इच्छा असेल तेच तुम्ही पाहाल व मी जे सांगेन तेच येथे घडेल. हे शब्द त्यांनी खरे करून दाखविले. आम्ही काय पाहिले नाही? कधीही रिकामा न होणारा पाण्याचा घट होता. इजिप्शिअन ममीची जिवंत राजकन्या झाली व पुन्हा ममी झाली. के. लालनी प्रचंड डुंगनशी अटीतटीचे द्वंद्व जिंकले. हे सर्व पाहता पाहता, सत्य आणि जादू यांच्या सीमेवर, मन मोहनिद्रेत शिरले.

नकळत, प्रयोग संपता संपताच मी NO ENTRY दरवाज्याने आत शिरलो व लाल यांच्यासमोर उभा राहिलो. अजून पोषाख त्यांच्या अंगावर होताच. छडी मात्र हातात नव्हती. त्यांनी काही विचारण्याच्या आतच मी धीर धरून म्हटले, 'आपली अद्भुत शक्ती पाहून मी आशेने आलो आहे. आपल्याला माहीत आहेच की देशापुढे केवढे कठीण प्रश्न आहेत. या प्रश्नांवर येणारे गंभीर लेख सतत वाचून माझ्या मनात अनेक व्यथा निर्माण झाल्या आहेत. ('व्यथा' हा शब्द मराठी वाङ्मयाच्या वाचकाला आता चांगलाच परिचित आहे. काहीही होत नसताना, पोटभर जेऊनसुद्धा, अन्न गोड न लागल्यासारखे वाटणे म्हणजे 'व्यथा', असे समजावयास हरकत नाही.) आपण प्रयोगाआधी सांगितले की 'जे आपण इच्छा कराल तेच आम्ही पाहू. तेव्हा अनेक व्यथांचे निराकरण आपण करू शकाल या आशेने आलो आहे.' के. लाल यांचा चेहरा गंभीर झाला. त्यांना माझ्या व्यथांची तीव्रता जाणवली असावी. खोल आवाजात ते म्हणाले, 'कहो बेटा'—

सकाळी उठल्याबरोबर चढत्या भावाचे वाढते पाणीदार सरकारी दूध आणताना ही व्यथेची कळ निर्माण व्हावयाची. अरे, कित्येक वर्षे आम्ही श्वेतक्रांतीबद्दल, पुन्हा एकदा दह्या-दुधांनी समृद्ध असणारे 'गोकुळ' निर्माण करण्याबद्दल मंत्र्यांच्या तोंडून ऐकतो आहोत. व्हाईट दुधाचा चेचव चहा पिताना, गरिबाच्या मुलाना येवढेही दूध नाही या विचाराने तो आणखी कडू लागावयाचा. हे सर्व मनात येऊन मी म्हटले 'कधी अवतरणार ते गोकुळ?' के. लाल याचा पोषाख क्षणात बदलला. पांढऱ्या शुभ्र टिनोपाल (आता राणीपाल) खादीत ते मला दिसले. जादूची छडी मात्र त्यांच्या हातात होती. त्यांनी मला वॉशबेसिनचा नळ उघडावयास फर्माविले. तो काय? ज्या नळातून पाणी येण्याची मारामार त्यातून सरकारने आश्वासन दिलेल्या 'होल मिल्क'चा स्रोत वाहू लागला. त्यांनी पुन्हा छडी फिरविली आणि पर्वतीखालच्या कॅनालमधून दूध वाहताना दिसले. इतकेच नव्हे तर खडकवासल्याचे धरणही पांढऱ्याशुभ्र दुधाने भरले होते. चला, एक प्रश्न सुटला.

'हां, फिर बोलो', या शब्दांनी मी भाना-

घर आलो. आणखी काय ते माग. या दृष्टीने के. लाल माझ्याकडे बघत होते. दुसरी व्यथा उफाळून आली. मे महिन्यात सिंहगडावर गेलो असताना जो देखावा पाहिला होता, तो आठवला. पन्नास-शंभर इंच पावसाच्या त्या मैलोगणती परिसरात, मोजता येतील एवढीच झाडे होती. अरण्यांचा विध्वंस, जमिनीची धूप, मनुष्यजातीचा भविष्यकाल यावरील गंभीर लेख आठवले. त्याचबरोबर गेल्या वर्षी दोन कोटी रोपे लावली, यंदा दहा कोटी रोपे, मुलागणिक रोप हे वर्तमान-पत्रातील मथळे डोळ्यांसमोर आले. मी तीव्रतेने विचारले, 'ही भूमी सस्यशामल कधी होणार?' पुन्हा के. लाल वनमंत्र्याच्या स्वरूपात शेजारी उभे होते. छडी फिरवून त्यांनी तो प्रदेश मला दाखविला. तन्हेतन्हेच्या वृक्षानी बहरलेला, हिरवागार झालेला तो परिसर पाहून माझ्या डोळ्याचे पारणे फिटल्यासारखे वाटले.

पुन्हा विचार मनात आला नुसत्या भौतिक बदलानी काय होणार? या सर्व गोष्टी पाश्चिमात्य राष्ट्रांत आहेतच. जे. कृष्णमूर्ती, चिन्मयानंद इत्यादींच्या व्याख्यानांसंबंधी जे ऐकले होते ते आठवले. पश्चिमेत कुटुंबसंस्था उध्वस्त होत आहे, भोगलालसा वाढत आहे, राष्ट्रे अणुयुद्धाच्या उंबरठयावर उभी आहेत. हे टाळावयाचे असेल तर आपल्या मार्गाने, माणसाचे मन बदलणे आवश्यक आहे. लगेच सोपा मार्ग आठवला. सर्व माणसांची 'कुंडलिनी' जागृत केली तर माणसे सुतासारखी सरळ होतील. मंत्री राज्यकारभार हाकतील. सहकारी सोसायटया नीट चालून 'सामना'-सारखे चित्रपट काढण्याचे कारण उरणार नाही. हे सर्व विचार माझ्या मनात क्षणार्धात चमकून गेले. अंतर्ज्ञानाने, ते के. लाल यांना समजल्याचे दिसते. त्यांनी हसून म्हटले, 'जागृत होईल'. तो काय, प्रयोग संपल्यानंतर जे वंदे मातरम् झाले त्याला सर्व प्रेक्षक शिस्तीनं उभे राहिले व रांगेने बाहेर पडले. रस्त्यावर तर एका रिक्षावाल्याने चक्क हात दाखवून नंतर रिक्षा वळवलेली दिसली. सर्व व्यथा दूर झाल्याच्या समाधानात मी स्वत:ला हरवून गेलो

तेवढयात पायाच्या धक्क्याने जागृती आली. प्रयोग संपले होते. शेजारच्या व्यक्तीने 'झोपता काय राव, उठा!' असा 'खास मराठी बाण्याचा इशारा दिला होता. अरे, मग सर्वांची कुंडलिनी जागृत झाली हे स्वप्नच काय? सर्व समस्या तशाच शिल्लक आहेत तर! प्रश्न सुटण्यासाठी, आपल्या लोकशाहीला नेहमी एक मोठी विभूती आवश्यक आहे, असे टाइम्सचे विद्वान संपादक श्री. जैन यांनी नुकतेच प्रतिपादिन केले होते. मनात विचार आला की विभूतीपेक्षा जादूगार जास्त बरा. कारण क्षणभर का होईना, काहीही न करता प्रश्न सुटण्यासारखे व व्यथा दूर झाल्यासारख्या वाटतील.

—प्रि. खं. कुलकर्णी, पुणे.

रंगभूमी

# पुरुषोत्तम करंडक स्पर्धा

**बालगंधर्व रंगमंदिर गणेशोत्सवानिमित्त ओस पडले असताना दि. ५ आणि ६ सप्टेंबर रोजी भरत नाटय मंदिर मात्र गर्दीने ओसंडून वाहत होते. पुरुषोत्तम करंडक स्पर्धेची दुसरी फेरी या दोन दिवसांमध्ये मिळून झाली.**

**दि. ५ सप्टेंबरला रात्री नऊच्या ठोक्याला भरतचे दरवाजे बंद झाले आणि "पुरुषोत्तम करंडक आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या या वर्षीच्या दुसऱ्या फेरीच्या पहिल्या दिवशी—" अशा राजाभाऊ नातूच्या खरखरीत खर्जातील आवाजाने या दुसऱ्या फेरीची नांदी झाली.**

अहमदनगरच्या नूतन विधि महाविद्यालयाने विजय दळवीलिखित आणि रवींद्र चव्हाणदिग्दर्शित 'मेत' ही एकांकिका सादर केली. एका गावातील चार अस्पृश्यांना दरवर्षी एक दिवस सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत ब्राह्मण बनविण्यात येई. अशाच एका वर्षी लखू नावाचा म्हातारा अस्पृश्य ब्राह्मण असताना मेला. तो ब्राह्मण असताना मेल्याने त्याच्यावर गावाने अंत्यसंस्कार करावेत, असे अस्पृश्याचे म्हणणे; तर तो सूर्यास्तापर्यंतच ब्राह्मण असल्याने त्याचे क्रियाकर्म अस्पृश्यानीच करायला हवे, असा गावकऱ्यांचा दावा. अखेर एकाकी पडलेल्या लखूच्या प्रेतापाशी बसून 'बाबा, बामन म्हणजे काय रे? मेत म्हणजे काय रे? सांग ना, बाबा!' असा आक्रोश करणाऱ्या लखूच्या लुळया पोरापाशी — धर्मापाशी एकांतिका संपते. सध्याच्या धर्मांतराच्या पार्श्वभूमीवर काळजात कालवा करणाऱ्या प्रश्नावरील कथासूत्र. सुरवातीपासून पाटील, पुजारी आणि अन्य गावकऱ्यांना आत्यंतिक दबून वागणारे, धर्मसंकेतांबद्दल पुजाऱ्याचा शब्द प्रमाण मानणारे, एक दिवसाच्या ब्राह्मणपदातच आयुष्याची कृतार्थता मानणारे अस्पृश्य लखूच्या मरणानंतर अचानक फणा काढून गावकऱ्यांना धुडकावतील, संघर्षासाठी दंड थोपटतील हे पटत नाही. संपूर्ण कथासूत्रातील हा एकमेव कच्चा दुवा. अन्यथा एकांकिकेची संहिता पक्की होती. एका दिवसाच्या ब्राह्मण्यासाठी स्वत:च्या मुलालाही दूर राखणारा लखू — 'माणूसपण मोठे की माणसाने निर्माण केलेले हे भेदाभेद?' हा प्रश्न विलक्षण प्रभावीपणे उभा करतो, तर एकांकिकेच्या शेवटी किंचाळणाऱ्या गिधाडांच्या घिरट्याखाली आक्रोशणारा धर्माही मनात घसत जातो. संहितेत पक्की बांधलेली ही एकांकिका पाहताना वारंवार या नाटकामध्ये रंगमंचीय तंत्रापेक्षा चित्रपटाच्या तंत्राचा अधिक प्रभाव आहे, असे जाणवत होते. चित्रपटात ज्याप्रमाणे एक दृश्य पडद्याच्या चौकटीत सुरू होते, तो प्रसंग घडतो, संपतो. त्यानंतर त्या

चौकटीत दुसऱ्या स्थळी, दुसऱ्या व्यक्तीमध्ये घडणारा दुसरा प्रसंग सुरू होतो. नाटय-माध्यमाच्या मर्यादा स्वीकारून 'मैत' मध्ये या चित्रपटतंत्राचे संक्षेपण दिसत होते. प्रत्यक्षात अशा काही थिअरीचा विचार दिग्दर्शक रवींद्र चव्हाणाच्या मनात होता की नाही, मला माहीत नाही. मला मात्र अशी गोष्ट जाणवली. चित्रपटात ज्याप्रमाणे फक्त वातावरणनिर्मितीसाठी बरेचदा अनेक बारकावे पडद्याची चौकट सामावून घेते. 'मैत' मध्ये बरेचदा वातावरण निर्मितीसाठी अथवा रिकाम्या जागा भरून काढण्यासाठी अशा बारकाव्याचा – क्वचित अनावश्यक वाटेल इतका वापर केला आहे. 'मैत' मधील पालखीच्या मिरवणुकीचा प्रसंग हा सुंदर घेतलेला असला तरी कंटाळा येईल इतका लांबल्यासारखा वाटतो. प्रत्येक कलाकाराचा – मग त्याची भूमिका किती लहान असो – अत्यंत जिवंत अभिनय, प्रसंग हुबेहुब उभा करणारे प्रत्येकाचे mime, रंगभूषा, वेशभूषा या सर्वच गोष्टीमधून 'मैत' अधिकाधिक जिवंत झाली, फुलत गेली. त्यामुळेच पुरुषोत्तम करंडकासाठी 'मैत' ला आव्हान ठरावे, अशा दुसऱ्या कोणत्याही एकाकिकेचे नाव कोणाच्याही डोळ्यापुढे आले नाही. गेल्या वर्षीच 'कळकीचं बाळ' ने निर्माण केलेली परंपरा नगरकरांनी याही वर्षी चालू ठेवली.

'इंडियन न्यूज रिव्ह्यू-१९८१' ही एकांकिका म्हणजे बैरामजी जीजीभाय वैद्यकीय महाविद्यालयाच्या कलाकारांनी सादर केलेले राजकीय टीकानाटय. 'मैत' मध्ये ज्याप्रमाणे चित्रपटमाध्यमाचे संक्षेपण होते, त्याप्रमाणे 'इंडियन न्यूज' म्हणजे चित्रपटापूर्वी दाखविल्या जाणाऱ्या इंडियन न्यूजचे नाटयरूपांतर होते. बड्या राष्ट्रांच्या शिखर-परिषदेपासून बाहुबलीच्या महामस्तकाभिषेकापर्यन्त, महाराष्ट्रातील कांदा आंदोलन, भवानी तलवारीपासून यशवंतरावांच्या स्वगृही परतण्यापर्यंत निरनिराळ्या आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय घटनांवर–मुख्यतः राजकीय घटनांवर बोचरी टिप्पणी करणारी ही एकाकिका तिच्यातील ताजेपणामुळे प्रेक्षकांची दाद घेऊन गेली. या एकाकिकेतील दोन प्रसंग जोडणारा सूत्रधार म्हणजे सामान्य माणूस मात्र अधूनमधून जाणवण्या-इतपत वाक्ये विसरून थोडासा विरस करीत होता. प्रत्येक प्रसंगाचे निवेदन करणारा निवेदक म्हणजेही इंडियन न्यूजमधील एकसुरी, रटाळ निवेदकाची झकास टिंगल होती. फक्त दिग्दर्शकाचे कौशल्य दाखविण्यासाठी समूहाच्या रचनांचा केला जाणारा वापर पाहता त्या पार्श्वभूमीवर एकाकिका अधिकाधिक खुलविण्यासाठी केलेला समूहाचा योग्य वापर हेही 'इंडियन न्यूज'चे वैशिष्टय

अहमदनगर महाविद्यालयाने ह. मो. मराठे यांच्या एका कथेवर आधारित मिलिंद जोशीलिखित आणि प्रवीण कुलकर्णीदिग्दर्शित 'बातमी' ही एकांकिका सादर केली. एका पत्रकाराने एका स्त्रीवर झालेल्या बलात्काराच्या दिलेल्या बातमीच्या तापल्या तव्यावर बाकी साऱ्यांनी भाजून घेतलेल्या स्वतःच्या पोळ्या आणि तिचे त्या स्त्रीला बसलेले चटके या विषयावरील ही एकाकिका. राजीव रसाळ (आमदार रघुनाथराव) आणि अलका पारगावकर (आमदार निर्मला, स्त्री) या दोन कलाकारांचा सुंदर अभिनय आणि अधूनमधून विखुरलेले दिग्दर्शकी गिमिक्स या गोष्टीमुळे एरव्ही सामान्य असणारी ही एकाकिका छाप पाडून गेली.

बाकी एकाकिकांमध्ये 'श्रीयुत' आणि 'माणूस, परी आणि कासव' या दोन एकांकिका सह्य इतक्या पातळीपर्यंत तरी येऊ शकल्या. बाकी 'अस्पर्श', 'म', 'मी न माझा आरसा' आणि 'सन २००१' या चार एकाकिकांची नवव्या म्हणजे शेवटच्या क्रमाकासाठीच स्पर्धा चालू होती. स्पर्धेच्या पहिल्या फेरीतील अन्य एकाकिका यापेक्षाही कमी दर्जाच्या असतील तर त्याच्या दर्जाची कल्पनाच करता येणार नाही. एकाच वेळी संस्कृत पाठशाळा आणि कॉन्व्हेंटमध्ये शिक्षण घेतलेले असल्यागत बोलणारी ज्यूली, 'चर्चबेल्स'चा 'चच्चबल्स' असा अल्ट्रामॉडर्न उच्चार, इंग्रजी चालीवर म्हटलेल्या कोळीगीताचे पार्श्वसंगीत अशा गोष्टीमुळे 'अस्पर्श' ही करमणूकप्रधान गंभीर एकाकिका ठरली. बाकीच्या एकाकिकांनीही अशा वेगवेगळ्या कारणांनी प्रेक्षकांची अनुद्देशित करमणूक केली.

सरतेशेवटी स्पर्धेच्या संख्याशास्त्रीय आणि


### नवीन दाखल झालेली पुस्तके

१. गाभेबन–( कथासंग्रह )–पद्माकर गोवईकर
२. कलंकशोभा– ( कादंबरी )–गुलशन नंदा
३. हाडकी हाडवळा– ( आत्मपर लेखन )–नामदेव ढसाळ
४. विरोध–( कादंबरी )–सौ. कुसुम अभ्यंकर
५. बासरी–( कथासंग्रह )–वसुधा पाटील

— ENGLISH —

1. **Hitchcock**–( a profusely illustrated book about the movies of Hitchcock and the man himself )–George Perry.
2. **Wonders of The World**–( 70 wonders of the world with breath-taking Photos and concise information)–Edmund Swinglehurst.
3. **The Book of Lists 52**–David Wallechinsky, Irving Wallace, Amy Wallace & Sylvia Wallace.
4. *This Life*–( Autobiography )–Sidney Poitier.

☐ "आम्हाला हुंडा दिला नाही तरी चालेल, पण मुलीचं 'फिनिक्स'मध्ये आजीव सभासदत्व असेल तर आमचा होकार समजा." –मुलाची आई

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

MANOOS (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC-W 28
(Licensed to post without prepayment of postage-No. 11)

अन्य तांत्रिक बाबीविषयी थोडेसे-

स्पर्धेमध्ये एकूण २४ महाविद्यालयाच्या संघानी ३३ एकांकिका प्राथमिक फेरीमध्ये सादर केल्या. या एकांकिकांमधून पुढील ९ एकांकिकांची दुसऱ्या फेरीसाठी निवड झाली.

१) माणूस, परी आणि कासव (अभियांत्रिकी महाविद्यालय)

२) अस्पर्श (स. प. महाविद्यालय)

३) बातमी (अहमदनगर महाविद्यालय)

४) मैत (नूतन विधिमहाविद्यालय, अहमदनगर)

५) म (पुणे विद्यापीठ, जिमखाना)

६) मी न माझा आरसा (श्रीमती नाथीबाई दामोदरदास ठाकरसी महाविद्यालय)

७) श्रीयुत (लो. टिळक आयुर्वेद महाविद्यालय)

८) इंडियन न्यूज रिव्ह्यू १९८१ (बै. जी. वैद्यकीय महाविद्यालय)

९) सन २००१ (मॉडर्न महाविद्यालय)

स्पर्धेच्या या दुसऱ्या फेरीचा निकाल-

सांघिक प्रथम-मैत

साघिक द्वितीय-इंडियन न्यूज रिव्ह्यू १९८१.

साघिक तृतीय-बातमी.

सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिका-मैत.

सर्वोत्कृष्ट वैयक्तिक अभिनय-सुरेश चौधरी (धर्मा-मैत)

सर्वोत्कृष्ट अभिनेता-राजेंद्र देशपांडे (श्रीयुत-श्रीयुत).

सर्वोत्कृष्ट अभिनेत्री-गौरी गद्रे (नन-अस्पर्श)

सर्वोत्कृष्ट वाचिक अभिनय-चंद्रमोहन वाकडे (इंडियन न्यूज रिव्ह्यू-१९८१)

सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक-रवींद्र चव्हाण (मैत)

सर्वोत्कृष्ट लेखक-विजय दळवी (मैत)

सर्वश्री अरविंद देशपांडे, विनायक जोशी आणि सतीश आळेकर यानी दुसऱ्या फेरीसाठी परीक्षक म्हणून काम पाहिले.

सर्व विजेत्याचे मनःपूर्वक अभिनंदन.

—सदानंद बोरसे

## बांगला देश

पृष्ठ ३ वरून

तयारीस अवधी हवा होता हे खरे; पण सरकार तेवढे उदार धोरणाचे नाही. आपले काही उद्देश साधण्यासाठीच सरकारने निवडणुका पुढे ढकलल्या आहेत. पक्षाचे शुद्धीकरण करण्यासाठी सत्तारूढ पक्षाचे नेत्यानाही अवधी हवा आहे. पक्षातून आणि लष्करातून १९७१ च्या बांगलादेश-स्वातंत्र्ययुद्धात भाग घेतलेल्या व्यक्तींची हकालपट्टी करण्यात आली; पण ही मोहीम किती मर्यादेपर्यंत चालवायची, ती फार ताणली तर लोकांचा रोष आपण ओढवून घेऊ याची जाणीव त्या पक्षाच्या नेत्यांना झाली आहे. बांगलादेश स्वातंत्र्ययुद्धात भाग घेतलेल्या आणि त्या प्रेरणेने प्रभावित झालेल्या सर्व व्यक्तींची हकालपट्टी करणे शक्य नाही. तसे करणे म्हणजे बांगलादेशचे स्वातंत्र्ययुद्धच अमान्य करणे होय, अशी भूमिका उघडपणे घेणे शक्य नाही. तसे केल्यास लोकक्षोभ होईल हे त्यांना माहीत आहे म्हणून या बाबतीत ते सावधगिरीने पावले टाकीत आहेत.

बंगालादेशचे स्वतंत्र अस्तित्व नष्ट करून त्याला पुन्हा पाकिस्तानचा भाग बनवावा अशी मनीषा दोन्ही देशांतील काही गटांच्या मनात असेलही. त्या दिशेने काही हालचाली चालू असल्याचे काही घटनांतून सूचित झाले आहे. काही महिन्यांपूर्वी पाकिस्तानचे एक शिष्टमंडळ बांगलादेशाला भेट देऊन गेले. त्यांची भेट अत्यंत गुप्त राखण्यात आली होती. पाकिस्तान आणि बांगलादेश यांचा राज्यसंघ (कॉन्फेडरेशन) स्थापन करावा, याबाबत बोलणी करण्यासाठी आणि या योजनेला बांगलादेशच्या नेत्यांची कितपत मान्यता आहे हे अजमावण्यासाठी हे शिष्टमंडळ आले होते विरोधी पक्षाच्या नेत्यांनी तशी टीका व आरोपही केले होते. सरकारने त्यांचा इन्कार केला होता. एखादा महत्त्वाचा बदल अगदी पूर्ण स्वरूपात होण्याच्या आदल्या दिवसापर्यंत त्याचा इन्कार केला जातो. तेव्हा अशा इन्काराला किती महत्त्व द्यावयाचे हे आता राजकीय निरीक्षकांना माहीत झाले आहे.

शेख मुजीब यांच्या हत्येनंतर बांगलादेशामध्ये जी सरकारे अधिकारावर आली ती भारत-विरोधी आणि पाकिस्तानला जवळची अशीच होती. बांगलादेशचे नेते बाह्यतः भारताशी सलोख्याचे व सहकार्याचे संबंध प्रस्थापित करण्याची भाषा बोलत असतात; पण तेथील पत्रातून भारतविरोधी प्रचार चालू असतो; अमेरिका, पाकिस्तान व चीन यांचे प्रयत्न बांगलादेशाला आपल्या आघाडीत ओढण्याचे आहेत व तेथील सध्याच्या सत्ताधाऱ्यांना भारतापेक्षा हे देश अधिकच जवळचे वाटतात. असे असले तरी भारताने बांगलादेशविरोधी भूमिका घेतलेली नाही. त्या देशाशी मैत्रीचे व सहकार्याचे संबंध प्रस्थापित करायची भारताची तयारी आहे. बांगलादेशचे परराष्ट्रमंत्री प्रो. मुहम्मद शमसुल हक्क यांनी नुकतीच दिल्लीला भेट देऊन आपले पंतप्रधान व परराष्ट्रमंत्र्यांशी बोलणी केली. दोन्ही देशांतील सर्व अनिर्णित प्रश्न वाटाघाटींनी सोडविण्याची तयारी पंतप्रधान श्रीमती गांधींनी या वेळी व्यक्त केली. गंगेच्या पाण्याचे वाटप, मूरबेट आणि सागरी हद्द हे दोन्ही देशांतील मुख्य वादग्रस्त प्रश्न आहेत. गंगेच्या पाण्याच्या प्रश्नावर तर गेले वर्ष-दीड वर्ष वाटाघाटींच्या अनेक फेऱ्या झाल्या पण काहीच प्रगती झाली नाही. दोन्ही बाजूंची प्रश्न सोडविण्याची प्रामाणिक इच्छा असेल तर वाटाघाटींतून तोड निघायला हवी; पण या प्रश्नावर आतापर्यंत जी बोलणी झाली त्यात प्रत्येक वेळी बांगलादेशच्याच आडमुठ्या धोरणाने पुढे पाऊल पडू शकले नाही. हे लक्षात घेता बांगलादेशच्या धोरणात यापुढे तरी फरक पडेल अशी अशा कशाच्या आधारावर बाळगावयाची? बोलणी चालू राहिली तरी परिस्थिती फारशी आशादायक नाही.

□